म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८६९

# थोर पुरुष

REFBK-0015924

१८६९

२८९.

10386

376)

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

23 JUL 1975

[कृ. मा. प.]

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन

# अर्वाचीन महाराष्ट्रांतील सहा थोर पुरुष

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५९२४

लेखक :
प्रा. नरहर रघुनाथ फाटक

REFBK-0015924
ठाणे
समृद्ध योजना
१९७०

किंमत तीन रुपये

प्रकाशक
वासुदेव विष्णु भट
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
१७२ नायगाव क्रॉस रोड,
दादर, मुंबई १४

आवृत्ति १ ली १९५१
आवृत्ति २ री १९५४
आवृत्ति ३ री १९६७

मुद्रक
म. मं. दळवी
साहित्य सहकार मुद्रणालय
१७२ नायगाव क्रॉस रोड,
दादर, मुंबई १४.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | लोकहितवादी | ... | १ |
| २ | लोकहितवादींच्या शतपत्रांचें पृथक्करण | ... | २० |
| ३ | जोतिबा फुले | ... | ३९ |
| ४ | रामकृष्ण गोपाळ भांडारकर | ... | ४८ |
| ५ | महादेव गोविंद रानडे | ... | ५८ |
| ६ | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक | ... | ७१ |
| ७ | नामदार गोपाळ कृष्ण गोखले | ... | ८९ |

# प्रकाशकांचे निवेदन

माननीय प्रा. न. र. फाटक यांच्या सन १९५१ सालांत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचें प्रस्तुत प्रकाशन हे तृतीय मुद्रण आहे. प्रा. फाटक यांनीं दोन वर्षा-पूर्वी मुं. म. ग्रंथसंग्रहालयांत "महाराष्ट्राचे महापुरुष" ही व्याख्यानमाला गुंफिली. "महाराष्ट्राचे सहा थोर पुरुष" ही व्याख्यानमाला आमच्या या व्याख्यान मालेची पायाभूत असल्यामुळें त्यांच्या या पुस्तकाचें संस्थेच्या वतीने पुनर्मुद्रण करण्याची परवानगी आम्ही प्रा. फाटक यांचेकडे मागितली व संग्रहालयावरील लोभामुळें त्यांनी ती ताबडतोब आम्हांस दिली. त्यामुळें हें पुस्तक या आवृत्तीच्या स्वरूपांत आम्हांस प्रकाशित करतां येत आहे.

या आवृत्तीच्या शेवटीं या थोर व्यक्तींचा जीवनपट व त्यांच्या विषयींचे संदर्भ ग्रंथ यांची सूचि जोडिली आहे. अभ्यासकांस ती उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

पुढें योग्य वेळ येतांच "महाराष्ट्राचे महापुरुष" हि वाचकांस सादर करण्यांत येणार आहेत.

# अर्वाचीन महाराष्ट्रांतील सहा थोर पुरुष

१५९२४

# लोकहितवादी

लोकहितवादी ऊर्फ गोपाळ हरि देशमुख हे महाराष्ट्रांतील एक अत्यंत थोर ठरणारे पुरुष असतांही महाराष्ट्राला त्यांची असावी तशी ओळख नाहीं, हा एक यदृच्छादुर्विलासच समजायला पाहिजे. या दुर्विलासाची उपपत्ति लावू लागल्यास त्यांनीं आपले विचार ज्या काळांत प्रसिद्ध केले, त्या काळांत त्यांचे सगळे विचार सामान्यांना समजण्यासारखे नव्हते असें एक कारण दृष्टीस पडतें. त्यांनीं राजकारण, उदीम–व्यापार या संबंधांत जी विचारसरणी स्वीकारली व लोकांपुढें निर्भयपणें ठेवली तिचें आकलन करण्याची पात्रता तत्कालीन समाजांत नव्हती. लोकांना फक्त त्यांनीं जुनी विद्या आणि पुराणादि ग्रंथ यांवर जे हल्ले चढविले ते समजले व ते बिथरले. याचें कारण यांचें लिखाण बारकाईनें पाहिल्यास ध्यानांत येण्याला उशीर लागत नाहीं.

पेशवाई गेल्यावर इंग्रजांनीं जे जहागीरदार, इनामदार, त्यांचीं वतनें चालविण्याचें आश्वासन देऊन आपापल्या घरीं स्वस्थ बसविले, त्यांना लोकोपयोगी उद्योग उरला नसल्यामुळें आपल्या आश्रयांतील भटांभिक्षुकांबरोबर धर्मशास्त्र-विनोद करण्याशिवाय रिकामपणा भरून काढायला दुसरें साधन राहिलें नाहीं.

धर्मशास्त्रविनोदाचें काम दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीतच सुरू झालें होतें. परंतु त्या काळांत नाहीं म्हटलें तरी राज्यक्रांतीची धामधूम सुरू असल्या-मुळें या कामाकरितां इनामदार, जहागीरदारांना हवी तेवढी फुरसत नव्हती. हे बहुतेक जहागीरदार, इनामदार पेशवाईच्या राज्ययंत्राच्या अंगोपांगासारखे असल्यामुळें पेशवाईच्या उलाढालींत त्यांनाही खपावें लागत होतें व त्या योगानें धर्मशास्त्रविनोदासाठीं मुबलक फुरसत त्यांना मिळत नव्हती. पेशवाई समाप्त झाल्यावर या वर्गावरील राज्यकारभाराची सारी जबाबदारी नाहींशी झाली. द्रव्याची विपुलता आणि कामाची वाण अशा स्थितींत शास्त्रीभटांबरोबर धर्मकृ-त्यांची चर्चा आणि शास्त्रीभटांच्या सल्ल्यानें परवडतील तीं धार्मिक अनुष्ठानें करणें हेंच एक कर्तव्य त्यांच्यासाठीं शिल्लक राहिलें. या कर्तव्यांचें ज्ञान त्यांना व त्यांच्या आश्रितांना होतें. हीच मंडळी तेव्हां साक्षरांत गणण्याजोगी होती.

लोकहितवादींनीं जुनी विद्या, जुनी विद्यार्जनपद्धति आणि पुराणोक्त व्रतवैकल्यांच्या सुळसुळाटानें व्यापलेली जुनी राहणी यांवर जे ताशेरे झाडले ते या वर्गाच्या आकलनशक्तीबाहेरचे नव्हते. हा वर्ग बाजीरावाची स्तुति गाणारा होता. लोकहितवादींनीं बाजीरावाच्या दोषांचा उच्चार अनेक वेळां आपल्या लेखांतून केलेला आहे.

शास्त्री–भटांना पुण्याबाहेर अनेक संस्थानांतून देणग्या मिळत असत. सारे संस्थानिक बाजीरावाचे अवतार आहेत, बाजीरावाच्या राज्यांतील अंदाधुंदी कशी असेल याचा प्रत्यक्ष अनुभव देणारीं हीं संस्थानें आहेत, अशी लोकहितवादी शास्त्री–भटांच्या या आश्रयस्थानांवर निंदाव्यंजक टीका करीत होते.

आपल्या प्राचीन ग्रंथभांडारांत नाहीं असें इंग्रजांपाशीं अभूतपूर्व काय आहे म्हणून शास्त्रीभटांनीं फुशारकी मारावी, तर लोकहितवादींनीं जुन्या विद्या, जुनीं शास्त्रें टाकाऊ आहेत असें लोकांना पुनः पुनः बजावून सांगावें. याचा परिणाम लोकहितवादींच्या मतांसंबंधींच्या अनादरांत दिसू लागला.

तो अनादर वाढत होता. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं या अनादराला तोंड पाडलें व तेव्हांपासून चिपळूणकरांच्या नांवानें त्या अनादराचा अभ्यास सालोसाल चालू असल्यानें लोकहितवादींबद्दलच्या गैरसमजुती नष्ट होण्याला अवकाश सांपडूं नये यांत आश्चर्य नाहीं. लोकहितवादींनीं ग्रंथलेखन पुष्कळ केलें; परंतु अगदीं अलीकडे बी. ए., एम. ए. च्या मराठी अभ्यासक्रमांत कधीं 'पृथ्वीराज चव्हाण' तर कधीं निबंधलेखनाचा नमुना म्हणून 'शतपत्रें' हीं पुस्तकें नेमलीं गेलेलीं पहायला सांपडतात. हीं पुस्तकें शिकवितांना अध्यापक त्या पुस्तकांतील विषयाचें स्वरूप विद्यार्थ्यांच्या कानीं घालण्याऐवजीं बहुतेक लोकहितवादींबद्दल रूढ असलेल्या गैरसमजुतींना बळकटी येईल अशी भाषा वापरण्याचा मोह आवरीत नाहींत. चिपळूणकरांची टीका यथार्थ किती व चुकीची किंवा विपर्यासाची किती याचें ज्ञान अध्यापकवर्ग विद्यार्थ्यांना करून देतो असें कल्पायचें झालें तर बराच विचार करावा लागेल.

चिपळूणकरांच्या टीकेचा निर्देश लोकहितवादींनीं चिपळूणकर वारल्यानंतर एकदां केला आहे. त्या टीकेला उत्तर देतां येण्याची शक्यताहि त्यांनीं त्यावेळीं सूचित केली होती. परंतु टीकाकार जिवंत नसल्यामुळें लोकहितवादींनीं या शक्यतेचा फायदा घेण्याचें टाळलें.

सारांश, पुराणमताभिमानी लोकांची अविचारी प्रतिकूलता चिपळूणकरांनीं नव्या पद्धतीच्या लेखनशैलीनें प्रकट केली. लोकांना ती आवडली म्हणून ती गतानुगतिकत्वाने मागील चार पिढ्यांत फैलावत गेली. लोकहितवादींच्या प्राथमिक लेखनकालांतील साक्षर समाजाचा पुराणमताभिमान, हें त्यांच्याबद्दलच्या असंतोषांचें व त्यांतून जन्मास येणाऱ्या गैरसमजुतीचें मूळ आहे.

## परोपकाराची प्रवृत्ति

लहानपणींच लोकहितवादींच्या परोपकारबुद्धीचा अनुभव वडीलधाऱ्या मंडळींना येत होता. प्रौढ वयांत स्वतंत्र झाल्यावर आपल्या कमाईचा बराच अंश ते गोरगरिबांना मदत करण्यांत खर्चीत असतील हें त्यांच्या बालपणांतल्या परोपकारशीलतेवरून ध्यानांत येण्याला हरकत नाहीं. वाईस मुन्सफ असतांना १८५५ सालच्या महापुरांत वाहून येणाऱ्या बुडत्या माणसांना वांचविण्याकरितां आपला जीव धोक्यांत टाकून त्यांनीं प्रयत्न केला, अशा विश्वसनीय आख्यायिका उपलब्ध आहेत. त्यांच्या अहमदाबाद येथील दिनचर्येची माहिती एका नामांकित गुजराथी लेखकानें आपल्या ‘स्मरण मुकुर’ नांवाच्या पुस्तकांत दिलेली आहे. सकाळीं साबरमती नदीवर स्नानास जातांना व येतांना रस्त्यावर भेटणाऱ्या गोरगरीबांना पैशाची व रोगग्रस्तांना औषधाची मदत प्रतिदिवशीं करणें असा त्यांचा कधींहि न चुकणारा नियम होता. योग्य विद्यार्थ्यांना फी-पुस्तकें पुरविणें, अशाच कित्येकांची आपल्या घरांत जेवण्यारहाण्याची सोय करणें, असाहि परोपकार जन्मभर चालू होता. एखाद्या गरिबाला भाऊबंदांनीं अन्यायानें लुबाडलें असल्यास त्याला एखादा लायक वकील गांठून देऊन त्याची पूर्वकालीन सुखस्थिति त्यास मिळवून देण्याची तरतूद लावणें, असेंही लोकहितवादींच्या परोपकाराचें एक अंग होतें. पुण्यास पेन्शन घेऊन राहूं लागल्यावरही त्यांचा असा परोपकार मरेपर्यंत चालू होता असें सांगणारे लोक कालपरवांपर्यंत पुणें शहरी भेटत असत. अशा स्वभावाच्या पुरुषानें इंग्रज वरिष्ठांना खूष करण्याकरितां इनाम कमिशनर या नात्यानें स्ववर्गीय जहागीरदार-इनामदारांचीं वतनें बुडविली असतील हें सकृद्दर्शनींच संभवत नाहीं. परंतु तसा एक प्रवाद रूढ आहे. त्यांच्या इनामकमिशनमधील कित्येक हिंदी सहकाऱ्यांकडे आपली वतनें वांचविण्यासाठीं लांचलुचपतींचा वशिला लावल्याचे प्रकार उघडकीस आल्यामुळें त्यांची सरकारांतून चौकशी झाली तेव्हां लोकहित-

वादीसंबंधांत अशांतला कोणताच आरोप सिद्ध झाला नाहीं. यावरून त्यांनीं वतनदारांना बुडविलें हा प्रवाद जन्मास आला असावा. शेवटच्या बाजीरावानें आपल्या बापाच्या पक्षांतील लोकांचा एक नवाच वतनदार वर्ग निर्माण केला होता. त्यांतल्या पुष्कळजणांजवळ सनदापत्रांचा भक्कम पुरावा नसल्यानें त्यांचीं वतनें इंग्रज कंपनीनें हिरावून घेतलीं. त्यांचा बचाव करणें कुणासच शक्य नव्हतें. ज्याची बाजू कागदपत्रांव्यतिरिक्त इतर पुष्कळशा पुराव्यामुळें बळकट होती, त्यांना इनामकमिशनच्या कारवाईंतून लोकहितवादीनें निभावून नेल्याचीं उदाहरणें आहेत. "जें कां रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले॥" असा त्यांचा स्वभाव असल्यानें त्यांनीं कुणाचें बुद्धिपुरस्सर नुकसान केलें असेल ही कल्पना तर्कापुढें टिकणारी नाहीं व मुळांत खरीही नाहीं.

लोकहितवादी १८९२ सालीं वयाच्या ७० व्या वर्षीं निवर्तले. आतां त्यांच्या मृत्यूनंतरचा काळ पाऊणशेच्या घरांत आला आहे. म्हणून चिपळूणकरांच्या टीकेचा वृथाभिमान सोडून लोकहितवादींच्या विचारांचें निरीक्षण केल्यास काय दिसतें तें पहाण्याला हरकत नाहीं. लोकहितवादींना देशाभिमान नव्हता, असलाच तर तो अगदीं हीनदीन होता, ते इंग्रजधार्जिणे होते, त्यांनीं स्वजनद्रोहानें इंग्रजांची कृपा संपादन करून आपले कोटकल्याण करून घेतलें व इंग्रजांच्या स्तुतिपाठाप्रीत्यर्थ स्वजनांचा तेजोभंग करून इंग्रजांचें माहात्म्य वाढविलें, पर्यायानें लोकांच्या स्वदेशाभिमानाची उत्कटता कमी केली, त्यांच्यांत बोलण्याप्रमाणें चालण्याचें धैर्य नव्हतें, असे स्थूल मानानें त्यांच्याबद्दलचे कांहीं आरोप आहेत. त्यामध्यें तथ्य किती हें तपासण्यापूर्वी त्यांचें चरित्र थोडक्यांत ग्रथित करायला हरकत नाहीं

## आयुष्यांतील ठळक घटना

१८२३ म्हणजे पेशवाई गेल्यानंतर अवघ्या पांच वर्षांनीं पेशवाईशीं निकट संबंध असलेल्या एका ब्राह्मण सरदाराच्या पोटीं लोकहितवादींचा जन्म झाला. वयाच्या ६ व्या वर्षी त्यांची मुंज झाली व नंतर एका वर्षानें ४ वर्षे वयाच्या मुलीबरोबर त्यांचें लग्न वडिलांनीं उरकून टाकलें. त्यानंतर ६ वर्षांनीं म्हणजे १८३६ सालीं लोकहितवादी पितृवियोगाच्या संकटांत सांपडले. वडिलांचें इनाम तहाहयात ठरवून इंग्रज सरकारनें तें जप्त केल्यामुळें आर्थिक अडचणींशीं

टक्कर देण्याचा लोकहितवादींना प्रसंग आला. या काळांत त्यांचा विद्याभ्यास यथावकाश जोरानें चालला होता. मुलानें इंग्रजी शिकू नये, असा घरांतील सर्वांचा आग्रह असतांही लोकहितवादींनीं सरकारी इंग्रजी शाळेंत १८४१ मध्यें प्रवेश केला. तीन वर्षांनीं त्यांनीं हुषार व होतकरू विद्यार्थी असा लौकिक मिळवून युरोपियन शिक्षणवरिष्ठांच्या शिफारशीनें शाळा सोडली. याच सुमारास त्यांना सरकारांतून वर्षाचे २०० रु. मिळावे असा हुकूम झाला. परंतु या वर्षासनावर विसंबून रहाण्याऐवजीं लोकहितवादींनीं नोकरींत शिरून आपलें नशीब काढण्याचें ठरविलें. सरकारी हुकूमांत नोकरी केल्यास वर्षासन बंद अशी अट होती. नोकरीमुळें साहजिकच हें वर्षासन बंद झालें.

१८४४ पासून १८७९ पर्यंत लोकहितवादी नोकरींत होते. प्रथम दरमहा ७७ रुपये पगारावर तर्जुमेकाराची (Translator ची) नोकरी होती. १८४६ सालीं त्यांची मुन्सफीची परीक्षा उतरली तरी १८५२ पर्यंत त्यांना मुन्सफीच्या जागेचा लाभ झाला नाहीं. १८५५ मध्यें मुन्सफी जाऊन सब-असिस्टंट इनाम कमिशनर या हुद्यावर नेमणूक झाली. १८५७ सालीं ते सब असिस्टंटचे असिस्टंट इनाम कमिशनर बनले. १८६१ सालीं इनाम कमिशनचें काम बंद झाल्यामुळें दोन महिने त्यांना नोकरीवांचून रहावें लागलें. नंतर त्यांच्याकडे हिंदु–मुसलमान कायद्याचा मथितार्थ (Digest) तयार करण्याचें मुंबई हायकोर्टांतलें काम देण्यांत आलें. १८६२ मध्यें अहमदाबादेस, नंतर अहमदनगर येथें त्यांनीं असिस्टंट जिल्हा न्यायाधीश या नात्यानें काम बजावलें. याच काळांत लोकहितवादी आणखी एका सरकारी नोकरीच्या परीक्षेंत यशस्वी झाल्यामुळें ॲक्टिंग जज्ज, मुंबई स्मॉल कॉज कोर्टांतील जज्ज, याप्रमाणें कामें करतां करतां त्यांना अहमदाबादेस १८६६ मध्यें पुनः जाण्याची पाळी आली. तेथें त्यांनीं पुढें १८७६ पर्यंत उणीपुरीं अकरा वर्षे काढली. नंतरचीं तीन वर्षे त्यांनीं ठाणें, नाशिक येथें राहून आपली नोकरी पूर्ण केली.

## लेखनव्यवसाय

लोकहितवादींना वृत्तपत्रें व ग्रंथसंग्रहालयें स्थापन करण्याचा नाद होता. जेथें जातील तेथें या दोन संस्था अस्तित्वांत येण्यासाठीं ते प्रयत्न करीत. पुण्याचा ज्ञानप्रकाश आणि आज पुण्यांत नगर वाचन मंदिर या नांवानें

ओळखले जाणारें ग्रंथ संग्रहालय या दोन्ही संस्था ह्यांच्याच उद्योगाचें फळ होत, हें सर्वविश्रुत आहे. इंदुप्रकाशच्या जन्माशी त्यांचा संबंध होता व तसेंच वृत्तवैभवाबद्दलही म्हणतां येईल. मात्र त्यांचा लेखनारंभ मुंबईच्या 'प्रभाकर' साप्ताहिकामधून झाला. त्यांच्याजवळ लोकांना सांगण्यासारखें पुष्कळ असल्यामुळें ते वृत्तपत्रांना लेखनसाह्य पुरविण्याला नेहमी सज्ज असत. इंदुप्रकाश आणि वृत्तवैभव यांमधून त्यांनीं प्रसिद्ध केलेले लेख 'निबंधसंग्रह' नांवाच्या पुस्तकांत एकत्र पहायला सांपडतात. त्यांच्या ज्ञानाची विविधता समजून घेण्याला हा निबंधसंग्रह उपयोगी पडल्याशिवाय रहात नाहीं. त्यांनीं प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें एकूण ४० पर्यंत भरतील. नोकरी सुटून स्वस्थता लाभल्यावर लोकहितवादींनीं आपल्या नांवाचें एक मासिक १८८२ च्या ऑक्टोबरांत सुरू केलें. नंतर ऐतिहासिक मजकूर जास्त देण्याच्या इच्छेनें त्याला त्रैमासिकाचें रूप दिलें. १८८४ नंतर तें बंद पडलें. मासिक चालवितांना लोकहितवादींवर पुत्र, पत्नी इत्यादींच्या मृत्यूचे आघात एकामागून एक बसले. १८८४ अखेरच्या लोकहितवादीच्या अंकांतील पुढील मजकूर त्यांच्या विव्हल मनःस्थितीचा दर्शक आहे :—

"हें मासिक पुस्तक सुरू केल्यापासून पुस्तक प्रकाशकास अनेक ऐहिकोपाधींपासून अस्वास्थ्य व अशांति उत्पन्न होण्यासारखे जे कित्येक असह्य व्याप प्राप्त झाले ते सर्वांस विदित आहेतच! पुत्रपौत्रजायादिकांच्या समागमसुखाचा अनुक्रमें अंत होत जाणें ह्यापरतें मानवी प्राण्यास अस्वास्थ्य व अशांति उत्पन्न करणारें दुसरें काय आहे ? ईश्वराच्या हेतुप्रमाणें सर्व गोष्टी घडतात! त्याचीच इच्छा प्रमाण समजून विचारानें जीवास व्यर्थ ताप न होऊं देतां मनाची शांति व स्थैर्य हें कायम ठेवणें, गृहीत कृत्य पूर्ववत् उत्साहानें अखंड व अव्याहत चालू ठेवून देशबंधूंची सेवा करणें यांसारखें दुसरें समाधानाला व विश्रांतीला कारण व स्थल नाहीं."

या मासिकाची वर्गणी वार्षिक एक रुपया व पृष्ठसंख्या २० होती. पहिल्या वर्षी त्यांनीं पदरचे दोनशें रुपये खर्चून मासिकाचे १२ अंक पुरे केले. आपलीं पुस्तकें लोकांच्या वाचनांत यावीं या हेतूनें त्यांनीं एकदां सारीच्या सारीं पुस्तकें फक्त पोस्ट खर्च घेऊन लोकांस देण्याचा संकल्प वृत्तपत्रांतून पुकारला. परंतु जो अनुभव आला तो उत्तेजक नव्हता. उलट कित्येकांनीं भारी

किंमतीचीं पुस्तकें फुकट देणार तर पोस्ट खर्च घेण्याचा तरी लोभ कशाला हवा ? अशा अर्थाचा लोकहितवादींशीं विनोद केला.

लोकहितवादींच्या लेखनाला प्रारंभ १८४२ मध्यें झाला. त्यांनीं हिंदुस्थानचा इतिहास ( पूर्वार्ध ) हें पुस्तक यावर्षी लिहून तयार केलें. परंतु तें छापण्याचा योग पुढें ३६ वर्षांनीं म्हणजे १८७८ सालीं आला. पश्चिमेकडे उदयास आलेल्या सर्व शास्त्रांचें ज्ञान करून घेण्याचा त्यांना विलक्षण हव्यास होता. परंतु त्यांतल्या त्यांत इतिहास हा त्यांचा अत्यंत आवडता विषय असल्यामुळें त्याचें ज्ञान ते शेवटपर्यंत मिळवीत होते व लोकांना स्वतःच्या टिपणी जोडून तें ज्ञान सादर करीत होते.

त्यांनीं लेखनकार्य सुरू केलें तेव्हां पुस्तकें दुर्मिळ होतीं एवढेंच नव्हे तर त्यांची संख्याही अत्यल्प होती. पुण्याला हीं पुस्तकें हस्तगत करण्याचीं साधनें तेव्हां नव्हतीं. तरी ग्लीग नांवाच्या एका इंग्रजानें लिहिलेला हिंदुस्थानचा इतिहास मिळवून त्याच्या आधारें त्यांनीं आपला मराठी इतिहास निर्माण केला. त्यांत दुसरा भाग आपल्या हयातीपर्यंतचा लिहून तयार केल्याचा उल्लेख प्रस्तुत पूर्वार्धाच्या प्रस्तावनेंत आहे. परंतु तो कधींच प्रकाशांत आला नाहीं. यानंतर त्यांनीं गुजराथ, सौराष्ट्र, उदेपूर, लंका या देशांचे इतिहास प्रसिद्ध केले. यांनाही इंग्रजी पुस्तकांचे आधार आहेत. परंतु लोकहितवादींच्या टीपा आणि परिशिष्टांतून इंग्रजी व देशी राज्यांची केलेली तुलना हे भाग उद्बोधक आहेत. टीपांचें व तुलनांचें स्वरूप येथें स्थलसंकोचामुळें सविस्तर विशद करणें शक्य नाहीं.

‘ लक्ष्मीज्ञान ’ हें त्यांचें छापून प्रसिद्धीस आलेलें पहिलें पुस्तक म्हणतां येईल. ‘ लक्ष्मीज्ञान ’ म्हणजे संपत्तिशास्त्र किंवा अर्थशास्त्र. यांतील शेवटचा शब्द कालान्तरानें लोकभाषेंत रूढ झाल्यावर लोकहितवादींनींदेखील आपल्या लेखनांत वापरला आहे. परंतु जेव्हां त्यांनीं हें पुस्तक लिहिलें तेव्हां त्यांना इकानॉमिक्सकरितां मराठी भाषेंत नवा शब्द ‘ लक्ष्मीज्ञान ’ असा योजावा लागला. हें पुस्तक १८४९ सालांतलें आहे. १८५० मध्यें यंत्रज्ञान ( भौतिक शास्त्राच्या माहितीचें ); खोटी शपथ, भरतखंड पर्व, पुष्पवन ( सादीच्या गुलीस्तांचे भाषांतर) हीं तीन पुस्तकें १८५१ मध्यें व पंदनामा (उपदेशसंग्रह) १८५८

मध्यें याप्रमाणें लोकहितवादींचीं पुस्तकें जगापुढें आलीं. लोकहितवादींना नोकरींत शिरल्यावर खोटी शपथ घेण्यापायीं कित्येक सरकारी अंमलदारांना व साक्षीदारांना तुरुंगांत जावे लागल्याचा देखावा दिसू लागला. यांत नुसते अब्राह्मण नव्हे तर पुष्कळ ब्राह्मणही होते. शपथ घेऊन खोटी साक्ष देणारा हा अन्यायाचा साह्यकर्ता अर्थात् एक प्रकारें समाजद्रोही होय, अशा खात्रीची तळमळ त्यांच्या शतपत्रांतून दिसणारी आहे. या तळमळींनेंच त्यांनीं हें लहानसें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें. याच मासल्याचें त्यांचें दुसरें पुस्तक लांच खाण्याच्या पापासंबंधाचें आहे. आपलें धर्मशास्त्र आणि लोकव्यवहार अभ्यासीत असतां लांच घेणें हें पाप होय, अशीं नीति लोकहितवादींना त्यांत आढळली नाहीं. देवता, गुरु अथवा राजा यांच्याकडे जायचें तर रिकाम्या हातांनीं जाऊं नये अशीं वचनें नजराण्याच्या अर्थाचीं असलीं तरी लांचेला संमति देणारीं आहेत, देवाला नवस करणे ही तऱ्हा म्हणजे लांच असा त्यांचा ग्रह होऊन त्यांनीं या संवयीचा तीव्र निषेध केला आहे. पंदनामा हा सादी कवीच्या लोकप्रिय उपदेशपर सुभाषितांचा संग्रह असून पुष्पवन हें त्याच कवीच्या गुलिस्ताँ नामक पुस्तकाच्या आठव्या प्रकरणाचें मराठी भाषांतर आहे. भरतखंड पर्वांत हिंदुस्थानाचा प्राचीन इतिहास संक्षेपानें सांगितलेला आहे. हीं सारीं पुस्तकें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापलेलीं होतीं.

१८६० पासून १८७० पर्यंतच्या दहा वर्षांत लोकहितवादींनीं निरनिराळ्या वृत्तपत्रांना लेख पुरविण्याचा सपाटा लावलेला दिसतो व या लेखांचा संग्रह स्वतंत्र ' निबंधसंग्रह ' या नांवानें पुढें प्रसिद्ध झाला. याचीं पानें ११०० वर आहेत. स्वाध्याय, आगमप्रकाश वगैरे पुस्तकें १८७० ते १८८० या काळांत लोकांसमोर आलीं. नंतर गुजरात, सौराष्ट्र वगैरे प्रदेशांचे इतिहास छापले गेले. मध्यंतरी ऐतिहासिक गोष्टींचीं तीन पुस्तकें झालीं. त्यांच्या धर्तीवर पुढें मराठींत आणखी बरींच पुस्तकें लिहिलीं व छापलीं जाऊन, अद्यापि हा प्रघात बंद पडलेला नाहीं. येथें लो. हि. वादींच्या साऱ्या पुस्तकांचा आढावा देण्याचा उद्देश नसल्यानें बाकीचीं किरकोळ व प्रचलित विषयांवरील पुस्तकें सोडून ' गीतातत्त्व ' या पुस्तकाचा मुद्दाम निर्देश करावासा वाटतो. त्यांत ईश्वराच्या निष्ठेनें फलाशा सोडून माणसानें लोकोद्धाराची प्राप्त कर्मे करावीं असा निष्कर्ष लोकहितवादींनीं काढलेला आहे. पुस्तक लहान आहे. गीतेच्या ७०० श्लोकांपैकीं अवघे १२१ श्लोक निवडून ते १८ प्रकरणांत विभागले आहेत. अर्वाचीन महाराष्ट्रांत

गीतारहस्य निष्काम कर्मयोगपर असल्याचें प्रतिपादन करणारा एक ग्रंथ या नात्यानें त्यांचे महत्त्व कुणासही कबूल करावें लागेल.

## राजकीय मतें

लोकहितवादींच्या शारीरिक व बौद्धिक जीवनाचा हा त्रोटक वृत्तांत आहे. आतां त्यांच्या विचारसरणीचें निरीक्षण करायला हरकत नाहीं. राजकारण, समाज, धर्म, उद्योगधंदे, व्यापार अशा मानवी कर्तृत्वाच्या अनेक बाजू त्यांच्या लेखनांत आल्या आहेत. इतिहास म्हणून आज त्यांच्याकडे पहात असतां लोकहितवादींच्या दूरदृष्टीचें कौतुक नव्हे तर आश्चर्यही वाटतें. हल्ली राजकारणांतील विचारप्रवाहावरून माणसांची थोरवी ठरविण्यांत येत असल्यामुळें प्रथम लोकहितवादींच्या राजकीय मतप्रणालीकडे लक्ष पुरविणें अवश्य आहे.

या बाबतींत एक गोष्ट मुद्दामच ध्यानीं घेण्याजोगी आहे. ती ही कीं, देशाचें राज्य गेलें याचा लोकहितवादींना कधींच संतोष नव्हता. याचा पुरावा त्यांच्या ‘ शतपत्रें ’ नामक लेखसमुच्चयांत भरपूर आहे. हे लेख त्यांनीं ‘ प्रभाकर ’ पत्रांत लिहिले. १८४८ च्या प्रारंभीं लेखांना सुरुवात झाली व १८५० च्या अखेरीपर्यंत संपले, असा अंदाज करतां येतो. कारण निबंधसंग्रहांतील पुनर्मुद्रणांत शेवटच्या लेखांच्या तारखा नमूद केलेल्या नाहींत. लेखांना प्रारंभ झाल्यानंतर थोड्याच अवधींत लोकहितवादींनीं आपल्या देशाला पार्लमेंट लाभावें अशी इच्छा व्यक्त केली आहे. पार्लमेंट मागण्याची चोरी नाहीं, असें लिहितां लिहितां १८४९ च्या एप्रिलांत त्यांनीं आपल्या देशाला स्वराज्य व स्वातंत्र्य मिळणारच असा आपल्या मनांतला आशावाद निश्चयाच्या शब्दांनीं उघड केला आहे.

इंग्रजांहून हिंदी माणसें बुद्धीनें वरचढ असूनहि त्यांना आज परवशतेचें लज्जास्पद दैन्य भोगावें लागत आहे याचें कारण त्यांच्या निस्सीम अज्ञानाशिवाय, आळसाशिवाय दुसरें नाहीं. हिंदुस्थानांत जेव्हां ज्ञान होतें तेव्हां स्वराज्य होतें, ऐश्वर्य होतें, परंतु अलिकडच्या दोन हजार वर्षांत ज्ञानाचें संवर्धन थांबलें. पुराणांतील जातिभेद, व्रतवैकल्यांचा पुंडावा या विषयींची आवड लोकांत बळावून जगांत काय चाललें आहे, जगाच्या चढाओढींत आपलें स्थान आणि कर्तव्य कोणतें, यासंबंधाचा चौकसपणा ठार झाला. काल मुसलमानांनीं देश

काबीज केला, तुडवला; आज इंग्रज छातीवर चढून बसले, तरी लोकांना त्याचा विषाद नाहीं, उद्वेग नाहीं. असल्या सहनशील चेचाड वृत्तीमुळें स्वराज्य, स्वातंत्र्य हीं साफ बुडालीं व पारतंत्र्याचें दैन्य बोकांडीस बसलें अशा अर्थाची मतें लोकहितवादींच्या अनेक लेखांतून पसरलेलीं आहेत.

## ब्राह्मणनिंदेचीं कारणें

राजकीय दुर्दैवाची मीमांसा करीत असतां ब्राह्मण जातीवर लोकहितवादींनीं अतिशय आवेशानें कोरडे मारले आहेत. त्याकडे लक्ष देऊनच चिपळूणकरांनीं आपलें टीकास्त्र लोकहितवादींवर जवळजवळ एक वर्ष चालू ठेवलें होतें. त्यांनीं हें टीकास्त्र सोडतेवेळीं लोकहितवादीनीं ज्या काळांत ब्राह्मणांच्या निंदेचे लेख लिहिले तो काळ व त्या काळांतील ब्राह्मणांची परिस्थिती यांचें भान बाळगलें नाहीं. या परिस्थितींचें चित्र लोकहितवादींच्या लेखांतच सांपडणारें आहे. ब्राह्मण स्वतःला सर्वांहून श्रेष्ठ व सर्वांच्या गुरुस्थानीं समजतात. पण १८४८–५० या वर्षांत व त्यापूर्वी या श्रेष्ठत्वाचें किंवा गुरुत्वाचें एकही लक्षण ब्राह्मणांच्या ठिकाणीं दिसत नव्हतें. शाक्त पंथाचें नांव सांगून ब्राह्मण राजरोसपणें दारू पीत होते; पवित्र–अपवित्र यांचा विधिनिषेध न बाळगतां ब्राह्मण पुजारी कसबिणींच्या घरांतील देवांची मजुरीनें सेवा करायला भीत नव्हते; देवळाच्या परिसरांतील जागा कसबिणींना भाड्यानें दिल्या जात होत्या; शास्त्री मंडळीला अंगवस्त्र – रखेल्या – नसेल तर तो शास्त्री कसला अशी तेव्हा लोकांची समजत व वागणूक होती. याप्रमाणे कितीतरी भ्रष्टाचाराचीं उदाहरणें पुण्यास तेव्हां दिसत होतीं. परंतु ब्राह्मणांनीं त्यांत भ्रष्टता आहे, असें कधींच मनांत आणलें नाहीं. कित्येक देवांची विशेषणें भांग्या, छिनाल, खुन्या, गौत्या अशी अमंगळ अभद्र असतांही ब्राह्मण त्यांची खंत बाळगीत नव्हते. त्यांचा एकच धंदा होता. जे भटशास्त्री असतील त्यांनीं धनिक यजमान गांठून आपली तुंबडी भरणारीं व्रतें–अनुष्ठानें करण्याची सल्लामसलत द्यावी आणि सुखाचा परलोक गांठतां येईल, या कल्पनेला बळी पडून धनिक यजमानांनीं शास्त्री भिक्षुकांच्या मसलतीप्रमाणे त्याचप्रमाणें व्रतानुष्ठानांत पैसा उधळावा. सदा सर्वकाळ यांच्यांत चर्चा काय, तर कोणत्या व्रतानें कोणतें पुण्य साधून अंतीं पदरांत कोणते फळ पडतें, या विषयाची ! देश दरिद्री का झाला, देशाचें

स्वातंत्र्य व स्वराज्य कसें गमावलें, त्यांतून बाहेर पडण्याला कांहीं उपाय आहे कीं नाहीं हे प्रश्न त्यांच्या मनाला कधीं शिवत नव्हते.

देवळांतील पुराणें भाकड गोष्टींनीं भरलेलीं; ज्योतिष पहावें तर जातक, मुहूर्त, शकून असल्या निरर्थक गोष्टींनीं माणसाच्या कर्तृत्वाच्या स्वातंत्र्याला प्रतिबंध करणारें, भूगोलाकडे नजर टाकावी तर त्यांत भलती भलती वर्णनें, वैद्यक चाळावें तर आजच्या कालमानासमोर कोतें ठरण्यासारखें; रसायन, पदार्थविज्ञान असल्या शास्त्रांची तर दादच नाहीं; तथापि आपण सर्व विद्यासंपन्न आहों, अशी बढाई मिरवायचा चढेलपणा ब्राह्मणांच्या स्वभावांत ओतप्रोत आढळायचा; इंग्रज आले कुठून, त्यांचे सामर्थ्य कशांत आहे, इंग्रजाखेरीज आणखी जगांत किती देश व समाज आहेत, फार कशाला ? हिंदुस्थनातील प्रांतांच्या सीमा, दिशा, भाषा, कशा, कोणत्या व किती आहेत; या प्रश्नांबाबत ब्राह्मणांच्या बुद्धीमध्यें कमालीचा अंधार पाहून लोकहितवादींच्या चित्तांत क्षोभ उठला व त्याच्या भरांत त्यांनी या वर्गाची मूर्ख, पशू असल्या अपशब्दांनीं हजेरी घेतली. असा ब्राह्मण वर्ग हा जर समाजाचा गुरु, नेता, मार्गदर्शक, सारथी असेल तर त्यानें गुरु, नेता वगैरे शब्दांना सार्थ करणारी कामगिरी बजावली पाहिजे, असें लोकहितवादींच्या साऱ्या लेखांचें तात्पर्य सहज निघणारें आहे. येथे रामदासस्वामींनी केलेल्या ब्राह्मण निंदेचें स्मरण देण्याला हरकत नाहीं.

व्यास, पाणिनि, पतंजली, याज्ञवल्क्य इत्यादि प्राचीन विद्वानांचीं नांवें सांगून वेदांच्या अर्थशून्य पोपटपंचीनें विद्वानांच्या मालिकेंत घुसून आढ्यता मिरविण्याची खोड ब्राह्मणांनीं टाकली पाहिजे व आज विद्वान ठरावयाचें असेल तर व्यास, वाल्मीकी, पाणिनि, याज्ञवल्क्य यांच्याप्रमाणें लोकांना सज्ञान करणारे नव्या नव्या विषयांवर ग्रंथ लिहिले पाहिजेत, असा उपदेश त्यांनीं जागृतीच्छु ब्राह्मणांना केला.

दानशूरांना त्यांचें असें सांगणें होतें कीं, भिक्षुकांच्या चौपद्रया फुगविण्या-ऐवजी वृत्तपत्रें, छापखानें, ग्रंथसंग्रहालयें, नव्या आधुनिक विद्या शिकविणाऱ्या शाळा स्थापन करण्यासाठीं आपलें द्रव्य उदार धनिकांनीं वेंचावें. त्यालाच खरें दान म्हणतां येईल व त्यांतच खरें पुण्य आहे. ब्राह्मणविषयक टीकालेख लिहिण्याच्या दिवसांत लोकहितवादींचें 'लक्ष्मीज्ञान' हें पुस्तक छापलें जात

असल्यानें अर्थशास्त्राच्या कसोटीनें त्यांनीं ब्राह्मणांच्या व्यवहाराची परीक्षा करावी यांत नवल नाहीं. ब्राह्मणांचें काम अनुत्पादक कीं उत्पादक असा प्रश्न उत्पन्न करून ब्राह्मण वर्ग अनुत्पादक आहे, त्याला दिल्या जाणाऱ्या द्रव्याबद्दल प्रत्यक्ष फायद्याचा मोबदला कांहींच मिळत नसल्यानें या फुकटखाऊंना समाजानें मुळींच पोसूं नये असा निष्कर्ष अर्थशास्त्रदृष्ट्या लोकहितवादींनीं पक्का केला व त्याचा उच्चार त्यांच्या लेखांतून झालेला आहे.

ब्राह्मण द्रव्यलोभानें धनिकांच्या पापकर्मांना उत्तेजन देतात असा एक लोकहितवादींचा ब्राह्मणांवर आक्षेप आहे. पाप कितीहि गलिच्छ किंवा समाज-घातकी असो, त्याच्या पारलौकिक परिणामांतून सुटण्याकरितां ब्राह्मणाच्या जवळ प्रायश्चितांचे लहानमोठे तोडगे सज्ज असतात; फक्त पातक्यांच्या द्रव्याच्या थैलीचें तोंड ऐसपैस उघडें असलें म्हणजे झालें. ब्राह्मणांकडून भरभक्कम दक्षिणेच्या जोरावर प्रायश्चित घेतलें कीं आपलें चारित्र्य इहपरलोकीं स्वच्छ गणलें जाण्याची शक्यता जाणून पापी वृत्तीच्या लोकांना आपलीं दुष्टकर्में करण्याविषयीं धाक बाळगावा लागत नाहीं.

या सवलतींत आणखी एक सवलत ब्राह्मणांच्या अनुष्ठानाचें पुण्य विकत घेण्याची आहे. पापाच्या व्यवसायांत दंग रहाणारांनीं ब्राह्मणांना निरनिराळ्या अनुष्ठानांत गुंतवून दक्षिणेनें तृप्त ठेवलें कीं पापकर्त्यांची जबाबदारी संपली, वाटेल त्या पापाचें परिमार्जन आपल्या अनुष्ठानानें करणाऱ्या द्रव्यलोभी ब्राह्मणांना इतर सर्वांहून नीच कां समजूं नये, अशा अर्थाचा रोकडा सवाल लोकहितवादींनीं एका ठिकाणीं विचारला आहे.

ब्राह्मणांचा जो व्यवहार आपली लेखणी उचलण्याच्या वेळीं लोकहित-वादींनीं पाहिला, अनुभवला त्याला अनुलक्षून त्यांनीं ब्राह्मणांची निर्भत्सना केली हें विसरून चालणार नाहीं. ब्राह्मणांनीं जें करावें म्हणून लोकहितवादींनीं कंठशोष केला तेंच पुढें ब्राह्मण आपोआप करूं लागले. आज वेदोक्त आणि पुराणोक्त अशा साऱ्याच कर्मांवर ब्राह्मणांनीं तिलांजलि दिली आहे. परंतु लोकोद्धारक कार्याचा पुढाकार ब्राह्मणांनीं मार्गदर्शक होऊन घ्यावा, ही लोक-हितवादींची मनीषा त्यांच्या हयातींतच सफल होत असल्याचें त्यांना पहायला सांपडलें. त्यांनीं लेख लिहिले, त्यानंतर थोड्याच वर्षांनीं विधवाविवाहाची

चळवळ उदयास येऊन तिनें सारा महाराष्ट्र खळबळून सोडला. ईश्वर निराकार, सर्व माणसें समान, अशा तत्त्वांचा प्रार्थना-समाज अस्तित्वांत आला, पुढें जोतीबा फुल्यांचा सत्यशोधक समाज निघाला, त्यांच्या मागून वेदाचें निशाण उभारून लोकांच्या धर्मव्यवहारास नव्या मन्वंतराला शोभणारें नवें वळण लावूं पहाणारा दयानंदस्वामींचा आर्यसमाज जन्मास आला. ब्राह्मणांनीं स्वार्थ-त्यागाच्या जोरावर नव्या शिक्षणसंस्था काढल्या; हळूहळू नव्या विद्येसंबंधीं जास्त जास्त ग्रंथनिष्पत्ति होऊं लागली. ऋषींची परंपरा खुंटल्यावर प्राचीन काळीं प्रश्न पडला कीं, आतां विद्येची वृद्धि कशी होणार, धर्मव्यवहाराचें नियंत्रण कोण करणार, लोकप्रगतीला चालना कोण देणार ? त्याला देवांकडून उत्तर मिळालें कीं, ऋषी गेले म्हणून भिण्याचें कारण नाहीं. मनुष्यानें बुद्धिवादाला-तर्काला ऋषि समजून त्याच्या प्रेरणेने जें इष्ट, उचित व अवश्य वाटेल त्याचा निःशंकपणें अंगीकार करावा. अशा रीतीनें वागल्यास लोकांच्या कल्याणाची परंपरा अखंड राहील. लोकहितवादींनीं ही प्राचीन कथा पुढें एका ग्रंथांत लिहून "ऋषि गेले पुढें काय ?" या चिंतेचें समर्पक निवारण केलें आहे. ही कथा लिहितेवेळीं टिळक-आगरकर कॉलेजांतील विद्यार्थी होते; चिपळूणकरांची निबंधमाला नुकतीच गुंफली जाऊं लागली होती. कालमानाचें असें अनुसंधान बाळगून लोकहितवादींच्या १८४८-५० सालांतील विचारांचें परिशीलन केल्यास त्यांच्या नवयुगोचित मार्मिक दूरदृष्टीबद्दल शंका रहाणार नाहीं.

## दैववाद व कलियुग

दैववादानें अडाणी व शहाण्या जनतेच्या चित्तावर पगडा बसविला आहे व तो उद्धारयत्नाच्या आड येत आहे, अशी लोकहितवादींची खात्री झालेली होती. जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य किंवा जातिभेद हा या दैववादाचा प्रबळ घटक असून कलियुगाचा सिद्धांत या दैववादाचे यथेच्छ पोषण करीत आहे, या गोष्टी त्यांच्या अभ्यासांतून निसटलेल्या नव्हत्या.

राज्य कां गेलें तर "उच्चैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण" अशा अर्थाचें उत्तर लोकांकडून ठेवलेलें. जो ज्या जातींत जन्मास आला, त्याला त्या जातीच्या मागें लागलेल्या उद्योगाबाहेर निघण्याला सवड नाहीं, त्या जातींत

जन्मास येणें हें दैवघटित आहे. त्याविरुद्ध तक्रार करण्यांत हंशील नाहीं. त्यानें आपल्या नशिबाला दोष देत आपल्या जातीची अवदशा मुकाट्यानें सोसावी. या दैववादानें समाजाच्या चिरफळ्या केल्या. समाजाचा एकोपा नाहींसा केला. बुद्धीचा पराक्रम खुंटविला. कलियुगाच्या थोतांडानें तर आपल्या अपकर्षाचा विचार करण्याची जरूरीच ठेवली नाहीं.

या युगांत अपकर्ष व्हावयाचा असा जणूं काय निसर्गाचाच नियम आहे याचा विचार करीत असतां लोकहितवादींनीं कलियुगाची कल्पना बौद्ध काळांत निघाली असावी असा एक तर्क दिला आहे. प्राचीन ग्रंथांतून कृत, त्रेता, द्वापर, कलि अशीं नांवें आहेत. मग बौद्धकाळांत कलियुगाचा प्रादुर्भाव लोकमानसांत शिरून दृढ होण्याचें कारण दिसतें तें असें कीं, आईबाप व मुलें, नवराबायको, भाऊभाऊ, स्वामीसेवक यांच्यांत वेबनाव होण्याचा प्रसंग बौद्धामुळें उत्पन्न झाला. बायकोला नवऱ्याच्या, मुलाला आईबापांच्या, भावाला भावाच्या, सेवकाला स्वामीच्या इच्छेविरुद्ध बौद्धधर्माची दीक्षा घ्यावीशी वाटल्यास कलह व्हावा हें स्वाभाविक आहे. यज्ञ, चातुर्वर्ण्य या समजुतींचें बौद्धांनीं उच्चाटन चालविलें होतें. समाजांतील श्रेष्ठकनिष्ठ हे भेद गेल्यास कोणत्या जातींतील व्यक्ति कोणत्या उच्चपदाला जाईल याचा भरंवसा उरला नाहीं. पुराणांतील कलियुगाच्या वर्णनांत हे सारे तपशील असल्यामुळें बौद्धांच्या प्रभावाशीं पुराणकारांनीं कलियुगाची सांगड घातली. लोकहितवादींनीं प्राचीन ग्रंथांतील एका वचनाच्या आधारें जेव्हां लोक उद्योग सोडून आळशी बनतात तेव्हां कलि मातला असें समजावें, अशी कलियुगाची माहिती देऊन जेव्हां माणसें उद्योगशील होतात तेव्हां कृतयुग लाभतें असा त्याच वचनांतल्या अर्थानें कलि कल्पनेला पळवून लावून कृतयुग निर्माण करण्याचा आशावाद लोकांना सांगितला. मनुष्य प्रयत्न करील तर दैवाला मागें हटवील आणि जातिभेदाचे तट पाडून वाटेल तेवढी उन्नति गांठील अशा तऱ्हेच्या आशावादाच्या निरूपणांत त्यांनी मायावादाचाही समाचार घेतला आहे.

आपल्यांतील फूट मोडावी, समाज संघटित व बलिष्ठ व्हावा, याकरितां श्रेष्ठ–कनिष्ठ भाव लयास नेणारी समता नांदावी; खऱ्या कर्तबगारीला अडथळा करणाऱ्या आळसाला व द्रव्याच्या अपव्ययाला उत्तेजन देणाऱ्या धर्माच्या आणि रूढीच्या नांवावर खपणारे नानाविध भ्रम अंतरंगांतून झाडून टाकून लोकांनीं

देशपर्यटण करावें; नव्या विद्या, नव्या कला संपादाव्या आणि आपली सर्व तऱ्हेची गुलामगिरी—त्यांत राजकीय गुलामगिरीसुद्धां आली—नाहींशी करावी हा लोकहितवादींच्या ब्राह्मणनिंदेचा उद्देश स्पष्ट आहे.

## स्वदेशीचा पुरस्कार

राजकीय दास्यांतून सुटण्याच्या धोरणानेंच त्यांनीं लोकांना स्वदेशांत उद्योगधंद्यांची कारखान्यांची वाढ करण्याचा उपदेश चालविला होता. जेव्हां आगगाड्या, तारायंत्रें, गिरण्या यांचा हिंदुस्थानांत उपक्रम झालेला नव्हता तेव्हां स्वदेशीचा उपदेश व तोहि इंग्रजांचें सामर्थ्य क्षीण व्हावें म्हणून लोकहितवादींनीं करावा, ही गोष्ट आश्चर्य वाटण्याजोगी आहे. १८७१–७२ सालीं न्या. रानडे यांनीं हा विषय लोकांच्या गळीं उतरवण्यासाठीं त्याचें विस्तारानें निवेदन केल्या-वर स्वदेशीचें व्रत कित्येकांनीं घेतलें. पुढें १८९४ मध्यें या व्रताचा पुरस्कार एकदां सार्वजनिक सभेमार्फत झाला. १९०५ मध्यें वंगभंगाच्या क्षोभानें त्या व्रताला देशव्यापी स्वरूप आलें. ह्या व्रताची आवश्यकता लोकांना पटून त्याची उत्कटता वाढली तेव्हां ह्या व्रताचा स्वीकार ज्या शब्दांनीं आणि युक्तिवादानें लोकांनीं केला त्याचें सार लोकहितवादींच्या तत्संबंधी विवेचनांत दृष्टीस पडणारें आहे. इंग्रजांनीं विद्या (ब्राह्मण्य), शिपाईगिरी (क्षत्रियत्व), व्यापार (वैश्यत्व) असें त्रैवर्णिकत्व आपल्या हातीं राखून सर्व हिंदी जनतेला शूद्र बनविलें. तरीसुद्धां ब्राह्मणांमध्यें स्पर्शास्पर्शविचार जाज्ज्वल्य आहे. त्यांना आपण ब्राह्मण म्हणून इतरांचा स्पर्श सहन होत नाहीं. अशा विवरणाच्या भरांत लोक-हितवादींनीं म्हटलें आहे कीं, ब्राह्मणांनीं स्वतःपुरता सोवळेपणा काय संभाळला असेल तो असो. देशाला राजकीय दास्याचा विटाळ न होऊं देण्याची त्यांनीं खबरदारी घेतल्याचें अलिकडच्या इतिहासांत एकसुद्धां उदाहरण नाहीं. देशाचें कांहींही होवो, आपलें सोंवळें व पोट चालावें एवढीच त्यांची दृष्टि आहे. आतां त्यांनीं हा मनाचा संकुचितपणा टाकून देश संपन्न कसा होईल याची काळजी वहावी. यावर उद्योगधंद्यांना मोठें भांडवल पाहिजे, तें कसें उभें करावयाचें या प्रश्नाला लोकहितवादींचें उत्तर आहे कीं, दागदागिन्यांत, ख्यालीखुशालींत, व्रतानुष्ठानांत, लग्नसमारंभांत जो पैसा अनाठायीं जातो, तो जाऊं न दिल्यास भांडवलाची उणीव पडणार नाहीं. या बाबतींत त्यांचा कटाक्ष इनामदार जहा-गीरदार व देशी राजेवाडे यांच्यावर जास्त होता.

## एक वृथारोप

इंग्रजांच्या गुलामगिरींत आपण सदैव नांदावें, असें लोकहितवादींच्या मनांत कधींच आलें नाहीं. तरीसुद्धां ते इंग्रजधार्जिणे होते, असा प्रवाद त्यांच्या-विषयीं वारंवार उच्चारला जातो.

त्यांनीं इंग्रजांची प्रशंसा वेळोवेळीं केली आहे व हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य ही ईश्वराची कृपा होय, अशा अर्थाचीं विधानें त्यांच्या लेखांतून आहेत; परंतु, इंग्रजांचें राज्य ही ईश्वराची कृपा, या विधानाचा संदर्भ पाहिल्यास आपल्याला जागृत व सज्ञान होण्याची संधि इंग्रजी राज्यानें मिळाली, हीं ईश्वरी कृपा, असें त्यांचें मनोगत स्पष्ट झाल्याशिवाय रहात नाहीं. या संधीचा फायदा आपण घ्यावा आणि शहाणे होऊन इंग्रजांना येथून जायला भाग पाडावें, हा त्यांच्या मनांतला भाव मुद्दाम शोधावा असा संदिग्ध नाहीं, अगदीं उघडा आहे.

प्रत्येक कामांत इंग्रजाला शरण जाण्याची लोकांना लागलेली संवय त्यांना रुचत नव्हती; याचें प्रत्यंतर स्वाध्याय पुस्तकाच्या एका परिशिष्टांत आहे. कित्येक संस्थानिकांनीं इंग्रजांना कारभारी नेमलें, एका गुजराथी गिरणीमालकानें आपल्या मॅनेजराचें काम इंग्रजाला दिलें, याचा उल्लेख करून उठल्यासुटल्या इंग्रजांच्या तोंडाकडे पहाण्याची खोड अनिष्ट असें लोकहितवादींनीं इंग्रजांच्या नशिबाचें कौतुक करीत सुचविलें आहे. इंग्रज लोकांचें राज्य आज ( त्याकाळीं ) नाहींसें करावें असें कोणी म्हणत असल्यास त्याला लोकहितवादींकडून नकारार्थी उत्तर दिलें गेलें आहे व यासाठीं लोकहितवादींना दोष लावतां येणार नाहीं. कॉंग्रेस निघाल्यानंतर कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांकडून इंग्रजांना ' चलेजाव ' असें सांगण्याची वेळ सुमारें ६० वर्षांनीं आली. आपल्या अंगीं आजकालच्या सर्वमान्य पद्धतीनें राज्य चालविण्याची पात्रता आहे असा आत्मविश्वास उत्पन्न झाला कीं, आपण इंग्रजांचे वर्चस्व झुगारून देऊं असें लोकहितवादीसुद्धां म्हणत होते. तसा आत्मविश्वास वाटण्याची स्थिति लोकहितवादींच्या हयातींत नव्हती, हें जहाल समजल्या जाणाऱ्या ' केसरी ' च्या अनेक लेखांतून दाखवितां येईल. यामुळें कॉंग्रेसच्या आधींच्या काळांत इंग्रजांना हिंदुस्थान सोडावें लागल्यास देशाचें नुकसान होईल, असा खणखणीत सूर त्यांच्या लेखांतून निघावा यांत विशेष तें काय आहे? परंतु त्यांच्या मताचा विपर्यास आजवर

चाललेला असल्यामुळें ते इंग्रजधार्जिणे होते हा प्रवाद कायम राहिला आहे. लोकहितवादी हे स्वराज्यवादी किंबहुना महाराष्ट्रांतलेच नव्हे तर हिंदुस्थानांतले पहिले स्वराज्यवादी होते. हिंदुस्थान देश आपल्या शहाणपणानें स्वराज्यसंपन्न होईल याबद्दल त्यांना शंका नव्हती व तसें मनोगत प्रकट करण्यालाहि ते कचरलेले नाहींत, हें ध्यानांत बाळगल्यास त्यांच्यावरील इंग्रजधार्जिणेपणाच्या वृथारोपाचें निराळें खंडन नको. १८४८–५० या वर्षांत लोक शहाणे व्हावे असें लोकहितवादी ज्या अर्थानें म्हणत होते त्या अर्थानें लोक शहाणे होऊं लागल्याचा थोडासा अनुभव दृष्टीस पडतांच 'आपला देश लवकरच उन्नत होऊन साऱ्या आशिया खंडाचा पुढारीपणा पटकावील' अशी त्यांच्या ध्येयवादानें उडी मारण्याचा दाखला त्यांच्या १८८० सालांतील ग्रंथांतून सांपडतो. इंग्रज स्वेच्छेनें स्वराज्याचें दान करतील असा समज करून घेण्याइतके लोकहितवादी अडाणी नव्हते. हक्कांसाठीं भांडावें लागेल, कदाचित् लढावें लागेल व तसा प्रसंग आल्यास लोकांनीं भांडावें, लढावें; अन्याय सोसण्याचा मुर्दाडपणा दाखवूं नये, असा लोकहितवादींचा आग्रह अनेक स्थळीं व्यक्त झालेला आहे. प्राचीन काळीं वेन, नहुष वगैरे उन्मत्त राजांचें लोकांनीं पारिपत्य केल्याचीं उदाहरणें त्यांनीं दिलेलीं असल्यामुळें स्वराज्यप्राप्ति व तिचीं साधनें याबद्दलच्या त्यांच्या कल्पना उलगडायला अवकाश लागत नाहीं. त्यांच्या लेखांतून राज्यशास्त्राचा जो ऊहापोह इतस्ततः आलेला आहे, त्या सर्वांचें संकलन येथें करणें शक्य नाहीं. ते जगांतील ऐतिहासिक व चालू राजकीय उत्क्रांतिउत्पातांचें निरीक्षण करून आपलीं मतें बनवीत व सांगत असल्याची साक्ष त्यांच्या लेखांतून भरपूर आहे.

## समाजसुधारणा

समाजसुधारणेच्या बाबतींत आज जें परिवर्तन दृष्टीस पडत आहे, त्याचा तपशीलवार पुरस्कार त्यांच्या लेखांतून पहायला सापडतो. बालविवाह, विधवावपन असल्या गोष्टींचा तीव्र निषेध करून विधवाविवाह, प्रौढ विवाह, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, जातींची समानता, पतितपरावर्तन या कार्याचें गौरवपूर्वक पुनः पुनः अट्टाहासानें त्यांनीं मंडन केलेलें आहे. विद्या, शिपाईगिरी, व्यापारउद्योगधंदे व मोलमजुरी अशा चार मुख्य व्यवसायांचे चार समाजविभाग आहेत; ते

जन्मावर अवलंबून आहेत ही भावना सोडल्यास निरनिराळ्या जातींत बेटी-व्यवहार सुरू होईल, ही भीति व्यर्थ असल्याबद्दल लोकहितवादींनी दिलेलें उत्तर याच विषयांबद्दल म. गांधींनीं व्यक्त केलेल्या विचारांशीं अतिशय जुळणारें आहे.

लग्नें ही बुद्धीनें, संस्कृतीनें व रोजच्या राहणीनें समान पातळीवर असले-ल्यांची होतात. सर्व जाती एक या सिद्धान्तानें व्यवहारांतून जातिभेदाचे प्रस्थ उठलें म्हणून वधूवरें एकमेकांच्या बौद्धिक व सांस्कृतिक उन्नतीविषयीं डोळेझांक करून लग्नें लावतील, अशी शक्यता वाटत नाहीं, असा म. गांधींचा खुलासा आहे. लोकहितवादींनीं जवळ जवळ असाच आशय लिहिलेला आहे– "ब्राह्म-णांनीं रामोश्याची सोयरगतच करावी काय? तर असें नव्हे. साधारण असें कधींही होणार नाही. ते ब्राह्मणांतच बहुधा सोयरगती करतील. ब्राह्मणाची सोय-रीक मिळेल ती टाकून बळेंच परिटाचे घरांत शिरणें जरूर नाहीं. ज्या लोकांमध्यें जाती नाहींत त्याजमध्येंही असें कोणी करीत नाहीं. ब्राह्मणांत देशस्थ, कोंकणस्थ पळसे, कुडाळे, जौळ, खिस्ती, तिरगूळ, कराडे, किरवंत, शेणवी, असे भेद आहेत ते जाऊन परस्पर विवाहाची सरहा मोकळीक असावी," असें म्हटल्या-वरही लग्नें कशीं होतील याचें पुनश्च सांपडणारें स्पष्टीकरण असें आहे:– "बहुधा जो तो आपले जातीची आणि आपले देशाची मुलगी करील. जरी प्रतिबंध नसला तरी दक्षिणचा रहाणारा गुजराथ्याची मुलगी करणार नाहीं हें उघड आहे."

येथें लोकहितवादींच्या १८४८–५० या वर्षांतील विचारांचा जास्तींत जास्त अनुवाद केलेला आहे. त्या काळांत विधवाविवाहाची वाच्यता होऊं लागली होती. बाला–वृद्धविवाह, अनेकपत्नीकत्व, बालविवाह यांना प्रतिबंध नव्हता. मुलामुलींचें शिक्षण अगदीं कोवळ्या अंकुरावस्थेंत होतें. विद्यापीठांच्या उदयाला फार अवकाश होता. स्त्रीस्वातंत्र्य, प्रौढविवाह हे प्रकार लोकदृष्टीच्या आटोक्यांतही नव्हते. अशा दिवसांत भविष्यद्रष्ट्या पुरुषाप्रमाणें लोकहितवादी जें जें बोलून गेलें त्याची सफलता आजच्या दैनंदिन जीवनांत इतकी भरून गेलेली आहे कीं, तिचें लांबलचक वर्णन करण्याची जरूरी नाहीं. ज्यावेळीं इंग्रजांची तरवार व राज्यतृष्णा ही हिंदुस्थानांत व अन्यत्र नवे नवे प्रदेश पादाक्रांत करीत होती, त्यावेळीं इंग्रजांचें राज्य आपल्या शहाणपणानें जाईल, आणि पार्लमेंटरी धर्तीचें स्वराज्य होईल हें भाकित लोकांनीं पाहूं नये व दृष्टीस

पडलें तर त्याची उपेक्षा करावी, कधीं विचार करावा लागलाच तर ते भाकित वेड्याचें बरळणें ठरवून लोकहितवादींना शक्य तेवढें उपहासावें हेंच त्या कालांतील एकंदर लोकस्थितीला शोभणारें होतें. लोक जसे धर्मश्रद्धेनें यात्रास्थानीं प्रचंड समुदायानिशीं दरसाल जमतात तसें त्यांनीं ऐहिक अभ्युदयाच्या विचाराकरितां जमावें ही लोकहितवादींची कल्पना पुढें राजकीय, सामाजिक व औद्योगिक कार्यानिमित्त मूर्तावस्था पावली. प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज, आर्यसमाज यांचा अवतार धर्मसुधारणेसाठीं झाला.

जेव्हां यांपैकीं कांहींच नव्हतें तेव्हां हें व्हावें, नव्हे होईल असें निश्चयानें सांगणाऱ्या पुरुषाची थोरवी जोखण्याचा काळ आतां आला आहे. जो ज्ञानप्रकाश लोकहितवादींच्या प्रेरणेनें निघाला व जो त्यांनीं पहिलीं चार वर्षे चालविला, त्याला यंदा ( १९४९ ) शंभर वर्षे झालीं. लोकहितवादींनीं हिंदुस्थान देश स्वराज्यसंपन्न होईल, असा निश्चित आशावादाचा अभिप्राय महाराष्ट्रांत जाहीर केल्यालाही यंदा शंभर वर्षे झालीं आहेत. या दोन कारणांसाठीं लोकहितवादींच्या पुण्यस्मरणाचें यंदा सन १९४९ विशेष महत्त्व आहे.

———

# लोकहितवादींच्या शतपत्रांचें पृथक्करण

## इंग्रजी राज्याचा परिणाम

गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांचें मराठींत लेखन सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्रांत ज्ञानार्जनाच्या दृष्टीनें जी स्थिति उत्पन्न झाली होती तिचें आकलन केल्याशिवाय लोकहितवादींच्या संपूर्ण मनोगताची यथार्थ कल्पना होणार नाहीं. इंग्रजी राज्याची चोहोंकडील कायदेबंद व्यवस्था हेंच लोकांना विचार करावयास लावणारे एक मोठें सामर्थ्य होतें. इंग्रज राज्यकर्तें कोणतेंही नवें काम करण्यापूर्वी त्या संबंधाचा एक कायदा ठरवून टाकीत असत व त्या कामाचा प्रत्येक तपशील अशा कायद्यावर बोट ठेवून अमलांत आणीत असत. त्यांच्या राज्यकर्तृत्वामागें कायदा होता तो कायदा अर्थात् इंग्लंडांतील पार्लमेंटनें मान्य केलेला होता; परंतु हिंदुस्थानांत वेळोवेळीं राज्यव्यवहारांत व लोकव्यवहारांत जे फेरबदल घडत तेही प्रथम कायदा, नंतर फेरबदल अशा क्रमानें लोकांच्या अनुभवास येत. लोकव्यवहाराच्या मागें रूढीचें, परंपरेचें किंवा स्मृतिशास्त्राचें बळ असलें तरी इंग्रजांना त्या व्यवहारांतील जीं अंगें माणुसकीला न शोभणारी दुष्ट क्रूर, अशी वाटलीं त्याचा परिहार इंग्रजांनीं बऱ्याच मोठ्या प्रमाणांत चालविल्यामुळें हे लोकव्यवहाराचे फेरबदल विचारवंताची दृष्टि अंतर्मुख करण्याला कारणीभूत व्हावे यांत नवल नाहीं. इंग्रजांनीं सरकारी खर्चानें लोकांना विद्या प्राप्त करून घेण्याची जी व्यवस्था केली, तिचें विशिष्ट स्वरूप भारतीय इतिहासाला अगदीं अपरिचित होतें. लोकांना सज्ञान करण्याची जबाबदारी सरकारची आहे हें तत्त्व प्राचीन भारतीय संस्कृतींत अप्रत्यक्ष होतें तें इंग्रजी राज्यांत प्रत्यक्षावस्थेस आलें. मध्यंतरीं इंग्रजी राज्यापूर्वी हजारपंधराशें वर्षें त्या तत्त्वाला विस्मृतीनें ग्रासलेले होतें. इंग्रजींच्या विद्यादानपद्धतींत केवळ जुन्या शास्त्रांच्या अध्यापनाचा समावेश नव्हता. पाश्चात्य देशांत निसर्गाच्या संशोधनानें सुधारून उदयास आलेली खगोल, भूगोल, रसायन, पदार्थविज्ञान वगैरे

शास्त्रें शिकविण्याच्या तजविजीमुळें जुन्या संस्कृत पुस्तकांतील भूगोल, ज्योतिष वगैरेसंबंधीं कल्पना चुकीच्या आहेत, असें गळीं उतरून पर्यायाने सर्व जुन्या ज्ञानाबद्दल शिकणारांची म्हणजे नव्या पिढीची मनें साशंक होऊं लागावीं यांत नवल नाहीं. सरकारी शाळांतून असल्या साशंकतेला प्रोत्साहन दिले जात नव्हतें, पण ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या शाळांतून हिंदूनी स्वधर्मावरील श्रद्धा सोडावी असा उघड प्रयत्न होत असे; शिवाय हे ख्रिस्ती धर्मप्रसारक उघडपणें लोकांपुढें जे उपदेशाचे पट्टे सदैव चालवीत त्यांचा परिणाम जिज्ञासू जनतेवर झाल्याशिवाय रहात नव्हता.

## लोकहितवादींचें ज्ञानार्जन

/ लोकहितवादींच्या विचारसरणीचें परीक्षण करूं लागल्यास त्यांच्यावर या सर्व गोष्टींचा प्रभाव पडल्याचें सहज दिसून येणारें आहे. परंतु त्यांनीं स्वतःच्या उद्योगाने चौफेर ज्ञानार्जन केल्याचा पुरावा त्यांच्या शतपत्रांत आहे. त्यांनीं इंग्रजी भाषेंतील त्या काळांत उपलब्ध होणारे विविध विषयांचे ग्रंथ तर वाचलेच होते. पण आपल्याकडील संस्कृत, प्राकृत ग्रंथभांडारातही त्यांचा संचार असल्याबद्दल त्यांची पत्रें सूक्ष्म दृष्टीनें वाचणारांना शंका रहाणार नाहीं. स्मृति, गीता, तुकाराम, नामदेव, कबीर यांचे लोकोपयोगी सयुक्तिक विचार लोकहितवादींनीं आत्मसात् केले होते. न्याय, मीमांसा वेदांत, धर्मशास्त्र यांचाही त्यांना परिचय होता. पुराणें स्थळांची वा तीर्थांचीं माहात्म्यें त्यांच्या कानावरून अथवा नजरेखालून गेली असल्याच्या खुणा तर त्यांच्या बहुतेक लेखांतून आढळणाऱ्या आहेत. सामाजिक अवनति त्यांच्या डोळ्यासमोर होती. ही ज्ञानाची सिद्धता त्यांनीं वयाच्या पंचविशींत केली हें ध्यानांत ठेवण्यासारखे आहे.

लोकहितवादींच्या विद्यार्थिदशेंत पुणें शहर सगळ्या बाजूंनीं मागासलेले होतें. त्याचा विस्तार लहान होता, दळणवळणाच्या सोयी चांगल्या नव्हत्या. छापखाने, वृत्तपत्रें, नवीं नवीं पुस्तकें ज्ञान पुरविणारी व्याख्यानें, सभा, चर्चा या सर्वांचा अभाव होता. वृत्तपत्रें नव्हती, अर्थात् छापखान्यांचा उदय व्हावयाचा होता. शालोपयोगी पुस्तकांखेरीज इतर उपयुक्त पुस्तकें मराठींत निघालेलीं नव्हती. सभा, व्याख्यानें, सार्वजनिक हितांच्या प्रश्नांची चर्चा हे

प्रकार लोकांत रुजविणाऱ्या विद्वानांचा काळ तेव्हां सुरू झालेला नव्हता. अशा स्थितींत लोकहितवादींनीं जें ज्ञान मिळविलें तें कोणासही आश्चर्यकारक वाटण्याजोगें आहे. आपले इंग्रज गुरू, मधूनमधून भेटणारे विद्वान् अधिकारी, त्याचप्रमाणें मिशनरी यांच्या संग्रहांतील पुस्तकें, यांच्या साहाय्यानें त्यांनीं हें ज्ञान मिळविलें व पुढें लोकोद्धाराला अवश्य असणारीं प्रमेये अंतःकरणांत विकसित होऊन तीं स्वस्थ बसूं देत नाहींत, असा अनुभव आल्यावर लोकहितवादींनीं मुंबईच्या 'प्रभाकर' पत्रांत आपलें लेखन सुरू केलें. सर्वसामान्य जनतेला अनुलक्षून एकूण १०० पत्रें लिहावयाचीं असा त्यांचा संकल्प होता हें शेवटच्या लेखावरून स्पष्ट आहे. हें काम दोन वर्षे चाललें होतें. या शतपत्रांतील सर्व विचारांचें पृथक्करण व संकलन करण्याचें काम सोपे नाहीं. प्रत्येक लेखांत बरीच पुनरुक्ती असली तरी एखादा विचार नवा असतो. यामुळें येथें स्थूल दिग्दर्शन केले आहे.\

## कटाक्षाचा मुख्य विषय

\धर्माचार आणि धर्मानें अस्तित्वांत आलेली सामाजिक स्थिती या दोन गोष्टींवर लोकहितवादींनीं हल्ला चढविला आहे. धर्मकर्मांची महती गाऊन लोकांच्या भाबडेपणाचा फायदा घेणाऱ्या भटभिक्षुकशास्त्रीवर्गावर त्यांचा अतिशय प्रखर कटाक्ष होता. लोकहितवादींनीं हे लेख लिहिण्याच्या सुमारास अर्थशास्त्राचें वाचन केल्यामुळें त्याच्या अनुरोधानें समाजशास्त्राचेंही थोडें ज्ञान त्यांना झालेलें होतें. त्यास अनुसरून रोजच्या रोज तिथिवारान्वयें चालणाऱ्या धर्मकृत्यांचा सामाजिक उपयोग किती होतो व अस्थानीं अपात्रीं धर्मकृत्यांनिमित्त खर्चीं पडणारा पैसा किती फुकट जातो याची विवंचना मनांत येऊन त्यांची खात्री झाली कीं, हा पैसा कोणत्याहि प्रकारें समाजाला लाभदायक नाहीं. हीं धर्मकृत्यें करणारे प्रामुख्यानें पुणें शहरांतील ब्राह्मण असल्यामुळें लोकहितवादींनीं त्यावरच हत्यार धरलें. ब्राह्मण जातीचा द्वेष त्यांच्या विचारसरणीमध्यें नसून ब्राह्मणांच्या दुराराध्य मूर्खपणावर त्यांनीं कडक ताशेरा झाडला आहे. ब्राह्मणांनीं आपला मोठेपणा सर्व समाजाच्या हितार्थ वेंचण्याऐवजीं आपली तुंबडी भरण्याकडे योजल्यामुळें होणारी समाजाची अज्ञानवृद्धिरूप हानि लोकहितवादींना सोसवत नव्हती;

म्हणून त्यांनीं ब्राह्मणांवर झोड उठविली. ब्राह्मण हाच काय तो थोडाबहुत सज्ञान व समंजस असल्यानें प्रथम त्याच्या डोळ्यांत अंजन घालणें भाग होतें. हें अंजन योग्य होतें हें आतां काळानेंच सिद्ध केलेलें आहे, तथापि त्यांना पुण्यांतील लोकस्थिति अर्थात ब्राह्मणांची स्थिति कशी दिसली याचा आढावा घेणें उचित होईल. ब्राह्मणांचे साधारणपणें तीन विभाग होते. एक जहागीरदार इनामदाराचा, दुसरा नव्यानें जन्मास आलेल्या सरकारी नोकरांचा व तिसरा शास्त्रीभटांचा.

## श्रीमंतांचीं हालहवाल

श्रीमंत म्हटला कीं शेंपन्नास माणसांना पोसणारा पाहिजे, असा जणूं काय विधिसंकेतच. या फुकटखाऊ शेंपन्नासांत आप्तमंडळी, कित्येक भट, शास्त्री, पंडित, कथेकरी, पुराणिक व वैद्यही असायचेच. लोकहितवादींनीं आपल्या पहाण्यांतल्या एका श्रीमंताचें वर्णन केलें आहे. हा श्रीमंत अक्षर-शत्रु मूर्खशिरोमणि होता, तरी प्रत्येकजण त्याची अतोनात स्तुति करी. त्याची बुद्धि विशाल आहे, प्रत्येक विषय त्याला कळतो, तो दैवशाली आहे, असल्या प्रशंसेनें त्याचा मूर्खपणा हे फुकटखाऊ वाढवीत असत. त्यांचें वय २५ वर्षांचें असतां पुत्र नाहीं म्हणून दहा दहा ब्राह्मण अनुष्ठानें करीत बसत असत. शिवाय त्यानें दुसरें लग्न करावें यासाठीं सल्लामसलत दिली जात होतीच.

एकत्र कुटुंबपद्धति हे लोकांत आळस वाढवण्याचें कारण, असा एका लेखाच्या आरंभीं ( ८७ ) एक सिद्धांत मांडला आहे.

कर्नाटकांतील एक सरदार दिवसांतून दोनशें वेळां पाय धुतो, पांचशें वेळा चूळ भरतो ( ६१ ) अशी आणखी कांहीं उदाहरणें त्याच्या लेखांत आहेत. श्रीमंत वर्ग ज्ञानाला विन्मुख; आळसाचा, ख्यालीखुशालीचा व डामडौलाचा भोक्ता बनलेला होता, तरी आपल्या मूर्खपणाला चिकटून रहाण्यांत त्याला भूषण वाटत होतें.

## नव्या ज्ञानाबद्दल औदास्य

लोकहितवादींच्या शतपत्रांतील पहिला लेख ' पुण्यांत लायब्ररीची स्थापना ' या नांवाचा आहे. ही लायब्ररी ता. ७ फेब्रुवारी १८४८ रोजीं स्थापन

झाली. तेव्हांच्या गव्हर्नरानें स्थापनेला प्रेरणा दिली व कोणी ब्रौन या नांवाचा न्यायाधीश होता, त्यानें पैशाची मदत केली असावी. एकंदर वर्गणी सुमारें १५०० रुपये जमली. ही थोडी म्हणून लोकहितवादी म्हणतातः—' सरदार लोकांनीं व कामदार लोकांनीं उदारपणानें पैसा दिला नाहीं... त्याचें कारण ज्ञानाचा उपयोग त्यांना समजत नाहीं. यामुळें या लायब्ररींत त्यापैकीं कोणी वाचावयास येत नाहींत. ' आम्हीं थोर, चार शिपाई, घोडे, अबदागिरी बरोबर घेतल्याशिवाय बाहेर कधीं पडत नाहीं. तेव्हां या लायब्ररींत मुलांसारखे शिकण्यास जावयाची त्यांस लज्जा वाटत असेल ...ज्यांस अन्न वस्त्र मिळते ते म्हणतात कीं, आम्हास विद्येची काय गरज आहे व ज्यास मिळत नाहीं ते पोटापाठीमागें लागतात. तात्पर्य अक्कल वाढविण्याचें काम कोणाच्यानें होत नाहीं. पेशवाईचे दिवस गेले, आता बाहेर काय आहे, हे समजून आपली नीट अवस्था कशानें होईल हें पहाण्याची वेळ आहे. '

या पहिल्या लेखांत ज्ञानार्जनाविषयीं जें मत लोकहितवादींनीं प्रदर्शित केलें तेंच सर्वत्र आढळतें. ब्राह्मणांवर कोरडे झाडले आहेत तें ब्राह्मणांनीं आत्मघातकी दुर्मतें स्वीकारलीं व काळ बदलला, दैन्य ओढवलें तरी त्या मताचा अभिमान ब्राह्मण सोडीत नाहींत यासाठीं आहेत. लोकहितवादींना ब्राह्मणांच्या निस्सीम हेकेखोरपणाचा जो अनुभव येत होता, त्याच्या चटक्यानें त्यांची लेखणी तापली होती म्हणून तिच्यांतून बाहेर आलेले शब्द फार जळजळीत वाटतात. आज ब्राह्मणांच्या स्थितीकडे पाहिल्यास लोकहितवादींच्या कडव्या बोलांचें आश्चर्य वाटेल. तेव्हांच्या चालीरीति व समजुती आतां पुष्कळशा नष्ट झाल्या असल्या तरी क्वचित त्या शिल्लक आहेत व त्यांचा अभिमानहि जिवंत आहे. यामुळें लोकहितवादींच्या युक्तिवादाची धार चांगलीच बोथटली किंवा त्याची उपयुक्तता सर्वस्वीं नाहींशी झाली असें म्हणतां येणार नाहीं.

## ब्राह्मणी श्रेष्ठतेची उपपत्ति

ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाची झडती घेतांना लोकहितवादींनीं अनेक प्रकारें मीमांसा केली आहे. ब्राह्मण हा विद्येस वाहिलेला लहानसा समुदाय

अनुक्रम ....७३८९७.... दि: १/०७६१
ग्रंथ ....२६६९.... नोंद दि: २५-२-६९

गांवाबाहेरच्या एकान्तामध्यें कसल्याही आधारावांचून राहात असतां त्याचें पालनपोषण दानानें करण्याची पद्धति उत्पन्न झाली. पुढें या वर्गाची संख्या वाढून त्यातल्या पुष्कळांनीं अध्ययनअध्यापनाऐवजीं दुसरे व्यवसाय पत्करले, तरी दानाचा ओघ आपल्याकडेच वळलेला रहावा म्हणून ब्राह्मणांनीं व्रतेंवैकल्यें निर्माण केलीं व त्याचा लोकांस नाद लावला. विद्येच्या जोरावर ब्राह्मणांना कांहीं निसर्गांतले ग्रहणासारखे प्रसंग आगाऊ सांगता येऊं लागल्यामुळें लोकांना त्या विद्येचा चमत्कार वाटून ब्राह्मणां-विषयीं आदर वाढला. पुढें त्यांनीं तो धर्माच्या नांवानें टिकवून धरला. अतिप्राचीन काळीं ब्राह्मण व शूद्र असा भेद नव्हता. प्राचीन काळीं ब्राह्मणसुद्धां मांसाहारी होते. शूद्राची विद्यार्जनामुळें ब्राह्मणांत व ब्राह्मणाची अक्षरशत्रुत्वामुळें शूद्रांत गणना होत असे. आतां जो शूद्र तो कायमचा शूद्र व जो ब्राह्मण तो कायमचा ब्राह्मण व तसाच तो दानामानास पात्र मग त्याचें वर्तन कसेंही असो. म्हणूनच गुणकर्मस्वभावानें आज ब्राह्मण या शब्दाची लाज राखणारी माणसें ब्राह्मणांत किती निघतील असा त्यांनीं प्रतिपक्षापुढें रोकडा सवाल टाकलेला आहे. गुणकर्मानुसार चार वर्ण जगांत नेहमीं पहायला सांपडतात असेंही त्यांनीं म्हटलें आहे.

## दारूबाजीचा निषेध

पुण्यांतल्या ब्राह्मणांचें त्यांनीं जें वर्णन केलें आहे, त्यावरून १८४८-४९ सालांत शाक्तमार्गाच्या दीक्षेचें नांव सांगून राजरोस दारू पिणारे, दारूच्या घाणीचा तोंडास भपकारा येणारे किंबहुना झिंगून गटारांत लोळतांना दिसणारे ब्राह्मण बरेच होते याबद्दल संशय उरत नाहीं. इंग्रजांनीं जो मद्यपानाचा प्रसार चालविला होता त्याचाही लोकहित-वादींनीं जोराचा निषेध केला आहे. यामुळें दारूबंदीच्या प्रवर्तकाचा मान त्यांच्याकडे जातो.

## देवळांची दुर्दशा

द्रव्यलोभानें ब्राह्मण अर्थात भटभिक्षुक कोणतें कुकर्म करतील याचा भरंवसा नव्हता. देवळें कसबिणीकडे भाड्यानें गेलेलीं, तेथें ब्राह्मण जसे पूजेअर्चेला मिळकतीसाठीं तत्पर तसेच कसबिणीच्या घरांतील देवळांतही

जाण्याला ते सिद्ध. कीर्तनपुराणांतही जमणारांची तऱ्हा पहावी तर केवळ देखाव्यासाठीं लोक जमतात. कीर्तनपुराणांतल्या उपदेशाकडे त्यांचें लक्ष नसतें, असें लोकहितवादींच्या दृष्टीस पडत होतें. देवळें हीं ईश्वराविषयीं पवित्र अनन्यभाव उत्पन्न करणारीं स्थळें नव्हतीं तर भ्रष्टाचारांचीं माहेरघरें बनलीं होतीं. भांग्या मारुती, छिनाल बालाजी, खुन्या मुरलीधर हीं नांवें देऊन एका ठिकाणीं लोकहितवादींनीं ब्राह्मणांच्या ईश्वरविषयक थिल्लर कल्पनांची ओळख करून दिली आहे. देवळांची अशी विपरीत दशा असतांही हजारो रुपये खर्चून पुण्यप्राप्त्यर्थ नवीं देवळें बांधण्याचा मोह लोकांना आवरत नाहीं याचा लोकहितवादींना अत्यंत विषाद वाटत होता. देवळें बांधण्यांत खर्ची पडणारा पैसा सपशेल वाया जातो, असें लोकहितवादींचें मत होतें.

## खरा दानधर्म

व्रतें, वैकल्यें, यात्रा, तुलादान, अभिषेक इत्यादि धर्मविषयक कल्पनांबद्दल त्यांनीं वारंवार म्हटलें आहे कीं, हे प्रकार ब्राह्मणांनीं आपलें उखळ पांढरें होण्यासाठीं उत्पन्न केले आहेत. असा पैसा उधळण्याऐवजीं जर तो लोकोपकारांत वेंचला तर खरें पुण्य पदरीं पडेल. देवळांत कापूर जाळून उजेड करण्याऐवजी जर अंधारांत काळ कंठणाराळा उजेड पुरविला, किंवा दगडाच्या मूर्तींपुढें नैवेद्य दाखविण्याऐवजीं जर भुकेल्याला त्याचा घास दिला तर त्या उजेडाचें व अन्नाचें सार्थक झालें असें म्हणतां येईल. हाच नियम त्यांनीं तिथिवारसणांच्या निमित्तानें दिल्या जाणाऱ्या दानांस लावला आहे. हीं दानें बहुधा निरुपयोगी असतात. म्हणजे त्यांचा घेणाराला कांहीं फायदा नसतो. तें दान पुष्कळदां पैसा वाया दवडण्यासारखें ठरतें. असलीं निरर्थक दानें करण्यापेक्षां गरीब विद्यार्थ्याला जर तें पैशाच्या रूपानें दिलें तर त्याला खरी मदत होईल व पैसा कारणीं लागेल, असें लोकहितवादींनीं अनेक लेखांतून निरनिराळीं उदाहरणें देऊन वारंवार सांगितलें आहे.

## जुन्या विद्या निष्फळ

जुन्या संस्कृत भाषेंतील विद्या आजच्या काळांत अगदीं टाकाऊ झाल्या आहेत. हें मत ज्यांत नाहीं असा लोकहितवादींचा बहुधा एकही लेख सांपडणार नाहीं. तेव्हांच्या अनेकांचें किंबहुना विष्णुशास्त्री चिपळूणकरांचेसुद्धां जुन्या

विद्येबद्दल असेंच मत आढळतें. लोकहितवादींनीं एका लेखांत जुन्या विद्यांची समग्र माहिती देऊन त्या विद्या आज कशा निष्फळ ठरतात हें दाखवून दिलें. या विद्या संस्कृतांत असल्यानें सामान्य जनतेला त्या समजत नाहींत. संस्कृत ग्रंथांचीं मराठी भाषांतरें झालीं पाहिजेत, असें त्यांचें हृद्गत पुनः पुनः प्रगट झालें आहे. लोकहितवादींच्या विचारसरणीप्रमाणें एकदां पांडवांच्या काळा-पर्यंत–विद्यांची अभिवृद्धि चालली होती, पुढें ही अभिवृद्धि बंद पडली आणि अर्थशून्य पाठान्तराची प्रथा सुरू झाली. असल्या घोकंपट्टीचा, तोंडाच्या मजुरीचा त्यांनीं तीव्र निषेध केला आहे. ज्याची घोकंपट्टी जास्त तो मोठा विद्वान, या समजुतीनें घोकण्याच्या पद्धतीचा उकर्ष घडला. व्याकरण, न्याय, सांख्य, वेदांत हीं शास्त्रें पढून त्यांच्या साहाय्यानें जे वादविवाद होतात, त्यांची निष्पत्ति पाहूं गेल्यास भरीव ज्ञानाचा लभ्यांश पदरीं पडतो असें म्हणतां येत नाहीं, भूगोल, इतिहास, राज्यव्यवहार, नीतिधर्म यांचा योग्य बोध ज्यापासून होत नाहीं तिला विद्या मानून तिच्या प्राप्तीसाठीं आयुष्याची बहुमोल वर्षें वायां दवडण्याऐवजीं इंग्रजी पुस्तकें वाचावीं, त्यांतील ज्ञान आपल्या लोकांना प्राकृत भाषेंत शिकवावें; आज इंग्रज आले कोठून, हिंदुस्थानची लांबी रुंदी किती, इतक्या साध्या प्रश्नांचीं उत्तरें देतां येत नाहींत. यासाठीं ज्या ज्ञानाच्या योगानें इतरांनीं आपल्यावर सरशी केली त्या ज्ञानाचा आपण आदर करण्यांतच आपलें कल्याण आहे, असें लोकहित-वादींनीं वारंवार म्हटलें आहे. इंग्रजांच्या सरकारी शाळांतील पंतोजी पोटभरू असल्यानें ते विद्यार्थ्यांना बुद्धि विकसित होईल असें शिक्षण देत नाहींत. यासाठीं पंतोजी तयार करणाऱ्या शाळा पाहिजेत अशी लोकहितवादींनीं मागणी केली आहे. इंग्रजी शिकून कारकुनी करणारांना लोकहितवादींनीं विद्वान म्हटलेलें नाहीं.

## इंग्रजी शिक्षणावरील खोटे आरोप

इंग्रजी शिकणारे नीतिशून्य, निर्दय, नास्तिक बनतात या आरोपांचा परामर्श घेतांना लोकहितवादी धर्म, नीति, ईश्वर या विषयांकडे वळले आहेत. परंतु त्याबद्दल त्यांचे स्वतंत्र लेखहि आहेत. हिंदुधर्मानें ईश्वर एक हेंच तत्त्व मान्य केलें आहे. याला आधार म्हणून त्यांनीं गीतेंतील एक वचन दिलें

आहे. देवाचा आदर हृदयांत असावा, त्या आदराचें संध्या, पूजा, जपजाप्य वगैरेंच्या रूपानें बाहेर स्तोम माजविण्याचें कारण नाहीं. घशाला कोरड पडेपर्यंत जप, पूजेच्या निमित्तानें तुळशी-फुलांचा संहार, असल्या उपायांनीं देव प्रसन्न होत नाहीं; असलीं सोंगें बहुधा भ्रष्टाचारांचीं माणसें जास्त करतात. ईश्वर हा बुद्धिगम्य आहे आणि विश्वाकडे पाहून त्याची कल्पना करणें शक्य आहे. हिंदू लोकांत रूढाचार व धर्म यांना एकच समजतात. खरी नीति, खरा धर्म म्हणजे मुहूर्त, शकून, तिथि, वार, नक्षत्र वगैरे पाहून दिवसभर कर्में करणें, दोनशें वेळां पादस्पर्श, तसाच नेत्रस्पर्श असल्या कवाइतीला धर्म समजतात. शेजारी एकादा शूद्र उपासानें मरत असला तरी भटाला जेवण घालणें ही नीति मानली जाते. रेशीम हिंसेशिवाय हातीं लागत नाहीं, पण त्याची वस्त्रें पवित्र शुद्ध, सोंवळीं. तीं पन्नास वर्षांत एकदांही न धुतलीं तरी त्यांच्या शुद्धतेला धक्का लागत नाहीं. कापूस वृक्षाच्या फुलांतून उत्पन्न होतो, पण त्याला हिंसात्मक रेशमाची सर नाहीं. तो अपवित्र; असा धर्माचा उलटा न्याय आहे. यांत वर पुनः कोणाच्या हातचें अन्न घ्यावें व कोणाच्या हातचें निषेधावें, असा विवेक आहेच. लोकहितवादींच्या अनुभवांत देशस्थाच्या हातचें अन्न कोकणस्थ स्त्रिया खात नसल्याचा रिवाज असावा, कारण त्यांनीं त्यांचें उदाहरण दिलें आहे. सारांश, हिंदू धर्मानें जिकडे तिकडे प्रतिबंध निर्माण करून ठेवल्यामुळें प्रगतीची अडवणूक झाली आहे. परदेशी प्रवास नको, कां, तर ब्राह्मणाला अडचण जेवण कसें मिळेल ही. त्यांनीं देशांतरीं जाण्याचें सोडलें व इतरांनीं त्यांचें अनुकरण केलें. आमच्या देशांत येण्याला मात्र कोणालाहि अटकाव नाहीं. हिंदू जर प्रवास करणारे असते तर इंग्रज येथें येण्याऐवजी हिंदूच त्यांच्या देशीं पोंचण्याचा संभव होता. याप्रमाणें नानाविध आचारविचारांची झडती घेऊन झाल्यावर माणसानें माणसाचें कल्याण करावें, त्यासाठीं झटावें, हीच नीति, हाच धर्म, असें लोकहितवादींनीं आपलें मत ठासून सांगितलें आहे. इंग्रजींतील ज्ञान अंगीकारणारे सारासाराच्या विवेकानें वागतात यामुळें त्यांच्यावरील आरोप खोटे ठरतात.

## जुन्या विद्या कां मागासल्या ?

संस्कृतांतील विद्या इंग्रजी राज्यांत निरर्थक ठरल्या तरी त्या मुळा-

पासून तशाच होत्या, असा लोकहितवादींचा समज नव्हता. त्या कदाचित एकदां लोकोपयोगी असतील. त्या लोकोपयोगी होण्याचें कारण म्हणजे त्यामध्यें प्राचीन ऋषिमुनि संशोधनानें व अनुभवानें प्राप्त होणाऱ्या ज्ञानाची नवी भर त्यांच्यांत टाकीत होते, हें होय. नवी भर दोन हजार वर्षांपासून बंद झाली व तेव्हांच्या विद्या जशा स्वरूपांत आहेत तशाच स्वरूपांत त्या अट्टाहासानें जगविणें अवश्य; कारण त्या विद्यांचे जनक देवाचे अवतार होते, त्यांत यत्किंचित् फेरफार करण्याचा अधिकार आतांच्या मानवांचा नाहीं, अशी भावना बाळगल्यामुळें त्या मागें पडल्या. या स्थितीला राजांच्या किंवा धनिकांच्या आश्रयाचा दुजोरा मिळाला. एकदा एखाद्या विद्वानाने श्रीमंताचा आश्रय मिळविला कीं, मग त्याने जन्मभर ख्याली खुशालीत रहावें, जेव्हां बोलावणें येईल तेव्हां आश्रयदात्यांसमोर जाऊन हजेरी द्यावी, आपली विद्या कोणाला शिकवूं नये. आश्रित विद्वानांच्या अशा या विचित्र वागणुकीला आळा नव्हता. वास्तविक गरीब प्रजेकडून पिळून काढलेल्या पैशाचा असा निष्फळ विनियोग व्हावा, हा एकप्रकारें जुलूम आहे. पण राजाकडून एका विद्वानाच्या वाट्यास गेलेला पैसा अनेकामध्यें विद्याप्रसार होण्याकडे लागावा असें राजावर दडपण आणायचे कोणी ? संस्थानी राजधान्यांतून विद्वानांचा आचार ज्या पद्धतीनें चालला होता तीच पद्धत पेशवाईत होती. विद्वान ब्राह्मणांचे काम एकच; जो खुराक चारील त्याचें अभीष्टचिंतन करायचें, मग तो हिंदू असो, मुसलमान असो वा आणखी कोणी असो. बाजीराव पेशव्यांचें राज्य ब्राह्मणांच्या या असल्याच स्वार्थी अभीष्टचिंतनानें गेलें. लोकहितवादींनीं बाजीरावाचा व ब्राह्मणांचा बऱ्याचवेळां या दृष्टीनें उद्धार केला आहे. समाजाचा प्रत्येक घटक सज्ञान झाल्याशिवाय आपली दुर्दशा संपणार नाहीं या भावनेनें लोकहितवादी लिहीत होते. बागेंत जशीं जुनीं झाडें तोडून नवीं झाडें लावतात तशीच विद्येच्या बागेंतही व्यवस्था असली पाहिजे. या दृष्टान्तानें लोकहितवादींनीं आपलें मनोगत स्पष्ट केलें आहे. ज्ञानाच्या बाबतींत गुप्तता, आपपरभाव वगैरे प्रकार नसावे. म्लेंच्छ म्हणून ज्यांना टाळण्याचा धर्म येथें प्रसार पावला ते म्लेंच्छ आतां भारतांत शिरून भारतीय जनतेच्या दैवाचे सूत्रधार झाले. आतां ते टळत नाहींत तेव्हां त्यांची विद्या घेऊन गुरूची विद्या गुरूवर उलटवून आपलें

राजकीय, औद्योगिक, सामाजिक हित साधण्यांत पुरुषार्थ आहे असा लोकहितवादींचा अभिप्राय अत्यंत जळजळीत शब्दांनीं क्वचित बाहेर पडला आहे.

## मराठी ग्रंथरचनेची तळमळ

सर्वांना ज्ञानाचें मुक्तद्वार पाहिजे, असा दावा मांडला कीं, समाजांतील विषमता गेली पाहिजे, हें तत्त्व स्वीकारणें भागच आहे. हल्लीं इंग्रजांनीं शिपाईगिरी, व्यापार, आणि ज्ञानार्जन या मानवी व्यवहाराच्या तीन शाखा व्यापून सर्व हिंदूंना शूद्र करून सोडलें असतां या स्थितीचें भान सोडून ब्राह्मणांनीं आपलें श्रेष्ठत्व मिरविण्यांत अर्थ नाहीं. इंग्रज कदाचित् येथें कायमची वसाहत करतील व आपल्या सर्वांच्या नशिबीं त्यांची गुलामगिरी करण्याची पाळी येईल, असेंहि भय लोकहितवादींनीं एकदोनदां व्यक्त केलें आहे. ब्राह्मणांनीं आपल्या खोट्या वर्चस्वाचा टेंभा पाजळण्याचें सोडून इतरांच्या बरोबरीचे आपण आहों, अशी भावना पत्करल्यास त्यांत सर्वांचेंच हित आहे. इंग्रजांनीं उदयास आणलेल्या ज्ञानाचा अंगीकार हा हिताचा उपाय आहे व तें ज्ञान देशी अर्थात् मराठी भाषेंतून देण्याची पद्धत सुरू होणें अवश्य आहे, असा लोकहितवादींचा आग्रह होता. लोकहितवादींचा मराठीचा अभिमान वाखाणण्यासारखा आहे. या अभिमानास अनुसरून त्यांनीं मरेपर्यंत सारी ग्रंथरचना मराठींतूनच केली. ज्ञानवृद्धीच्या हव्यासानेंच मुंजींत मुलांना उपदेशपर पुस्तकें भेट द्यावी असें त्यांनीं सुचविलेलें आहे. १८४८ पर्यंत व नंतर मराठींत ग्रंथरचना होऊं लागली होती, परंतु त्या ग्रंथांना गिऱ्हाईक मिळत नव्हतें यामुळें ग्रंथलेखनाला दक्षिणा द्यावी असा नवशिक्षितांनीं सरकारकडे अर्ज केला, त्याला सरकारांतून मान्यता मिळाली परंतु या दक्षिणेविरुद्ध जुन्या शास्त्राच्या पंडितांनीं मोठा गवगवा केला. पण त्यांची डाळ शिजली नाहीं, ही गोष्ट निराळी. जसें सरकारनें केलें तसेंच या बाबतींत धनिकांनीं करावें. त्यांनीं श्राद्ध, पक्ष, यात्रा, अभिषेक, उत्सव व्रतें यांत पैसा व्यर्थ दवडण्यापेक्षां छापखान्याला, वृत्तपत्रांना, ग्रंथलेखनाला तो दिल्यास उत्तम, हाच खरा धर्म, हेंच खरें पुण्य असें लोकहितवादींनीं म्हटलें आहे. यासंबंधांतील लोकहितवादींची तळमळ पुढील उताऱ्यांत ( ९१ ) दिसून येईल :—

" जे पुस्तकें लिहितील व लोकांस शहाणे करण्यास मेहनत करतील जे

वर्तमानपत्रें व ग्रंथ इत्यादि उपयोगी वस्तु छापून प्रगट करतील, त्यांस तुम्ही मोठे विद्वान् व लोकांचे हितकर्ते समजून त्यांस सत्पात्र जाणून धर्म करा; व त्यांचे ग्रंथ घेऊन लोकांमध्यें वांटा, व हींच वायनें समजा. तींच संक्रांतीचीं तिळपात्रें, श्रावणीचीं दीपदानें, माघस्नानाचीं संपूर्णें, चातुर्मासाची संपूर्णें व तुळशी आणि लाखोल्या त्याच समजा. ज्ञानवृद्धींत पुण्य आहे, असें माना... मरते समयीं देऊळ बांधावयास सांगूं नका, पण नवे छापखाने व नवीं पुस्तकें करण्यास सांगा. देवळें पुष्कळ आहेत तितकीं पुरेत, हें समजा. ''

वृत्तपत्रांविषयीं लोकहितवादींना इतकी आस्था कां, यांचें कारण वृत्तपत्रामुळें लोकाचा निर्लज्जपणा जाण्याचा संभव मोठा, हें होय. वृत्तपत्रांतून लोकव्यवहाराच्या बारीकसारीक गोष्टींचीं जाहीर चर्चा होउं लागलीं कीं गैरवागणुकीच्या लोकांना त्याचें भय वाटून ते आपलें कर्म सोडतील, असा लोकहितवादींना भरंवसा वाटत होता. (४८) 'वृत्तपत्रें हिंदुस्थानांत असतीं तर परकी लोक हिंदुस्थानांत सुलभपणें आले तसे आले नसते' असा त्यांचा ग्रह याच लेखांत व्यक्त झाला आहे.

## ब्राह्मणांची अनीति

सर्व जाती समान कशा होतील या प्रश्नाला लोकहितवादींचें उत्तर ब्राह्मणांत कसलीच श्रेष्ठता उरलीं नाहीं हें आहे. ब्राह्मण व शूद्र यांच्या एकंदर ज्ञानांत कांहींच अंतर दिसत नाहीं. शिंपी, सुतार, लोहार हे जसे मजूर तसेच ब्राह्मण. शब्दांची अर्थशून्य वाच्यता करणारे मजूरच. इतर व्यर्थ न बोलणारे तर ब्राह्मण हे बोलके राघू असा फरक दोघांमध्यें फार तर काढतां येईल. माणसाला समाजांत महत्त्व लोकोपकारानें येत असतें. ब्राह्मणांनीं एखादी शाळा काढून इतरांना उपयुक्त ज्ञान दिल्याचें एकसुद्धां उदाहरण सांपडणार नाहीं. येथें १८४८-४९ चा काळ विसरून चालणार नाहीं. स्वतःची पोळी दुसऱ्याच्या तुपानें चपचपीत ओली कशी होईल या चिन्तेंत गर्क असणारा ब्राह्मण इतरांच्या डोक्यावर मिरें वाटण्याच्या योग्यतेचा साहजिकच नाहीं. मनुष्य या दृष्टीनें पाहिल्यास तो इतराप्रमाणेंच जन्मास येतो, वाढतो, मरतो. मग त्याची मातब्बरी इतरांहून निराळी कां मानायची? ब्राह्मण नीतिमत्तेनें चोख असतील

म्हणून समजावें तर खेड्यांतल्या जोशी कुळकर्णी या ब्राह्मणांना गुन्हेगारीनिमित्त शिक्षा भोगाव्या लागतात ही वस्तुस्थिति डोळ्याआड करता येत नाहीं.

## रोटीबेटी व्यवहार

जातिभेद मोडल्यास रोटीबेटी व्यवहार होऊं लागेल. असा व्यवहार संकराप्रमाणें ज्याना वाटणें शक्य होतें त्यांचें समाधान लोकहितवादींनीं केलें आहे कीं बेटीव्यवहार हा बहुधा समान संस्कृतीच्या मंडळींत होतो. सर्वांची जात एक म्हणून ब्राह्मण महाराशीं, लोहाराशीं सोयरीक करील हे संभवत नाहीं. उलट महार, मांग वगैरे जाती बेटीव्यवहारासाठीं ब्राह्मणाशीं लगट करतील हें सुद्धां शक्य कोटीतलें नाहीं.

## स्त्रियांची उन्नति

जातिभेदाप्रमाणें स्त्री–पुरुषांतील भेद लोकहितवादींच्या हृदयाला खुपत होता. त्या व्यथेचें त्यांनीं अधूनमधून जोरानें आविष्करण केलें आहे. स्त्रियांना विद्यार्जन करण्याची भरपूर सवड असावी. त्यांना अज्ञानांत ठेवणें हा सामाजिक अपराध आहे. त्या शिकून शहाण्या झाल्या कीं त्यांचें धार्मिक भ्रम नष्ट होऊन त्यांनाही स्वतःचें हिताहित स्वतंत्रपणें कळू लागेल. वैधव्य आल्यास त्या पुनर्विवाह करून आपलें आयुष्य सुखी करतील. बायकांच्या पुनर्विवाहाशीं धर्माचा मुळीच संबंध नाहीं. मुलींना शिक्षण मिळण्यासाठीं त्यांचें लग्न उशिरा झालें पाहिजे. लहानपणीं लग्न करण्याच्या चालीनें शरीराचा ऱ्हास होऊन रोगट संतति, अकालीं वृद्धावस्था यांचें माणसाला धनी व्हावें लागतें. लोकहितवादींनीं जरी स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा निराळा विचार मांडला नसला तरी शिक्षणाच्या अनुरोधानें स्वातंत्र्य, प्रौढ विवाह, पुनर्विवाह या गोष्टी क्रमप्राप्तच आहेत. पुनर्विवाहाची सणसणीत तरफदारी त्यांनीं अनेक लेखांतून केलली आहे, हा विषय लोकांसमोर १८४० च्या थोडासा आधींपासूनच होता.

## स्वराज्याचें भविष्य आणि स्वरूप

सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या बाबतींतल्या लोकहितवादींच्या अभिप्रायाची इतकी विस्तारानें पहाणी केली. आतां त्यांच्यावर जो इंग्रज-धार्जिणेपणाचा आरोप आहे त्याचें परीक्षण केलें पाहिजे. लोकहितवादींनीं

इंग्रजांना देवानें हिंदुस्तानांत गुरु म्हणून पाठविले, इंग्रज लोक इकडे आले हें चांगलें झालें, अशा तऱ्हचे उद्गार काढले आहेत. पण येथें इंग्रज यावच्चद्रदिवाकरौ रहावें, त्यांच्या गुलामगिरींतच आपल्या भाग्याची पराकाष्ठा आहे असा आशय त्यांच्या एकाही लेखांतून दाखवितां येणार नाहीं. उलट इंग्रज जातील, त्यांनीं जावें, न गेल्यास त्यांना हाकलून काढावें, असे एकाहून एक चढते विचार लोकहितवादींनीं व्यक्त केलें आहेत. इंग्रजांच्या राज्यापासून जो लाभ झाला तो लोकहितवादींनीं लपविलेला नाही. आमच्या जुन्या समजुती जाऊन नव्या विद्याचें ज्ञान इंग्रजी राज्यामुळें होत आहे, हाच लाभ त्यांनीं सर्वांत मोठा गणला आहे. ब्राह्मणाविषयीं जेवढें लिहिलें तेवढें इंग्रजांविषयी लिहिलें नाही; पण जे लिहिले आहे तें सडेतोड व स्पष्ट आहे.

१८४८ साली फ्रान्समध्यें क्रांतीची नवी लाट उठून ती सर्व युरोपांत पसरली, तिच्या बातम्या इकडे आल्यावर ‘ राज्यसुधारणा ’ ( १४ ) हा विषय लोकहितवादींनीं निवडला. बंड, दंगा यांचा खल करून शहाणे लोक जेव्हां जुलमी राज्यकारभार मोडून आपल्या हाती यशस्वी रीतीनें लोकहितार्थ राज्यकारभार घेतात तेव्हां त्या प्रकरणाला राज्यसुधारणा म्हणतात अशी त्यांनीं व्याख्या केली., शिवाजीचें कृत्य ‘ रिवोल्यूशन ’ म्हणतां येईल. अशा तऱ्हेचे राज्यशास्त्रावरील निबंध १८४८ मध्यें मराठी साहित्यात दुसरे सापडतीलच असा भरंवसा नाहीं. फ्रान्समधील राज्य-क्रांतीचा वृत्तांत सांगून झाल्यावर त्याच नांवाच्या दुसऱ्या लेखांत ( २८ ) हिंदुस्थानामध्यें लोकमतानुसार पार्लमेंटप्रमाणें राज्य चालल्यास चांगलें होईल, असें म्हणून त्यांनीं १८५३ सालीं कंपनीच्या सनदेचें पुनरुज्जीवन होण्याच्या सुमारास दहापांच आसामी विलायतेस पाठवावे, त्यांच्याबरोबर पुढील मजकुराची अर्जी पाठवावी असें म्हटलें आहे—

“ हल्ली राज्यपद्धति आहे तीपासून आमचा फायदा नाहीं व आमचे राज्यसंबंधीं हक्क चालत नाहींत व हिंदु लोक जसे तसेच इंग्रज लोक मनुष्यें आहेत. याकरितां इन्साफ बरोबर होण्याकरितां सर्व इंग्रज व नेटिव लोक यांमध्यें सांप्रत मोठा भेद आहे, तो मोडून एकसारखें होण्याकरिता हिंदु-

स्थानचे देशांत पार्लमेंट ठेवावें व ही मोठी सभा मुंबईस भरावी आणि तेथें दर एक शहरांतून व दर एक जिल्ह्यांतून दोन दोन आसामी घेऊन त्या सर्वांस कौन्सिलांत बसवून गव्हर्नरानें त्यांत मुख्य असावें व जे लोक दर जिल्ह्यांतून आणावयाचें ते सर्व जातीतील सारखे असावे. मॅजिस्ट्रेटांनीं जिल्ह्याजिल्ह्यांतून दोन चांगले मुखत्यार लोकांनीं पाठविण्याविषयीं दवंडी पिटावी. लोकांनीं बोलणारे चतुर व मुत्सद्देगिरी केलेले मुखत्यार निवडावे. कारण ते राज्याचे हिस्सेदार होणार आहेत. त्याप्रमाणें निवडलेल्या मुखत्यारांनीं हजर व्हावें, त्यांनीं राज्य चालवावें म्हणजे लोकांचा फायदा होईल." हा खुलासा आटोपल्यावर 'लोकसत्तात्मक राज्य' (हा शब्द लोकहितवादींचा आहे) झाल्यास राज्याचा जुलूम सोसण्याची हिंदूंची खोड सुटेल. या उदाहरणाचें बाकीची संस्थानें अनुकरण करतील, यापुढें इषारा आहे कीं–"राज्य करण्यास गरीब व मातबर, नीच जातीचे व उच्च जातीचे लोक समान मानानें (एकत्र बसतील). अशा सभेंत जातीविषयीं निवड नको, लायकीप्रमाणें निवड व्हावी. ब्राह्मण गर्विष्ठ म्हणून त्यांची संख्या थोडी असावी" अशी लोकहितवादींची आणखी एक पुस्ती आहे.

'इंग्रजी राज्यापासून फळ' (५४) या लेखांत मागील विचारांची निराळी आवृत्ति आहे—लोक शहाणे झालें म्हणजे हळूंच म्हणतील कीं, आम्हांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लमेंट द्या. नंतर आपले लोक त्यामध्यें बसूं लागले म्हणजे हळूच म्हणतील कीं, तुम्हासारखे आम्ही शहाणें आहों मग आम्हांस अधिकार कां नसावें? मग हिंदु लोकांचे बहुत मत असें पडलें म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे. इकडील लोक राज्याचें कारभार वगैरे चांगले करूं लागले, लाच खावयाचें सोडून दिलें म्हणजे बहुतकरून मोठालीं कामें गव्हर्नरचीसुद्धां याचे हातीं येतील आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून राहातील...आपले लोक पार्लमेंट व स्वराज्य भोगतील. 'इंग्रजांविषयीं कांही दिवस येथील लोकांनी कृतज्ञता बाळगली तरी' ज्या काळीं इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कानू बसावावयाचा आग्रह करतील, त्या काळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हें लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजांस सांगतील कीं, तुम्ही आपल्या देशास जावे. आतां आमचे देशाचा कारभार चांगला करतां येतो...तुमचें

गुरुत्व नको...तुमचें वर्चस्व नको. याप्रमाणें या देशाची गति होईल... यास दोनशें वर्षें तरी पाहिजेत. परंतु असें होईल यांत संशय नाहीं." ( हा लेख १ एप्रिल १८४९ चा आहे. ) इतक्या दूरच्या तपशीलवार व्यापक विचारानें भारतीय लोकसत्ताक स्वराजाचें भविष्य वर्तविणाऱ्या द्रष्ट्या पुरुषांवर इंग्रज-धार्जिणेपणाचा दुष्ट आरोप समंजस व जाणत्या म्हणून गणल्या जाणाऱ्या लोकांकडून व्हावा हा एक दैवदुर्विलासच समजायला पाहिजे. परंतु यापुढें इंग्रजी राज्यांतील भारतीय राष्ट्रवादाचा इतिहास पहाणाराला अगदीं आरंभींच लोकहितवादींची मूर्ति दिसल्याशिवाय रहाणार नाहीं.

## स्वदेशी–बहिष्कार

लोकहितवादींनीं अर्थशास्त्राचें अवलोकन केलें असल्यामुळें देशाच्या दारिद्र्याचें चित्र त्याच्यासमोर उत्कटपणें होतें. २२ एप्रिल १८४९ च्या लेखात (५७) त्यांनीं भारतीयांच्या उद्योगव्यापाराविषयक कर्तव्याचा एक आराखडा मांडला आहे. ' यास्तव ( इंग्रजी व्यापाराला पायबंद लावण्या-साठीं ) या लोकांनी एकत्र होऊन जर असा कट केला कीं, आपले देशांत दुसरे मुलखाचा जिन्नस आला तरी घ्यायचा नाहीं; आपले देशांत पिकेल तेवढाच माल घ्यावा. आपले लोक कपडे जाडे वाईट करतात. परंतु तींच नेसावीं; इकडे छत्र्या करतात, त्याच घ्याव्या म्हणजे या लोकांत व्यापार राहून इकडे सुख ' होईल. यानंतर इकडील सर्व रोजगार धंदा बुडाला, साऱ्या जिनसा परदेशांतून येतात, फक्त धान्य मात्र अजून परदेशांतून येऊं लागले नाहीं, वगैरे विचार प्रदर्शित करून लोकहितवादी पुनः बजावतात :– ' सर्वांनीं असा कट करावा कीं, जे आपल्या देशांत पिकेल तेंच नेसूं, तेंच वापरूं ( मग तें ) कसेंहि असो. आणि तितक्याच चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयास विद्या शिकूं. आम्हांस मिळेल तसेंच घेऊन आम्ही काळ काढूं... कापूस विकणारांनीं असा बेत करावा कीं इंग्रजांस इकडे तयार केलेलीं कापडें द्यावीं परंतु कापूस देऊं नये. येणेकरून हे लोक सुखी होतील. सांप्रत आपलेंच लोक आपल्या लोकांस मारीत आहेत.'

यापुढें शेतीनें निभाव लागणार नाहीं. हजारो रुपये विलायतेस थेट जातात लोकांनीं याबाबतींत जो कट करावयाचा त्याचा उपदेश ' हरिदास,

पुराणिकांनीं केला पाहिजे ', असें लोकहितवादींनीं म्हटलें आहे..

१३ मे १८४९ च्या लेखांत ( ६० ) पुनः एकदा पार्लमेंटच्या मागणीचा उच्चार असून स्वदेशी व्यापाराबद्दल त्यांनीं खुलाशानें लिहिलें आहे. ' विलायतेंत पार्लमेंट असावें आणि येथें नसावें अशी आम्ही कांहीं चोरी केली नाहीं ? ' असा त्या मागणीचा पुरस्कार आहे. इंग्रजी राज्यांत फक्त मजुरीचे रोजगार इकडील लोकांत शिल्लक राहिले आहेत. यासाठीं आपल्या लोकांनीं रोजगार वाढवावें. कोणते म्हणाल तर कांच, कापड, सुरी, कात्री, लांकडी सामान, घड्याळें, चाबुक, यंत्रें इत्यादि पुष्कळ इकडे इंग्रज खपवितात. हे सर्व आपले लोकांनीं करावयास शिकावे; व येथें जो माल खपणार नाहीं तो दुसऱ्या देशास घेऊन जावा आणि तेथें विकावा. पुष्कळ देश आहेत. या गोष्टींचा शोध करावा व इंग्रजांचे देशाचे सामान बंद करावें, किंबहुना आपलें त्यास द्यावे. परंतु त्यांचे आपण घेऊं नये. यास्तव आपल्यास जाडी मोठी कापडें नेसावयास लागलीं तर काय चिंता आहे ? परंतु आपले देशाचे रक्षण करावें. '

' इकडे कांच करतां येईल व तारवें करतां येतील. लोखंडाचा रस करतां येईल. भूमीतला कोळसा सांपडेल. कापड करतां येईल...याप्रमाणें प्रथम असेंच होऊं द्या कीं, सर्व व्यापाराचा माल इकडेच व्हावा. विलायती नको...' ( ८५ )

उद्योगधंद्यांना भांडवल कुठलें आणावयाचें ? लोकहितवादींनीं सर्व धर्मादाय ज्ञानवृद्धीसाठीं करावा, हा एक उपाय पुष्कळदां आपल्या लेखांतून सुचविला आहे तोच उपाय उद्योगधंद्याचें भांडवल उभारण्याला उपयोगी पडेल असें त्यांचें मानस कांहीं ठिकाणीं केलेली विधानें पाहिल्यास उघड झाल्याशिवाय रहात नाहीं. धर्माच्या नांवानें होणारी उधळपट्टी जर कारखाने काढण्याकडे लागली तर देश सुधारेल, असें विचार त्यांनीं प्रदर्शित केले आहेत.

वर जे उतारे दिले आहेत, त्यांत पुढें कित्येक वर्षांनीं उदयास आलेल्या स्वदेशी बहिष्काराच्या तत्त्वाचें बीज असल्याचें विचक्षणांना सांगावयास नको. लोकसत्तात्मक राज्याच्या प्रमाणेंच लोकहितवादींचा

स्वदेशीबहिष्कारासंबंधीं कट्टा अभिमान होता; तो १००–१२५ वर्षांमागचा म्हणूनच डोळ्यांत भरण्याजोगा आहे.

## स्वराज्याची पात्रता

हिंदुस्थानाला स्वराज्य मिळावें ही महत्त्वाकांक्षा व्यक्त करतांना लोकहितवादींनीं कांहीं संकेत उघड केले आहेत. त्यांतला एक संकेत सरकारी कामदारांनीं लांच खाण्याची संवय सोडावी हा आहे. लांचलुचपतीचा प्रकार १८४८–४९ सालांत जसा माजलेला होता तसाच तो पुढेंही चालू राहिला. सरकारी पैसा म्हणजे जणूं काय बेवारस माल, ज्याला साधेल त्यानें तो शक्य तेवढा गिळंकृत करावा, तसें करण्यांत पाप नाहीं या कल्पनेनें सरकारी कामदार वागत असल्याची तक्रार लोकहितवादींच्या लेखांतून पुष्कळदां आलेली आहे. सरकारी नोकरी मिळाली कीं डौल वाढविण्याची हाव सुटते आणि डौलाचा खर्च मागण्यासाठीं पैसे खाण्याच्या पापाला मनुष्य बळी पडतो हें लांच–प्रकरण एका लेखांत ( ३८ ) लोकहितवादींनीं तपशीलवार दिले आहे. त्या काळांत अर्धवट शिकलेल्यांचा भरणा सरकारी नोकरींत विशेष होता. पण सुधारलेले व सुशिक्षित लोक पुढें येऊं लागले असल्यामुळें 'ते इंग्रजांची बरोबरी करतील' असा लोकहितवादींचा विश्वास होता.

## जीवनविषयक दृष्टि

लोकहितवादींचा जीवनविषयक दृष्टिकोण पहाणें अवश्य आहे. ईश्वराबद्दल त्यांना प्रबल श्रद्धा होती. परंतु त्या श्रद्धेला हिंदु धर्मशास्त्रानें दिलेलें विचित्र रूप त्यांना मान्य नव्हतें. मूर्तीबद्दल त्यांना आस्था नव्हती असा निष्कर्ष त्यांच्या लेखांतून निघतो. 'वैराग्य'–संसारत्यागाविरुद्ध त्यांनीं एक स्वतंत्र लेख लिहिलेला आहे. त्यांनीं हा लेख बैरागीं या नांवानें गांवोगांव भिक्षा मागत फिरणाऱ्या लोकांकडे पाहून लिहिलेला आहे. लग्नावांचून रहाणें हें त्यांच्या मतें अत्यंत अयोग्य होतें. दैव, नशीब, सटी या शब्दांचा पगडा लोकांनीं आपल्या मनांतून उडवून लावावा, त्या पगड्यानें त्यांना आळशी व ऐतखाऊ बनवून सोडलें आहे. गीतेचा आधार घेऊन त्यांनी जीवनांतली प्राप्त कर्तव्यें चोख रीतीनें पार पाडलीं पाहिजेत,

असें म्हटलें आहे. स्वाभिमान असावा, हिंदूंना स्वाभिमान नाहीं म्हणून ते परक्यांच्या लाथा मुकाट्यानें सोसतात. स्वाभिमान असेल तर अन्यायाच्या प्रतिकाराची भावना मनुष्यांत जागृत असते. मुख्य मन शुद्ध पाहिजे. चित्तशुद्धीची पराकाष्ठा ईश्वराच्या दृष्टीसंमुख माणसाला नेऊं शकते. लोक आचाराकरितां प्राण देतात आणि विचार मुळींच करीत नाहींत. स्नान चुकल्यास मनुष्य हळहळतो, पण खोटें बोलण्याची त्याला बिलकुल पर्वा नसते. मुख्य मनाचा मळ घालविला पाहिजे. यथाशक्ति निरपेक्ष परोपकार हें माणसांचें मुख्य ध्येय असावें.

## आशावादाची सफलता

ज्या पिढीवर लोकहितवादींनीं जालीम हल्ले केलें, ती ब्राह्मणांची पिढी संपल्यावर ब्राह्मणच देशाची सुधारणा हातीं घेतील, हा लोकहितवादींचा आशावाद खरोखरीच पुढील पंचवीस वर्षांनी सफल होऊं लागला. १८७० मध्यें शिक्षण घेणाऱ्या पिढींतून कितीतरी ब्राह्मण पुढारी देशोद्धारार्थ चळवळी करणारे निघाले. १८६७ मध्यें जातिभेद नको म्हणणारा प्रार्थना समाज जन्मास आला, १८७३ मध्यें सत्यशोधक समाज अस्तित्वांत आला. १८७५ मध्यें आर्यसमाजाची स्थापना झाली. १८६५ पासून विधवाविवाहाच्या चळवळीनें जोर धरला. १८५० नंतर येथें कापडाच्या गिरण्या हळूहळू निघाल्या, स्वदेशी–बहिष्काराला अगदीं दुबळें कां होईना पण सार्वजनिक रुप १८७० नंतर प्राप्त झालें. हरिदास पुराणिकांनीं स्वदेशीच्या विषयाचें निरूपण करावें ही लोकहितवादींची इच्छा १८७० नंतरच्या काळांत फलद्रूप झालेली आहे. १८८० मध्यें ब्राह्मणांनींच लोकशिक्षण हातीं घेऊन देशसेवेचा स्वार्थत्यागी संप्रदाय उदयास आणला. मराठीची ग्रंथसंपत्ति वाढत गेली; छापखानें, वृत्तपत्रें यांचा सुकाळ दिसूं लागला. स्त्रियाकरितां स्वतंत्र शाळा चालविण्याला आडकाठी उरली नाहीं. ब्राह्मणांच्या आचारधर्मांतील बाष्कळ भाग झडूं लागला. सारांश लोकहितवादींनीं आपल्या साऱ्या आकांक्षा सफळ होऊं लागल्याचें दृश्य स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलें. त्यांच्या विचारसरणीचें भरदार साफल्य हेंच त्यांच्यावर झालेल्या टीकेला बिनतोड उत्तर आहे.

•••

# जोतीबा फुले

जोतीबा फुले यांच्या कामगिरीचा विषय दिसायला सोपा असला तरी विवेचनाला अवघड आहे. आजच्या परिस्थितीनें हा विषय कांहींसा कठिण केलेला आहे. जोतीबांनीं भट–ब्राह्मणांना सडकून शिव्या देऊन लोकजागृतीचा प्रयत्न केल्यामुळें ब्राह्मणसमाजामध्यें त्यांच्याबद्दल कित्येक हेव्यादाव्याच्या कल्पना वसत रहाव्या हें सरळ आहे. जोतीबांनीं 'सत्यशोधक' या नांवाची एक संस्था स्थापन केली. तिचा त्यांच्या हयातींत फारसा उत्कर्ष झाला नाहीं. त्यांच्या पश्चात् ती संस्था अनेक वर्षें मृतप्राय झालेली होती. पुढें पुन्हा तिचें नांव ३० वर्षांपूर्वी कोल्हापूर साताऱ्याच्या बाजूस ऐकूं येऊं लागलें. या संस्थेच्या द्वारें तेव्हां जें कार्य घडत होतें, त्याचा रोख ब्राह्मण समाजाला शक्य त्या उपायांनीं धुळीस मिळविण्याचा होता. ब्राह्मण समाजाला यामुळें उपद्रव सोसावा लागला. परंतु त्या कार्यापोटीं सामान्य लोकशिक्षणाचाही उद्योग जन्मास आला. म. गांधींच्या खुनाला एक ब्राह्मण तरुण जबाबदार असल्याची बातमी कळतांच साताऱ्याच्या टापूंत ब्राह्मणांच्या उच्चाटनाची जी लाट उसळली, तिच्याशीं १८७३ सालीं स्थापन झालेल्या जोतीबांच्या 'सत्यशोधक' समाजाचा धागा लावतां येतो. अर्वाचीन महाराष्ट्राच्या इतिहासांत इतर थोर व्यक्तींबरोबर त्यांचा जो आदर करावयाचा तो त्यांच्या संस्थेनें त्यांच्या पश्चात् जे प्रकार केले, अथवा खुद्द त्यांच्या विचारसरणींत जी न्यूनें आढळतात त्याकरितां नाहीं, हें सांगायला नको. आपला समाज खालावलेला आहे, केवळ आर्थिक दृष्टीनें नव्हे तर बौद्धिक दृष्टीनेंही त्याची विलक्षण हलाखी आहे; अशा दुहेरी कंगालपणांतून त्याची मुटका झाली पाहिजे, या संबंधाची जोतीबांची तळमळ व तिला शोभणारी तडफेची क्रिया, हीं त्यांच्या आदराचीं दोन कारणें आहेत.

## ब्राह्मणद्वेष

जोतीबांचा जन्म १८२७ सालीं माळी जातींत झाला. १८२७ सालानंतरच्या स्थितीकडे लक्ष दिल्यास जोतीबांना फारसें शिक्षण घेतां येणें शक्य होतें असें

म्हणतां येणार नाहीं. तरीं त्यांनीं थोडेंसें प्राथमिक शिक्षण घेतल्यावर कांहीं वर्षें त्यांचें विद्यार्जन थांबून तें पुनः सुरू झालें. त्यांना बरें वाईट समजूं लागल्यावर जेव्हां ते इंग्रजी राज्यानें घडून घेणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचें धोरण लक्षांत घेऊन विचार करूं लागले, तेव्हां त्यांना ब्राह्मण वर्गाचा समाजांतील आणि सरकार दरबारांतील वरचढपणा दृष्टीस पडला.

एकाच अल्पसंख्य वर्गाने वर्चस्व गाजवावें, सुख भोगावें आणि इतर बहुसंख्य जनतेला नुसतें डोकें वर काढायलाही सवड नसावी; हें साऱ्या समाजांतील जातिविषमतेचें दारुण शल्य जोतीबांच्या हृदयांत खोल शिरून त्यांच्या वेदनांनीं त्यांना बेचैन केलें. ब्राह्मणांनीं स्त्री व शूद्र या दोन्हींला कनिष्ठ कोटींत ढकललें आहे, त्यांना विद्येच्या प्रकाशापासून दूर ठेवलें आहे, अर्थात् त्यांचा उद्धार केला पाहिजे असें ध्येय जोतीबांनीं स्वीकारलें.

## शिक्षणविषयक प्रयत्न

ध्येयाचें स्फुरण होतांच तदनुसार क्रिया करून टाकणें हा त्यांच्या स्वभावाचा एक विशेष दिसतो. १८४८ सालीं त्यांनीं पुणें शहरांत मुलींची शाळा काढली व त्या शाळेमागोमाग अस्पृश्य मुलांची एक शाळा स्थापन केली.[९] जोतीबांऐवजीं दुसरा कोणीं असता तर त्यानें शहरांतल्या शिष्टांना बोलावून त्यांच्याशीं विचारविनिमय केला असता, आपल्या कार्याची शक्याशक्यता पाहिली असती, आर्थिक पाठबळ उभविलें असतें; परंतु जोतीबांच्या स्वभावाला अशी दिरंगाई सोसणारी नसल्यामुळें त्यांनीं झटकन् शाळा अस्तित्वांत आणली. मुलींची शाळा पुढें ब्राह्मण मंडळींनीं अंगावर घेतली. अस्पृश्यांची शाळा कशीबशी चालू राहिली. तिच्यांतही ब्राह्मण मंडळी होती. या शाळेला कित्येक युरोपियन अधिकाऱ्यांची सक्रिय सहानुभूति असल्याचा निर्वाळा जोतीबांनीं आपल्या 'गुलामगिरी' पुस्तकांत दिलेला आहे. सरकारी शाळांतून अस्पृश्य मुलांना स्पृश्य मुलें आपल्या शेजारीं बसूं देत नसत, अशी माहिती शाळाखात्याच्या तत्कालीन अहवालांतून आहे. सरकारला सर्वांच्या समान दर्जाची सक्ती करणें इष्ट नव्हतें. लोकांपैकींच कोणी समानतेच्या तत्त्वाची उठावणी केल्यास सरकारला ती हवी होती. जोतीबांच्या उद्योगाला युरोपियन अधिकाऱ्यांची सहानुभूति मिळाली ती यामुळेंच, असें

म्हणतां येतें. मुलींच्या शाळेनिमित्त २५० रु. च्या शालजोडीनें जोतीबांचीं सरकारांतून संभावना झाली.

मुलींची व अस्पृश्यांची शाळा हें जोतीबांनीं घडवून आणलेलें चमत्कार आहेत. १८४८ च्या सुमारास या शाळा कुणालाहि संभाव्य कोटींतल्या वाटणाऱ्या नव्हत्या. ब्राह्मणांनादेखील जेथें इंग्रजांनीं देऊं केलेल्या इंग्रजी तऱ्हेच्या शिक्षणाचा तिटकारा होता तेथें अब्राह्मण समाज याबद्दल कितीसा उत्सुक असेल याची कल्पनाच करणें चांगलें.

ब्राह्मण हा पुढारलेला वर्ग, तो नवीन शिक्षणाच्या दिशेनें अगदीं हळू पावलें टाकीत होता. पण आपल्या मुलींना शिकवावें, या हिताचा स्पर्श त्याच्या बुद्धीला उत्कटतेनें झालेला नव्हता. अशा काळीं जोतीबांनीं मुलींची शाळा काढावी या त्याच्या कृत्यांत अद्‌भुतपणाचा अंश खचित आहे. त्याहून अधिक अद्‌भुतपणा अस्पृश्यांच्या शाळेच्या बाबतींत दिसतो. मुलींच्या शाळेला लोकांचा विरोध होताच, पण त्याहून जास्त विरोध अस्पृश्यांच्या शाळेबाबत लोकांकडून झाला. द्रव्य आणि माणसें याचें पाठबळ नसतां जोतिबांनीं हीं कार्यें उभीं केल्यानें त्यांना त्यांत सर्वस्व वेंचण्याची तयारी ठेवावी लागली व त्यांनीं नातेवाइकांचा आणि समाजाचा बहिष्कार सहन करून हीं कार्यें निष्ठेनें चालविलीं. त्यांच्या प्रस्तुत कार्यांत ब्राह्मण साहाय्यक होते, हें विसरून चालणार नाहीं. अस्पृश्यांच्या शाळेंत शिकविण्याकरितां त्यांना एक ब्राह्मण शिक्षक मिळाला होता, परंतु त्याचा लोकांच्या छळापुढें टिकाव लागला नाहीं. तेव्हां तें काम जोतीबांच्या पत्नीनें अंगावर घेतलें.

## विचाराची दिशा

एकदां इंग्रजांच्या राज्याचा जोतीबांना द्वेष वाटत होता. त्याच्या प्रेरणेनें ते सशस्त्र बंडाळीचे विचार डोक्यांत खेळवीत होते. हे विचार त्यांच्या डोक्यांत ब्राह्मणांनीं भरविलें होते, अशा अर्थाचे विधान त्यांच्या ‘ गुलामगिरी ’ नामक पुस्तकांतील आत्मचरित्रपर भागांत आहे. उमाजी नाइकाला ब्राह्मणांनींच उठविलें, असा त्यांचा समज एका ठिकाणीं व्यक्त झालेला आहे. ब्राह्मणांच्या असल्या चिथावणीला जोतीबा बळी पडले नाहींत, याचें कारण त्यांनीं आपल्या भाषेंत सांगितलें आहे कीं, सगळा समाज एकजिनसी व एकजुटीचा बनल्या-

शिवाय असल्या धाडसांत कांहीं हंशील नाहीं. समाज एकजिनसी करावयाचा तर त्यांतील जन्मसिद्ध जातिभेदाचीं भिंताडें जमीनदोस्त झाली पाहिजेत. या भिंताडांचा मुख्य आधार ब्राह्मणवर्ग असल्यामुळें त्याला उखडणें हें पहिलें कर्तव्य आहे. शाळांच्या प्रयोगानें ख्याति आणि मानमान्यता पदरीं पडल्यावर तिच्या जोरावर त्यांनीं १८७३ सालीं सत्यशोधक समाज स्थापन केला. ईश्वर निराकार आहे. सर्व मनुष्यें त्यांचीं लेंकरें आहेत. ईश्वराच्या प्रसन्नतेला मध्यस्थाची जरूरी लागत नाहीं. प्रत्येकानें आपले धर्मविधि स्वतः करावे. दुसऱ्याकडून धर्मविधि करून घेतल्यास त्याला कोणत्याही स्वरूपाचा मोबदला देऊं नये वगैरे; अशी सत्यसमाजाचीं कांहीं तत्त्वें आहेत. यांतलें पहिलें 'ईश्वर निराकार आहे' हें तत्त्व पुढें बदललें. सत्यशोधकसमाजामार्फत विद्यादानाचेंही काम चालत असे व तेंच ठळकपणानें दृष्टीस पडणारें होतें. आपलीं मतें लोकांच्या दृष्टीपुढें वारंवार जात रहावीं म्हणून जोतीबांच्या मित्रांनीं कित्येक नियतकालिकें जन्मास घातलीं व चालविलीं. परंतु तीं कधींच नांवारूपास आलीं नाहींत. त्यांतलें एखादें आजही जीव धरून आहे. ब्राह्मणांच्या वर्चस्वाला सुरुंग लावण्याचें कर्तव्य बजावण्यासाठी जोतीबांनी 'सत्यशोधक' संस्था काढली.

जोतीबांचा निर्वाह चालविणारें स्थायी स्वरूपाचें कसलेंच साधन नव्हतें. मधून मधून कंत्राटें घ्यावीं आणि त्यांत जें हातीं येईल त्यावर चरितार्थ चालवावा अशी त्यांची रीत त्यांच्या चरित्रकारांनीं लिहिलेली आहे. कंत्राटांत विशेष लाभ होत नसला तरी आपल्या सार्वजनिक उद्योगासाठीं त्यांचा त्याग सुरूच होता. कंत्राटाच्या कामांत अब्राह्मणवर्गाचा संबंध येत असल्यानें हीनावस्थेंतून तो वर्ग कसा बाहेर पडेल याचें चिंतन करणें ही त्यांची संवय होती.

जोतीबा बुद्धिमान असल्यामुळें त्यांनीं इंग्रजी भाषेचा चांगला अभ्यास केला होता. इंग्रज लेखकांनीं हिंदुधर्म व समाज याविषयी लिहिलेलीं पुस्तकें वाचून त्यांनीं मनाशीं खूणगांठ पक्की बांधून टाकली होती कीं, ब्राह्मण हे परदेशांतून आलेले. त्यांनीं मूळच्या भारतवासीयांना जिंकून त्यांना दास बनवून सोडलें. जोतीबांच्या साध्या लिखाणांतसुद्धां हा सूर भरलेला आहे. याबद्दल इंग्रज किंवा युरोपियन संशोधकांना दोष दिला पाहिजे.

इंग्रजानी येथील जातिभेदाची जी मीमांसा केली ती फुटीनें राज्यरक्षण करण्याच्या हेतूची असो वा युरोपांतील इतिहासाच्या अनुभवांतून प्रामाणिक-

पणाणें निवालेली असो, तिनें हिंदुस्थानांत जातीजातींमध्यें द्वेष उत्पन्न करण्याचें काम साधलें यांत संशय नाहीं. जोतीबांच्या कबूलीप्रमाणें त्यांनीं अनेक मिशनऱ्यांचीं पुस्तकें वाचलेलीं होतीं.

इतिहाससंशोधक इंग्राजापेक्षां मिशनऱ्यांची हिंदी जनतेकडे पाहण्याची दृष्टि निराळी होती. त्यांना आपल्या धर्माचा प्रसार करायचा होता. अशा धर्मप्रसाराला ब्राह्मणांकडून अडथळा होत असल्यानें त्यांनीं इतर ब्राह्मणेतर समाजाच्या मनांत ब्राह्मणांविषयीं वैर पेरण्याला मागेंपुढें पाहूं नये हें उघड आहे.

राज्यकर्ता इंग्रज हिंदुस्थानांतील राष्ट्रीयत्वाची वाढ खुरटविण्यासाठीं धडपडत होता. ब्राह्मण हा आधीं शहाणा होऊन राष्ट्रीयत्वाची भाषा बोलूं लागला तेव्हां त्याच्या राष्ट्रीयत्वाला पायबंद लावण्याला ब्राह्मणांविरुद्ध इतर जाती, अशी स्थिती राज्यकर्त्या इंग्रजाला अवश्य होती.

## ब्राह्मणद्वेषाची मीमांसा

जोतीबांच्या लिहिण्यांत जी ब्राह्मणांची नालस्ती आहे ती इंग्रज मिशनरी व इंग्रज राज्यकर्ते यांच्या अनुवादाची आहे. त्यांच्या इतिहासनिवेदनांत वस्तुस्थितीच्या अभ्यासापेक्षा कल्पकतेचा खेळ अधिक आहे व यामुळेंच ज्ञानाच्या दृष्टीनें त्यांचें लिखाण लोकांच्या दृष्टीआड राहिलें. अवतारांच्या कथांना जोतीबांनीं दिलेलें रूप आज कोणीही अगत्यानें पाहणार नाहीं. इतिहास-संशोधन हा त्यांचा मुख्य गुण नव्हता. स्वजातीच्या उत्कर्षाची तळमळ या साठींच त्यांची श्रेष्ठ पुरुषांत गणना केली पाहिजे. (त्यांनीं लोकस्थितीच्या परीक्षणांत ब्राह्मणांची जी हजेरी घेतली आहे ती त्यांच्या बुद्धिवादाचा कल समजण्यासाठीं पहाण्यासारखी आहे. राज्यकारभारांत जिकडे तिकडे ब्राह्मण भरले आहेत व ते इंग्रजांच्या डोळ्यांत धूळ टाकून आपला तळीराम गार करीत आहेत, असा जोतीबांच्या सर्व लिखाणाचा मथितार्थ सांगता येतो. राज्य-कारभारांतले ब्राह्मण हे आपल्या पराक्रमानें तेथें आहेत कां इंग्रजांच्या कृपेनें वा गरजेनें आहेत, याचा विचार जोतीबांनीं केलेला नाहीं. राज्य-कारभाराला ब्राह्मण उपयोगी होता म्हणून इंग्रजी कारभारांत त्याची वरणी लागली. इंग्रजाला ब्राह्मण मनापासून आवडत नव्हता, पण जोवर इतर जाती ज्ञानानें मागें होत्या तोंवर ब्राह्मणाला

हातीं धरण्याशिवाय इंग्रजाला गत्यंतर नव्हतं. इंग्रजांच्या अगतिकत्वानें जें घडलें त्याची नसती जबाबदारी ब्राह्मणांवर लादून तसा विचार करणें हें न्यायाला धरून व्हावयाचें नाहीं. ब्राह्मण अधिकारी हाताखालच्या ब्राह्मणांकडून सेवाचाकरी घेतात यासंबंधाची जोतीबांची टीका वरच्यासारखीच आहे. ब्राह्मणांच्या घरांत आचारी–पाणके ब्राह्मण असतात. पण त्यांना त्यांचा ब्राह्मण धनी बरोबरीच्या नात्यानें वागवीत नाहीं. अब्राह्मणांच्या व्यवहारांत असेच प्रकार चालतात व तसें चालणें स्वाभाविक आहे. परंतु ब्राह्मण वर्ग मुळांतला भारतवर्षातला नव्हे तर तो परदेशी, येथें जेता या नात्यानें येऊन आपलें वर्चस्व स्थापून राहिलेला, अशी युरोपीयनप्रणीत कल्पना जोतीबांनीं स्वीकारल्यामुळं ब्राह्मणांची प्रत्येक गोष्ट त्यांना विपरीत दिसूं लागली. अधिकार व पैसा यांचे दोष जसे ब्राह्मणांना तसेच इतर जातीनाही बाधतात. [illegible] ते अधिक बाधतात व इतरांना त्याची बाधा कमी होते असा जोंवर अनुभव नाहीं तोंवर एकट्या ब्राह्मणांच्याच नांवानें खडे फोडण्यांत न्याय नाहीं.

शिव्या हे जागृतीचें एक साधन बनलेलें आहे. जोतीबांनीं ब्राह्मण हा प्रतिपक्षी कल्पून त्याला शिव्या दिल्या. शिव्या द्यावयाच्या असें एकदा मनानें घेतलें म्हणजे मनुष्य युक्तायुक्तता पहात बसत नाहीं. हिंदी पुढारी स्वराज्यासाठीं इंग्रजांना शिव्या देत होते. ते कधीं युक्तायुक्तता पहात होते? मग जोतीबांनीं ब्राह्मणांची निंदा केल्याबद्दल राग मानायचें कारण काय? शिवाय ब्राह्मणांच्या तत्कालीन लोकोद्धारविमुख प्रवृत्तीला जर लोकहितवादीसारखे ब्राह्मणच कडकडून शिव्या देत होते तर जोतीबांनीं त्यांचा अवलंब केल्याबद्दल त्यांना दोषी का समजायचे? ब्राह्मणांचें महत्त्व एकाकाळीं होतें, पण त्याचें कारण ब्राह्मण हा ज्ञानदाता असंग्रही निःस्वार्थ पुरुष होता हें होय. ब्राह्मण हा जवळ फुटकी कवडी किंवा धान्याचा एकही कण न बाळगता लोकसेवा करीत होता तेव्हा तो दाराशी आल्यास त्याला जेवायला घालणें म्हणजे पर्यायानें समाजाच्या मार्फत त्याचा योगक्षेम चालणें, यांत कांहीं दोष नव्हता. परंतु ब्राह्मण जेव्हां निरनिराळ्या धंद्यांत शिरून द्रव्यार्जन व द्रव्यसंग्रह करूं लागला तेव्हां त्याच्या महतीला ओहोटी लागली. जुन्या ग्रंथांतून याचे अनेक दाखले आहेत. इराण्याच्या हॉटेलांत वाटेल तें खाऊन पिऊन पुनः जर ब्राह्मण आपल्या पवित्रतेच्या आढ्य-तेनें इतरांना धिक्कारूं लागला, तर त्याची पतराज बाळगण्याचा विनय इतरांनी

कां दाखवावा ? अशा अर्थाचे विचार जोतीबांच्या वाङ्मयांत आहेत. द्रव्यार्जन करणारानें फुकट जेवणाची आशा धरणें हें गैर आहे. ब्राह्मणाची मूळ भूमिका सुटली यांतही आश्चर्य नाहीं. संख्या वाढली व उपजीविकेचें साधन तेवढेंच राहिलें म्हणजे इतर साधनांच्या मोहांत ब्राह्मण सांपडावे यांत आश्चर्य नाहीं. परंतु स्वतःविषयींच्या पवित्रतेची व श्रेष्ठतेची ब्राह्मणांची भावना इतरांना जी एकदां अगदीं मंदपणानें डाचत होती ती इंग्रजांची राज्यनीति आणि मिशन-ऱ्यांचा धर्मप्रसार यांच्या योगानें तीव्र झाली.

## ब्राह्मण प्रतिगामी आहेत काय ?

ब्राह्मणांच्या दोषांचा विषय कितीही उगाळला तरी येथेंच एक महत्त्वाची गोष्ट सांगून टाकणें अवश्य आहे. ब्राह्मणांना प्रति[illegible] याचा एक शिष्टाचार अलीकडे झालेला आहे. ब्राह्मण नव्या सुधारणांना विरोध करतो या एकाच अंगाकडे लक्ष दिलें जात असल्यामुळें हा आरोप उत्पन्न झालेला आहे. ब्राह्मण सुधारणांना विरोध करतो असें नसून साराच समाज विरोध करतो. एखादी अपरिचित घटना पुढें आली कीं तिला बुजावें, तिला विरोध करावा हा समाजाचा स्वभाव आहे. पण सुधारणांचा जोरानें पुरस्कार करणारांत ब्राह्मणच सांपडतात, याचें भान ठेवलें पाहिजे. बौद्ध, जैन, या धर्मांना बळकटी ब्राह्मणांनीं आणिली. कालान्तरानें मुसलमानी आक्रमण या देशांत होऊन धर्म बुडण्याचें संकट दिसतांच भक्तिमार्गानें समाजाला वांचविण्याकरितां जे पुढें आले ते प्रथम ब्राह्मणच होते. अर्वाचीन काळीं इंग्रजांचें राज्य झाल्यावर त्यांची विद्या ग्रहण करून नव्या मन्वंतराला उचित अशी समाजव्यवस्था सुचविणारांतही ब्राह्मणच अग्रेसर होते व आहेत. आजचा कोणताही समाजोद्धाराचा वाद घ्या. त्यांत ईर्ष्येनें पडून प्राणाची पर्वा सोडणारे ब्राह्मण कमी नाहींत. गांधीवाद्यांत ब्राह्मण आहेत, सोशालिस्टांत ब्राह्मण आहेत, कम्युनिस्टांत ब्राह्मण आहेत. सारांश कोणताही लोकोपयोगी नवा विचार पुढें आला कीं त्याचें स्वागत व आदर करणारांत अग्रेसरत्वानें ब्राह्मण हे निरंतर दिसत असल्यामुळें त्यांच्यावर प्रतिगामित्वाचा सरसकट आरोप करणें हें इतिहासाला व न्यायाला सोडून आहे, असेंच कबूल करावें लागेल. हा मजकूर ब्राह्मणाच्या बढाईखातर नव्हे तर वस्तुस्थिती समजण्यासाठी लिहिला आहे.

ब्राह्मण मूळचे हिंदवासी नव्हते या कल्पनेचा पगडा जोतीबांच्या मनावर विलक्षण असल्यामुळें त्यांनीं इतिहासांतील घटनांची उपपत्ति कशी लावली आहे ती पाहण्यासारखी आहे. शिवाजीमहाराजांचा एकदां पोवाडा रचून शिवरायाविषयींची आपली भक्ति त्यांनीं व्यक्त केली असतांही ब्राह्मणांनीं शिवाजी महाराजांकडून मुसलमानांचें राज्य बुडविलें, कारण मुसलमानी राजवटींत ब्राह्मणांच्या मिळकतीला गळती लागली होती. बौद्धांचा, जैनांचा ब्राह्मणांनीं पाडाव केला, मुसलमानांची तशीच गति केली व आतां ते इंग्रजी राज्याविरुद्ध खटपटी करीत आहेत अशी कल्पना त्यांनीं पुढें स्वीकारली. या समजुतीमुळें जोतीबांना पुण्यांत सार्वजनिक सभेच्या विद्यमानें व नंतर कॉंग्रेसच्या पुढाकारानें सुरू झालेल्या चळवळींविषयीं उत्साह नव्हता. तथापि कांहीं आपत्ति आल्यास तिच्या प्रतिकाराला ते जनहिताच्या स्वाभाविक कळवळ्यामुळें सज्ज असत १८७६ सालच्या दुष्काळांत ते गांजलेल्या लोकांना मदत करण्यास धांवले. विधवांना दुसऱ्या लग्नाची परवानगी नसल्यामुळें त्यांचें वाकडें पाऊल पडून गर्भ राहिल्यास त्यांच्या रक्षणासाठीं त्यांनीं एक संस्था काढली होती. सक्तीच्या मोफत शिक्षणाचेही ते कट्टे पुरस्कर्ते होते. या सर्व कामगिरींत त्यांची अस्पृश्यांच्या शिक्षणाची कामगिरी डोळ्यांत भरण्यासारखी व चिरस्मरणीय आहे.

लोकोद्धाराची तळमळ, स्वार्थत्याग, सच्चारित्र्य वगैरे गुणांमुळें त्यांच्या कामगिरीला अधिक उजळा यावा हें साहजिक आहे, म्हणूनच त्यांना प्राप्त झालेली ‘ महात्मा ’ ही उपाधि योग्य ठरणारी आहे.

त्यांच्या कामगिरीचे परिणाम पाहूं गेल्यास जें दृश्य डोळ्यासमोर येतें तें फारसें स्पृहणीय नाहीं. त्यांचा निराकार देव अब्राह्मण समाजाला कधींच मानवला नाहीं. महारमांग हे आपल्याच घराण्याचे अर्थात आपल्याच हाडामासाचे या सिद्धान्तानुसार जोतीबा त्यांच्याशी अन्नव्यवहार करायला सिद्ध होते; परंतु हा सिद्धान्त अब्राह्मण समाजानें स्वीकारला असें म्हणवत नाहीं. लग्नादि संस्कार ज्याचे त्यानें करावें, या मताचाही अब्राह्मण समाजांत आदर झाला नाहीं; या संस्कारानें घडणाऱ्या गोष्टींची सामाजिक बाजू लक्षांत घेतल्यास ज्याचे त्यानें संस्कार उरकल्यास अनर्थ होतील, ही गोष्ट लक्षांत येऊनच कीं काय पुढें अब्राह्मणांत नवा भिक्षुकवर्ग निर्माण करण्याचा यत्न

अस्तित्वांत आला. जोतिबांच्या शिकवणींतील जी गोष्ट अब्राह्मण समाजानें ग्रहण केली ती म्हणजे ब्राह्मण जातीचा द्वेष. परंतु जसजसा अब्राह्मण समाज सुविद्य व प्रबुद्ध होऊन देशहिताच्या मोठाल्या कार्याचा भार अंगावर घेईल, तसतसा हा द्वेष मावळत जाईल, अशी उमेद बाळगायला हरकत नाहीं. अब्राह्मणांकडून केव्हां केव्हां घडणाऱ्या अनुचित वर्तनावरून जोतिबाच्या कामगिरीला वट्टा लागत नाहीं. अर्वाचीन महाराष्ट्राच्या अनेक श्रेष्ठ विधात्यामध्यें त्याचें स्थान अढळ आहे.

———————

# रामकृष्ण गोपाळ भांडारकर

रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचा जन्म कोंकणांत म्हणजे इंग्रजी राज्याच्या संस्कारापासून कांहींशा दूरच्या जागीं १८३७ मध्यें झाला. पेशवाईचा अंत होण्यापूर्वी सुमारें ५० वर्षें कोंकणच्या कित्येक ठिकाणी इंग्रजांचा प्रवेश झाला असला तरी ज्या भागांत भांडारकर जन्मास आले, त्या भागांत इंग्रजांचें राज्य पेशवाईनंतरच आलें. तथापि त्याचा प्रभाव जसा मुंबई, पुणें या शहरीं दिसत होता, तसा तो कोंकणपट्टींत दिसूं लागलेला नव्हता. कोंकणांत पेशवाईची स्थिती १८३७ सालीं अनुभवास येत असली तर नवल नाहीं. त्या स्थितींत मिळालें तें प्राथमिक शिक्षण घेऊन पुढच्या शिक्षणाकरितां भांडारकर मुंबईस आले. सुमारें शंभर मैलांच्या आंत असलेल्या ठिकाणाहून मुंबईपर्यंत येण्याला तेव्हां बरेच दिवस लागत असत. कारण आगबोटी त्या काळीं उदयास आलेल्या नव्हत्या. विलायतेंतून पहिली आगबोट १८४२ सालीं मुंबईस आली. पण कोकणपट्टीचा प्रवास आगबोटीनें करण्याचें दिवस पुढें बऱ्याच वर्षांनीं उगवले. भांडारकरांचा प्रवास मचव्यांतून झाला. त्याचें वर्णन त्यांनीं एकदां प्रसंगपरत्वें केलेलें असल्यानें त्या काळच्या प्रवासांतील अडचणी लक्षांत येण्याला तें वर्णन उपयोगी आहे. मुंबईस थोडीं वर्षें काढल्यावर भांडारकरांना पुण्यास जाऊन आपलें विद्यापीठाचें शिक्षण पुरें करावें लागलें. तेव्हां वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांना खालच्या वर्गांना शिकवावें लागे आणि आपण स्वतंत्रपणें जो अभ्यास केला असेल त्याचाहि आढावा वरिष्ठांना सादर केला पाहिजे असा तेव्हां शाळाखात्याचा एक नियम होता. त्या नियमास अनुसरून भांडारकरांनीं जे अहवाल लिहिले आहेत, ते त्यांनीं पुढें ज्या कार्यांत आयुष्य घालविलें आणि लौकिक मिळविला त्याची साक्ष देणारे आहेत. भांडारकरांना संस्कृत विद्येची गोडी लागून त्यांनीं विद्यार्थिदशेंत ज्या ग्रंथांचें अध्ययन केलें, त्या ग्रंथांच्या संस्कृत परंपरेंतील प्रौढीकडे पहातां भांडारकरांच्या अभ्यासाचें आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं. भांडारकरांची १९१४ सालीं मासिक मनोरंजनाच्या संपादकांनीं एक मुलाखत छापलेली आहे. तिचा पुढील अंश महत्त्वाचा आहे.

" आमच्या वेळच्या विद्यार्थ्यांना आपलें कांही मिशन आहे, असें वाटत होतें. लोकांच्या पैशानें मिळणाऱ्या शिक्षणाची फेड करण्याची जबाबदारी आमच्यावर आहे, अशा जाणिवेनें तेव्हां विद्यार्थी अभ्यास करीत असत " असा आशय त्या मुलाखतींत भांडारकरांनीं व्यक्त केला आहे. भांडारकरांसाठीं संस्कृत विद्येचें पांग फेडण्याचें मिशन विधात्यानें योजलेलें होतें. तें मिशन यथोचित सफल होईल अशी तयारी त्यांनीं विद्यार्थीदशेंत चालविल्याचें सदर अहवालांवरून दिसून येतें.

## नवीन सरदारांचा वर्ग

१८६१ सालीं मुंबई विद्यापिठाचे पहिले पदवीधर बाहेर पडले. भांडारकर त्यांतले एक पदवीधर होते. त्या वर्षीच्या पदवीदानसमारंभात गव्हर्नर साहेबांनीं आपण एक नवीन सरदारांचा वर्ग निर्माण करीत आहों, हा वर्ग तरवारबहाद्दरांचा नसून विद्याधुरीणांचा आहे. या वर्गानें आतां आपलें ज्ञान वाढवून त्यांचा प्रकाश जनतला पुरवावा अशा अर्थाचा उपदेश करून या नव्या पदवीधरांना त्यांच्या भावी कर्तव्याची दिशा समजावून दिली. या पदवीधरांत रानडे होते. रानडे व भांडारकर या जोडीनें अर्वाचीन भारतीय इतिहासाला जें नवें वळण लावलें, तें सदैव संस्मरणीय आहे. रानड्यांनीं देशहिताच्या अनेक शाखांचा भार आपल्या अंगावर जन्मभर वाहिला. तो हलका व्हावा म्हणून भांडारकर बऱ्याच शाखांत त्यांच्या जोडीनें काम करीत होते. परंतु भांडारकरांचें खरें कार्य प्राचीन विद्येच्या क्षेत्रांतलें आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजींतून संस्कृत शिकवीत असतां त्यांना इंग्रज किंवा युरोपियनांनीं लिहिलेलीं व्याकरणाचीं पुस्तकें उपयोगी नाहींत असा अनुभव आल्यामुळें त्यांनीं संस्कृतच्या व्याकरणाचीं शालोपयोगी पुस्तकें लिहिलीं. १८६३ मध्यें त्यांचें पहिलें पुस्तक प्रकाशांत आलें व तें आजच्या शिक्षणक्रमांत मागासलें असलें तरी त्यांतील विषयव्यवस्थेची कुशलता व उपयुक्तता कबूल करणारे लोक आजही भेटतात. त्यांचीं संस्कृत शिक्षणविषयक पुस्तकें दोन आहेत व पहिल्या विद्यार्थ्यांच्या सुमारें पंधरा पिढ्या महाराष्ट्रानें याच पुस्तकांच्या साहाय्यानें संस्कृतचा परिचय करून घेतला, ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. ( येथें विद्यार्थ्यांची पिढी चार वर्षांची धरली आहे. ) यांत अभ्यासाकरितां निवडलेले संस्कृत ग्रंथांतील उतारे भांडारकरांच्या प्रगमनशील विचारसरणीचे द्योतक

असल्यानें त्यांवर टीका करणारे कित्येक जुने शास्त्री केव्हां केव्हां भेटत असत परंतु त्या पुस्तकांची पकड असल्या टीकेमुळें शिथिल झाली नाहीं त्या पुस्तकानें पूर्वीच्या युरोपियनांच्या पुस्तकांना हाकलून लावलें इतकेंच नव्हे, तर नव्या पुस्तकांचीही मात्रा चालू दिली नाहीं.

## संशोधन कार्य

विद्यार्थी असतांनाच भांडारकर जुन्या विद्येची युरोपियन विद्वानांनीं केलेली चर्चा बारकाईनें पहात होते. १७७५ मध्यें उपनिषदांचें पर्शियन भाषांतर युरोपांत जाऊन संस्कृताविषयीं तिकडील विद्वानांत जिज्ञासा उत्पन्न झाली. इकडे वॉरन हेस्टिंग्जच्या कारकीर्दीतील सर विल्यम जोन्ससारख्या विद्योपासकांनीं संस्कृत भाषेंतील सौंदर्याचा युरोपियन जनतेला परिचय करून देण्याला सुरुवात केली होती. युरोपियन पद्धतीनें संस्कृत वाङ्मयाची चिकित्सा येथेंही सुरू झाली होती. बंगालची एशियाटिक सोसायटी, मुंबईतील तसलीच संस्था यांच्या द्वारें भारतीय इतिहासांचीं आणि तत्त्व विचाराची गूढें उलकण्याची क्रिया अस्तित्वांत आली होती. भांडारकरांच्या आधीं या विषयांकडे वळून डॉ. भाऊ दाजी लाड, बाळशास्त्री जांभेकर, विश्वनाथ नारायण मंडलिक यांनीं या संशोधनक्रियेला हातभार लावला होता. परंतु युरोपियन विद्वत्तेचा दरारा कमी झालेला नव्हता. युरोपियन हा जसा रणांगणांत अजिंक्य, तसा विद्वत्तेच्या क्षेत्रांतही अजिंक्य, अशी कल्पना रूढ होती. त्यांची संशोधनक्षेत्रांतील पुरावा गोळा करण्याची, त्या पुराव्याची परीक्षा व जुळणी करण्याची पद्धति अशी मानली जात होती कीं, तिच्याशीं झगडण्याचे सामर्थ्य भारतीय विद्वानांत सांपडावयाचें नाहीं असा ग्रह रूढ झाला. त्यांतून युरोपियन विद्वान हा राज्यकर्त्यांच्या जातीचा, अर्थात त्याचा पाडाव म्हणजे राज्यकर्त्यांचा उपमर्द, असल्या भावड्या समजुती थोड्याफार प्रमाणांत चालू होत्या. त्या समजुतीच्या काळांत भांडारकर या क्षेत्रांत उतरले. त्यांनीं युरोपियन चिकित्सापद्धति आत्मसात केल्यामुळें युरोपियन पंडितांना भांडारकरांच्या संशोधनाची सहज वासलात लावून मोकळे होण्याची शक्यता उरली नाहीं. हळूहळू युरोपांत त्यांच्या विद्वत्तेची ख्याती पसरून तिकडील विद्यापीठांनीं त्यांचा सन्मान आरंभला. १८७७ सालीं येथील सरकारनें त्यांना युरोपांतील प्राच्यविद्यापरिषदेला हिंदी विद्वत्तेचा प्रतिनिधी या नात्यानें पाठविलें.

तथापि हिंदी सरकारला व मुंबई विद्यापीठाला त्यांचा सत्कार करण्याची बुद्धी फार उशीरा झाली. विद्यापीठांतून बाहेर पडल्यावर प्रथम त्यांना सरकारी हायस्कुलावर प्रमुख अध्यापक म्हणून नेमण्यांत आलें. त्यानंतर त्यांची संस्कृतचे दुय्यम प्रोफेसर म्हणून मुंबईस नेमणूक झाली.

विद्वत्तेनें भांडारकरांच्या जोडीस न बसणाऱ्या योग्यतेचा इंग्रज त्यांच्यावर कॉलेजमध्यें ठेवलेला होता. याविषयीं वृत्तपत्रांतून चर्चा झाली, परंतु साम्राज्य-मदाच्या सरकारावर या चर्चेचा परिणाम घडला नाहीं. प्रोफेसर असतांनाच सरकारनें त्यांना ठिकठिकाणचीं हस्तलिखित ग्रंथभांडारें तपासण्याची कामगिरी दिली. या कामगिरीचे भांडारकरांनीं लिहिलेले अहवाल त्यांच्या सूक्ष्म संशोधनवृत्तीची ओळख करून देणारे आहेत. आपण इंग्रजांहून गुणांनीं वरचढ ठरलों तर उत्तमच; पण त्यांच्या बरोबरीचे तरी निश्चित आहों, असें जगाच्या निदर्शनास आणून देण्यासाठीं झटणारांपैकीं भांडारकर हे एक पुरुष होते. अध्यापनाच्या सरकारी कामाला वाहून घेतल्यामुळें सार्वजनिक चळवळीमध्यें आघाडीच्या पुढाऱ्यांत ते चमकले नाहींत; तथापि त्यांना प्राप्त झालेल्या वजनाचा फायदा त्यांनीं अनेक लोकोपयोगी संस्थांना दिल्याचें विश्रुत आहे. विद्वत्तेच्या क्षेत्रांत ते अग्रणी होते. पण हें क्षेत्र लोकांच्या डोळ्यांत एकदम भरणारें नाहीं. जेथें विद्वत्तेचें साह्य सार्वजनिक चळवळींना अवश्य होतें तेथें तसें साह्य केल्याचीं दोन उदाहरणें प्रसिद्ध आहेत.

दा. क्र. १५८२४

## समाजसुधारक

१८७० सालीं पुण्यास शंकराचार्यांच्या पुढारीपणानें जो विधवा-विवाहाच्या सशास्त्रतेसंबंधीं वाद झाला, त्या वादांत विधवाविवाह पक्षातर्फे शास्त्रवचनें काढून देण्याचें काम भांडारकरांनीं केलें. १८९० सालीं संमति-वयाच्या कायद्यानिमित्त जें रण माजलें, त्यांत कायद्याला जुन्या शास्त्राच्या आधारें पाठिंबा देणारांत भांडारकर होते. पहिल्या वादाच्या परिणामीं शंकराचार्यांनीं जाहीर केलेल्या बहिष्काराचें सुदर्शन त्यांच्यामागें लागलें. दुसऱ्या वेळीं त्यांचा अनेक प्रकारें पाणउतारा करण्यांत आला व एका सभेच्या वेळीं त्यांच्यावर दगडफेकही झाली. याच सुमारास त्यांच्या मुलीच्या पुनर्विवाहाचें प्रकरण लोकांसमोर होतें. या दिवसांत लोकप्रिय सनातनी पक्षाकडून होणाऱ्या निंदेमुळें

ते विद्यापीठाचे व्हाइस चॅन्सेलर असतां विद्यार्थ्यांनीं त्यांच्यावर कागदाचे बोळे फेंकून त्यांच्याबद्दलचा अनादर व्यक्त केला. परंतु त्यामुळें भांडारकरांनीं आपल्या समाजसुधारणाविषयक क्रियाशीलतेला खंड पडूं दिला नाहीं. ते नेहमीं म्हणत असत कीं जेवढीं दलितांचीं कार्ये ( डिप्रेस्ड क्लासेस ) असतील तेवढीं आपण आनंदानें, उत्साहानें स्वीकारलीं पाहिजेत. ह्याप्रमाणें त्यांनीं अखेरपर्यंत वर्तन ठेवलें होतें. त्यांचें १९२५ मध्यें ऋषिपंचमीच्या दिवशीं देहावसान झालें.

जेत्याचा जितांवर परिणाम

जित राष्ट्रांतील जनतेच्या उन्नतीला जबरदस्त अडथळा आत्मविश्वासाच्या अभावाचा होत असतो. ज्यांनीं आपल्याला जिंकलें ते आपल्याहून सर्व बाबतींत श्रेष्ठ, त्यांच्यापुढें आपली कोणतीहि मात्रा कुठेंहि चालायची नाहीं, अशी जितांमध्यें निराशा पसरलो कीं, त्यांना डोकें वर काढण्याची हिंमत होत नाहीं. स्वातंत्र्याच्या हानीबरोबरच अशी निराशा जितांच्या ठिकाणीं बळावते व जेते त्या निराशेचा ऱ्हास न होऊं देण्याच्या युक्त्या काढीत असतात.

संस्कृत विद्या वस्तुतः आमची, पण तिचा अभ्यास इंग्लंडांत, फ्रान्सांत, जर्मनींत व्हावा, वेदग्रंथ प्रथम तिकडे छापले जावे, याचें आश्चर्य वाटून असलीं कामें युरोपीयनांनीं करावी त्यासाठीं लागणारा वकूब आपल्यांत नाहीं, ह्या सामान्य जनतेमध्यें पसरलेल्या कल्पनेला धक्का मारण्याचें काम कोणी तरी एकदां करावयास हवें होतें. भांडारकरांनीं ग्रंथप्रकाशनासारखीं अवाढव्य खर्चाचीं कामें अंगावर घेतलीं नाहींत व तशी त्यांना गरजही नव्हती. जेथें सारी वेद-संहिता स्वरांसहित बिनचूक तोंडपाठ म्हणून दाखविणारांची टंचाई नव्हती तेथें वेदांच्या मुद्रणाचा प्रचंड खर्च करण्याची गरज कां वाटावी? भांडार-करांना येथें थोड्याशा श्रमानें हवी ती ग्रंथसामग्री मिळविता येत होती. त्यांनीं अशा सामग्रीच्या जोरावर संशोधनाचें काम हातीं घेतलें. तें घेतल्यावर थोड्याच अवकाशांत येथें सरकारमार्फत व स्वतंत्रपणें संस्कृत ग्रंथ छापले जाऊं लागले. शंकर पांडुरंग पंडितांनीं 'वेदार्थयत्न' आरं-भला. काशिनाथ त्रिंबक तेलंगांनीं लासिजर आणि वेबर या महापंडितांना झोडपून गीता व रामायण हीं अनुक्रमें बायबल व होमरच्या पूर्वींची व भारतीय प्रतिभेचीं स्वतंत्र फळें होत, असें पटविण्याचा विक्रम गाजविला. हा भांडारकरांनीं

युरोपियनांशीं बुद्धीच्या व अभ्यासाच्या भूमिकेवर यशस्वी सामना करतां येतो असा आत्मविश्वास निर्माण केल्याचा परिणाम समजावा लागतो. हें आत्मविश्वासाचें कार्य डोळयांत भरणारें नसतें, किंबहुना तें घडत असतां लक्षांतही येत नाहीं. आपण जेत्यांसारखेच मनुष्य आहों व जेत्याला जें साधतें तें मनुष्य आहों म्हणून थोड्याशा-कदाचित् विशेष प्रयत्नानें आपल्यासही साधतें, असा आत्मविश्वास एकदां उत्पन्न झाला कीं मग उन्नतीची मजल मारायचा जितांना हुरूप चढतो.

भांडारकर विद्येच्या पदवीसाठीं युरोपांत गेले नाहींत; तथापि नोकरीपुरता त्यांच्याहून इंग्लंडचा एखादा क्षुल्लक योग्यतेचा साहेबसुद्धां वरचढ असल्याची जाणीव भांडारकरांच्या वरचा दर्जा त्याला बहाल करून तेव्हांचें सरकार जनतेला करून देत होतें. विद्वत्तेच्या बळानें भांडारकरांनीं युरोपांतील पदव्या आपल्या पुढें ओढून आणल्या व याविषयींचा न्यूनगन्ड (इन्फिरिऑरिटी काम्प्लेक्स) कमी केला.

## महाराष्ट्राचा इतिहास व भाषाशास्त्र

भांडारकर १८९३ सालीं डेक्कन कॉलेजमधून सेवानिवृत्त झाले. त्याच वर्षीं तेलंगांच्या मृत्यूमुळें रिकाम्या झालेल्या विद्यापीठाच्या व्हाइसचॅन्सेलरची जागा त्यांना लाभली. या जागेवर आलेले ते मुंबई प्रांतांतील पहिले भारतीय होत. तेलंग हा अधिकार बजावण्याला जगले नाहींत म्हणून भांडारकरांना पहिले हिंदी व्हा. चॅन्सेलर समजावें लागतें. सरकारी नोकरींत असतां त्यांनीं केलेल्या लेखनाचा विस्तार प्रचंड आहे; तसेंच त्या लेखनांत विविधत्वही आहे. मुंबई इलाख्याचे गॅझेटियर तयार करण्याचें काम निघाल्यावर दक्षिणचा-प्राधान्यानें प्राचीन महाराष्ट्राचा-इतिहास लिहिण्यासाठीं सरकारतर्फे त्यांची निवड झाली.

या इतिहासांत अत्यंत प्राचीन काळापासून महाराष्ट्राच्या इतिहासाचे धागेदोरे गोळा केलेले असून मुसलमानी आक्रमणापर्यंतच्या इतिहासाची चौकट चांगली बसविलेली आहे. तो इतिहास प्रसिद्ध झाल्यानंतरच्या काळांत नवीं ऐतिहासिक साधनें उजेडांत आलीं. महाराष्ट्राच्या विभागांचे व जुन्या राजकुलांचे कमी अधिक इतिहासही लिहिले गेले. परंतु भांडारकरांचा इतिहास अद्यापि गतार्थ झालेला नाहीं. त्याच्या चौकटीची लांबीरुंदी किंवा एकंदर आकार बदलण्याचा प्रसंग

आलेला नाहीं. त्या चौकटींतील तपशिलांत भर टाकणें किंवा क्वचित एखादा तपशील दुरुस्त करणें यापेक्षां नव्या साधनांना विशेष कांहीं करतां आलेलें नाहीं. पुरावा समोर आला कीं, त्याचा पूर्वापर संदर्भ पाहून आपले निर्णय त्या पुराव्यानें दिसणाऱ्या मर्यादेंतच बसवायचे असा भांडारकरांचा स्वभाव होता. पुराव्याच्या मर्यादेचें अतिक्रमण होऊं द्यावयाचें नाहीं, शंका असेल तर त्या मर्यादेच्या आंत दहा पावलें मागें रहावयाचें, परंतु वाचकांची दिशाभूल करावयाची नाहीं, अशा दक्षतेनें त्यांनीं इतिहास रचल्यामुळें त्यांत अजिबात एकंदर रूप बदलून टाकण्यासारखी पाळी पुढच्या संशोधनाला उत्पन्न करतां आली नाहीं. तसाच त्यांच्या भाषाशास्त्रावरील व्याख्यानांचा प्रकार आहे. ही व्याख्यानें त्यांनीं १८७७ सालीं मुंबई विद्यापीठानें डॉ. विल्सन यांच्या स्मरणार्थ सुरू केलेल्या मालेत दिलीं. तीं एकंदर सात व्याख्यानें आहेत. त्यांतली कांहीं इतस्ततः नियतकालिकांतून प्रसिद्ध झालीं. परंतु पुस्तकरूपानें तीं १९१५ नंतर लोकांपुढें आलीं. १८७७ ते १९१४ या ३७ वर्षांच्या काळांत आपल्या मतांमध्यें फेरफार करण्यासारखें कांहीं नवें साधन उजेडांत येतें कीं काय याची भांडारकर वाट पहात होते. पण पूर्वींची मतें कायम ठेवण्याला हरकत नाहीं अशी खात्री झाल्यावर भांडारकरांनीं ती व्याख्यानें पुस्तकरूपानें लोकांच्या हवाली केलीं. आपल्या मतांच्या साधकबाधक विचारांत सदतीस वर्षांइतका दीर्घ काळ भांडारकरांनीं घालवावा, या गोष्टीत विद्वत्तेचें फार मोठें रहस्य आहे. टिळकांच्या बुद्धिमत्तेचा आणि व्यासंगाचा पुरुष गीतारहस्य लिहिण्यापूर्वी ४० वर्षें घालवितो, यांतही वरील गोष्टींतलाच बोध सांठविलेला आढळेल.

एखाद्या कल्पनेचें स्फुरण होतांच ती कल्पना कागदावर लिहून लोकांना सादर करण्याची आजकालच्या तथोक्त विद्वानांची त्वरा पाहिल्यास दीड दोन पिढ्यांइतका काळ प्रतिपाद्य विषयाच्या अभ्यासांत खर्चणाऱ्या भांडारकर–टिळकांना कोणाच्या कोटींत घालावें हेंच कळेनासें होईल. डुकरीला थोड्या थोड्या अवधीनें शेंकडो अल्पायुषी पिलें होतात. त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाहीं. हत्तीण दीर्घकालानें एखाद्या पिलाला जन्म देते पण त्याचे लाड मोठमोठाल्या राजांकडून होऊं लागतात अशा अर्थाचें एक संस्कृत सुभाषित आहे. (सूते सूकरयुवती सुतशतमत्यंतदुर्भगं जगति। करिणी चिराय सूते सकलमहीपाल-लालितं कलभम्) तें ध्यानांत ठेवल्यास भांडारकर–टिळकांच्या ग्रंथलेखनाच्या

योग्यतेचें नीट आकलन होईल.

## इतर ग्रंथलेखन

'वैष्णवशैवादि संप्रदायांचा इतिहास' हा भांडारकरांचा शेवटचा ग्रंथ म्हणतां येईल. तो प्रथम सुमारें पस्तीस वर्षांपूर्वी जर्मनींतील एका नियतकालिकांत प्रसिद्ध झाला; त्याकरितांच तो लिहिला होता. त्या विषयाचा २० वर्षे भांडारकरांनीं अभ्यास चालविला होता. या सांप्रदायाविषयीं त्यापूर्वी पुस्तकें नव्हती असें नाहीं. पुष्कळ युरोपियन संशोधकांनीं त्याचा ऊहापोह केला असला तरी त्यांत युरोपियनांच्या दृष्टीचा दोष घुसल्याशिवाय रहात नाहीं. लेखक युरोपियन किंवा मिशनरी म्हणजे सांगून सवरून स्वधर्मप्रसारक असेल तर त्याच्या स्वधर्माभिमानानें ऐतिहासिक वस्तुस्थितीचा विपर्यास घडण्याचा संभव असतो. मिशनरी नसल्यासही त्याला स्वधर्माचा गौरव बाजूला ठेवून भारतीय इतिहासाची अगदीं निर्विकारपणें तपासणी करतां येत नाहीं. स्वधर्माभिमान नसेल तर आपण युरोपियन हे जन्मतः उच्च व युरोपियेनतर हे सारे हीन हा दर्प त्याच्या संशोधनाला भलतीच गति देतो. इंग्रजीच्या अभ्यासानें हिंदी जनता ज्ञानी तर होईलच, पण तिला इंग्रजीमुळें ख्रिस्ती धर्माचे प्रेम जडेल ही मेकॉलेची आकांक्षा आणि वेदांच्या अंतरंगाचें स्वरूप उघडें झालें कीं त्यावरील भारतीयाची निष्ठा झडून ते ख्रिस्ती धर्माकडे वळतील ही वेदाभ्यासामागील मॅक्समुल्लरची भूमिका पाहिल्यास युरोपियनांच्या संशोधनाविषयीं कृतज्ञतेप्रमाणेंच सावधगणाही बाळगला पाहिजे, तें उघड आहे. भांडारकरांना पूर्वीच्या संशोधनाचें खंडन करावयाचें नव्हतें, त्यांना आपल्या अभ्यासानुसार वैष्णव, शैवादि संप्रदायासंबंधीं वस्तुस्थिति साधार दाखवावयाची होती व तशी ती त्यांनीं दाखविल्यामुळेंच भांडारकरांचा हा ग्रंथ महत्त्वाचा संदर्भग्रंथ समजला जावा यांत आश्चर्य नाहीं. हा ग्रंथ पृष्ठसंख्येनें लहान आहे. भांडारकरांना पाल्हाळानें लिहिण्याची संवय नव्हती. जेवढें अवश्य आणि निश्चित तेवढेंच लिहावयाचें असा त्यांचा नियम असल्यानें ग्रंथ लहान दिसला तरी त्यांत विषयप्रतिपादनाची कमतरता नसे.

आपल्याकडे राजकीय मतांच्या लोकप्रियतेनें विद्वत्ता जोखण्याच्या रिवाज अंमलांत आल्यामुळें भांडारकरांचा गौरव महाराष्ट्रांत व्हावा तसा झाला नाहीं. टिळकांचा राजकीय पक्ष लोकप्रियता पावल्यावर त्यांच्या आजूबाजूस रहाणारे

संशोधक किंवा जे विद्याविनोदी असतील ते महाविद्वान आणि टिळकांनीं ज्यावर प्रतिकूल टीका केली असेल किंवा जे टिळकांच्या परिवारात नसतील ते तितकेसे विद्वान नव्हेत, या प्रवृत्तीनें भांडारकरांना शक्यतोंवर महाराष्ट्रापुरतें बोलायचें झाल्यास अंधारात ठेवण्याचा यत्न झाला असें म्हणतां येईल. खुद्द टिळक भांडारकरांचा आणि भांडारकर हे टिळकांचा कितीही आदर बाळगीत असले तरी सामान्यांना त्या धोरणानें वागण्याची आवश्यकता कां वाटावी ? तथापि भांडारकरांची विद्वत्तेच्या क्षेत्रांतील कामगिरी वाया गेली नाहीं त्यांच्या हयातींतच त्यांच्या नांवाची स्मारकसंस्था अस्तित्वांत आली आणि प्राच्य विद्येच्या संशोधकाचीं व अभ्यासकांचीं संमेलनें सालोसाल भरूं लागलीं.

## प्रार्थना समाजाची स्थापना

राजकारणांत भांडारकर मागें होते. पण समाजसुधारणेच्या प्रत्येक कार्याला त्यांची सहानुभूतीच नव्हे तर मदतही होत असे. त्या सर्वांचें मूळ प्रार्थना-समाजाच्या तत्त्वप्रणालींत सांपडेल. भांडारकर व त्यांचे सहाध्यायी वामन आबाजी मोडक असे दोघेजण १८६३ सालीं पुण्याच्या तुळशीबागेंतून जात असतां तेथें त्यांना हौदाच्या कांठीं मोठ्या श्रद्धेनें संध्या करीत बसलेले कांहीं ब्राह्मण दिसले व त्यावरून या दोघां मित्रांत आपल्या धर्मकर्तव्याविषयीं संवाद सुरू झाला. जुन्यांत राम उरला नाहीं; म्हणून तें सोडणें अवश्य असलें तरी त्याची जागा नव्या धार्मिक कर्तव्यांनीं भरून काढली जात नाहीं. याप्रमाणें समाज निर्बंधरहित झाल्यास त्याची वाताहत होईल, वगैरे अर्थाचे मुद्दे त्या संवादांत होते. या संवादामागें असलेल्या धार्मिक उद्धाराच्या तळमळीला पुढें 'प्रार्थना समाज' हें फळ आलें. १८४५च्या सुमारास मुंबईच्या कित्येक तरुणांनीं एक 'परमहंस' नांवाचें मंडळ स्थापून जातिभेद मोडण्याचा उपक्रम केला होता. तो उपक्रम गुप्त होता. त्याचा लोकांत बभ्रा होतांच त्या मंडळाच्या पुढाऱ्यांनीं अज्ञातवास पत्करला. पण त्यांतल्या कित्येकांना मंडळाच्या हेतूप्रमाणें कांहींतरी केलें पाहिजे असें वाटत होतें. पुढें भांडारकर, मोडक, रानडे यांच्यासारखे समाजसुधारणेच्या विचाराचे पदवीधर भेटल्यावर 'प्रार्थनासमाज' काढण्याला उशीर लागला नाहीं. 'प्रार्थनासमाज' ही राममोहन रायांच्या ब्रह्मसमाजाची शाखा म्हणतां येईल. दोन्ही समाज हिंदूंच्या धार्मिक व पार मार्थिक सुधारणेसाठीं जन्मास आले. परंतु 'ब्रह्म'हून 'प्रार्थना' हा शब्द लोक-

व्यवहारांत जास्त व्यापाचा आहे. ईश्वराची ज्यांत 'प्रार्थना' करावी लागत नाहीं असा जगांतील एकही धर्म नाहीं. हिंदूप्रमाणें इतर धर्मांचा समावेश होण्याला सवड असावी हा उद्देश ' प्रार्थना ' शब्दांत आहे. ईश्वराचा आकार, अवतार या समाजाला मान्य नाहीं, सर्व मानव ईश्वराचीं लेंकरें म्हणून त्यांच्यांत जातिभेदाचें वैषम्य नसावें, अशा तऱ्हेच्या तत्त्वांवर हा समाज काम करूं लागला. भांडारकरांची ईश्वरनिष्ठा प्रखर असल्यामुळें त्यांनीं या तत्त्वांच्या स्पष्टीकरणार्थ जीं व्याख्यानें, प्रवचनें केलीं त्यांचा संग्रह वाचनीय आहे. भांडारकरांची जुन्या वेदान्त संप्रदायपैकीं रामानुजांच्या विशिष्टाद्वैतावर विशेष भक्ति होती. संतमालिकेंतले तुकाराम त्यांस अत्यंत प्रिय होते. तुकारामाच्या अभंगचर्चेत ते उत्साहानें वृद्धापकाळीं भाग घेत होते ते यामुळेंच. या संग्रहांतील ईश्वरवादा ( थीझम ) संबंधाचे त्यांचे लेख मराठी वाङ्मयांत सदैव उल्लेखनीय ठरणार आहेत. आपल्या समाजाचे उद्देश लोकांना स्पष्ट कळण्यासाठीं समाजाच्या पुढाऱ्यांना नवें वाङ्मय निर्माण करणें अवश्य होतें. त्या वाङ्मयाचा पूर्वोक्त लेख हा एक अंश आहे.

राजकारणांतील किंवा रणांगणांतील विजयी पराक्रम हा एकच देशाच्या गौरवांचा घटक नसून विद्वत्ता, कला, विज्ञानाची प्रगतिकारक संशोधकता, अशा सर्व अंगांनीं देश संपन्न असेल तरच त्याला इतर देशांशीं तुलना करतांना उच्च स्थान प्राप्त होत असतें. इंग्लंडच्या गौरवांत ड्रेक, नेल्सन, वेलिंग्टन या रणशूरां-बरोबर बेकन, न्यूटन, शेक्स्पीयर, मिल्टन यांचाही उच्चार करावा लागतो. हिंदुस्थानच्या गौरवाचा विचार करतांना फडके, चाफेकर बंधु, कान्हेरे, खुदीराम बोस व त्यांचे साथीदार, त्याप्रमाणें रानडे, गोखले, गांधी, टिळक यांचें स्मरण करणें जितकें अवश्य आहे, तितकेंच रवींद्रनाथ टागोर, जगदीशचंद्र बोस, प्रफुल्लचंद्र राय, रमण, रामानुज, यांनाच नव्हे तर गामासारख्या सुविख्यात मल्लालाही जमेस धरल्याशिवाय गत्यंतर नाहीं. असा सर्वांगीण गौरव पहातांना भांडारकरांना विसरणें शक्य नाहीं. मागल्या शतकांतील प्राच्य विद्या संशोधन-क्षेत्रांत आपल्या विशाल कर्तृत्वानें उठून दिसणारी भांडारकर ही एक श्रेष्ठ व्यक्ति आहे, अशी कबुली इतिहासाला द्यावी लागेल. ही व्यक्ति महाराष्ट्रीय म्हणून तिचा महाराष्ट्राला विशेष अभिमान वाटल्यास तें सरळच आहे.

# महादेव गोविंद रानडे

महाराष्ट्रांतच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानांत ज्यांच्या कर्तबगारीला दुसरी तोड सांपडायची नाहीं अशी महाराष्ट्रांतील गेल्या शें–दीडशें वर्षांतील अद्वितीय श्रेष्ठ व्यक्ति जर सांगायची झाली तर न्या. मू. महादेव गोविंद रानडे यांचें एकट्याचेंच नांव उच्चारून थांबावें लागेल. त्यांनीं महाराष्ट्रांत विचारजागृतीच्या कर्तृत्वाचें चैतन्य खेळविलें व इंग्रजी राज्यापूर्वीचें महाराष्ट्राचें तेज पुनः निराळ्या रीतीनें उदयास आणलें.

पण त्यांची कामगिरी केवळ महाराष्ट्रापुरतीच नव्हती. त्यांनीं कॉंग्रेस, सामाजिक कॉन्फरन्स, औद्योगिक परिषद यांसारख्या कितीतरी अखिल भारतीय महत्त्वाच्या संस्थांना जन्म दिला व बाल्यावस्थेंत त्या संस्थांचें आईच्या ममतेनें संगोपन केलें. पुण्यांतील पर्वती देवस्थानाची व्यवस्था नीटनेटकी करण्यासाठीं अवतरलेल्या सार्वजनिक सभेला त्यांनीं एकदां अखिल भारतीय महत्त्वास चढविलें होतें. याशिवाय त्यांच्या प्रेरणेनें व प्रोत्साहनानें उत्पन्न झालेल्या लोकोपयोगी संस्थांची गणती करायला गेल्यास रानड्यांच्या सर्वंकष कर्तृत्वाचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं. यामुळेंच त्यांना शतकांतून जन्मास येणारा एकादाच पुरुष ( Century man ) अशा योग्यतेचे मानण्यास हरकत नाहीं. लोकप्रियतेच्या कसोटीनें पाहिल्यास रानडे टिळकांच्या जोडीला बसणारे नाहींत; परंतु माणसाची योग्यता ठरविण्याची लोकप्रियता ही एकच कसोटी नाहीं.

## बालपण

रानडे यांचा जन्म १८४२ साली निफाड गांवीं झाला आणि १९०१ सालीं त्यांनीं मृत्युलोक सोडला. लहानपणी त्यांची वागणूक अतिशय बावळट व भोळसर वाटण्याजोगी होती, असें दाखविणाऱ्या अनेक आख्यायिका आहेत. त्या आख्यायिकांत त्यांच्या भावी मोठेपणाचीं बीजेंही आढळतात. 'प्राप्त-मुपासीत' या तत्त्वान्वयें त्यांनीं आपल्या जीवनाला जें वळण दिलें, त्याच्या खुणा त्यांच्या बालपणींच्या चरित्रांत दिसतात. रानड्यांना लोक

शांतिब्रह्म म्हणत असत. कसलाही प्रसंग कोसळला तरी डगमगायचे नाहीं, संतापायचें नाहीं, हा सद्गुण त्यांनीं प्रयत्नानें कमावला होता. जात्या ते तापट होते परंतु राग आणणाऱ्या प्रसंगीं मनाचा क्षोभ व अपशब्दांचा उच्चार टाळण्यासाठी ते स्वतःला एकाद्या खोलींत कांहीं काळ कोंडून घेत, अशी एक आख्यायिका त्यांच्या एका समकालीन मित्रानें लिहिलेली आहे. राग जिंकण्याचा अभ्यास ते विद्यार्थिदशेंतच करीत होते. मुंबईला विद्यार्जन करीत असतां त्यांनीं एका निबंधांत भारतवर्षाचें प्राचीन वैभव आणि इंग्रजी राज्यांतील दैन्य यांचें वर्णन लिहिलें. त्यावर त्यांचा इंग्रज प्रोफेसर नाराज झाला. इंग्रजी राज्याचे दोष त्यांना पुराव्यानें सिद्ध करतां येईनात. तेव्हां खात्रीच्या आधारावांचून बोलूं नये हा धडा ते शिकले. ही गोष्ट शाळेंतील आहे. कॉलेजांत असतांना त्यांच्यावर असला प्रसंग ओढवला नाहीं, उलट त्यांच्या अफाट ज्ञानाचें सर्वांकडून कौतुक होऊं लागलें. एलएल. बी. च्या परीक्षेसाठी त्यांनीं लिहिलेलीं उत्तरें वाचून त्यांच्या परीक्षकांनीं १०० गुणांऐवजीं १२५–१३० असे गुण त्यांना दिले होते. त्यांचें असामान्य ज्ञान निदर्शनास येण्याकरितां हा प्रकार परीक्षकांनीं स्वीकारला होता. विद्यापीठाच्या अधिकृत निर्णयपत्रकांत साहजीकच हा प्रकार दिसत नाहीं.

ज्या इंग्रज कायदेपंडितांच्या पुस्तकांचा प्राध्यापकांनी अभ्यास केला, त्यांच्यापेक्षांही त्या त्या विषयांतील ज्ञानाची अधिकता व सूक्ष्मता रानड्यांच्या उत्तरांत दिसून आल्यामुळें त्यांची योग्यता १०० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यापेक्षां जास्त आहे, अशा अभिप्रायासह परीक्षकांनीं त्यांना १०० हून अधिक गुण दिले. त्यांच्या उत्तरांच्या वह्या मुंबईतील कायद्याच्या कॉलेजांत जुन्या दप्तरामध्यें कालपरवांपर्यंत होत्या; परंतु त्यांचा नाश झाल्याचें ऐकिवांत आहे.

रानड्यांच्या मननशील व नव्या विचारांना जन्म देणाऱ्या अभ्यासाची कल्पना येण्यासाठीं ही गोष्ट सांगितली आहे. त्यांनीं विद्यार्जनकाळीं वाचलेल्या पुस्तकांच्या छाती दडपून टाकणाऱ्या याद्या त्यांच्या विस्तृत मराठी चरित्राच्या शेवटी जोडलेल्या आहेत. त्यांवरून त्यांच्या अभ्यासांतील श्रमाची कल्पना करतां येते. नव्या विचारांचें स्फुरण व धैर्य त्यांच्या बुद्धींत कसें वसत होतें, याची कल्पना वरील माहितीनें होईल. अभ्यासाच्या ताणानें त्यांचे डोळे

याच दिवसांत बिघडले व पुढें एक डोळा तर अजिबात काम करीनासा झाला होता. या स्थितीस अनुलक्षून कै. सर नारायण चंदावरकरांनीं एका ठिकाणीं लिहिलें आहे कीं, इतरांच्या दोन्ही अव्यंग डोळ्यांना जेवढें आकलन होत नाहीं त्याहून जास्त प्रमाणांत रानड्यांचा एकच डोळा कोणत्याही विषयाचें अंतर्बाह्य आकलन करीत असे.

इतक्या मोठ्या योग्यतेच्या पहिल्या पदवीधराची सोय सरकारानें सहज लावावी हें त्या कालानुसार क्रमप्राप्तच होतें. त्यांना लहान लहान नोकऱ्या मिळतां मिळतां अखेरीस ते सब्‌जज्ज होऊन पुण्यास गेले. १८६१ ते १९०१ या ४० वर्षांच्या कालावधींत आपल्या देशहिताच्या नानाविध उद्योगांच्या जोरावर देश जागृत झालेला पहाण्याचें भाग्य त्यांना लाभलें. त्यांचे अगदीं सुरुवातीचे विचार एल्फिन्स्टन कॉलेजांतील ज्ञानप्रसारक मंडळाच्या सभांतून व्यक्त झाले आहेत. त्या दिवसांत जागृतिसाधक नव्या नव्या कल्पना निघत होत्या व त्यांतील योग्य कल्पनांचा स्वीकार रानडे करीत होते; इतकेंच नव्हे तर त्या कल्पना मूर्तावस्थेस याव्या यासाठीं अहर्निश झटत होते. हा कोणी थोर पुरुष आहे याची जाणीव लोकांना ते ३६ वर्षांचे असतांनाच झालेली होती, याचें प्रमाण त्या वयांत ते विषमज्वरानें अंथरुणास खिळले असतां पुण्यांतील सर्व प्रकारच्या नागरिकांमध्यें अतिशय चिंता उत्पन्न झाल्याचें दिसत होतें, ही सार्वजनिक चिंता त्यांचे महत्व लोकांना पटल्याची साक्ष आहे. यांतील मौज ही कीं, रानडे सुधारक म्हणून त्यांच्याविषयीं एरवीं अनादर दाखविणाऱ्या सनातनी मंडळीनेंही त्यांना आरोग्य प्राप्त व्हावें म्हणून देवळांतून अनुष्ठानें चालविलीं होतीं.

## विविध संस्थांचें कार्य

रानड्यांचा प्रार्थना समाज, विधवाविवाह मंडळ, वक्तृत्वोत्तेजक सभा अशा अनेक संस्थांशीं संबंध होता. त्यांचे धार्मिक व आध्यात्मिक विचार नीट समजून घ्यावयाचे असतील तर त्यांचा Confession of a Theist हा निबंध अभ्यासावा. त्यांत त्यांच्या सूक्ष्म आणि व्यापक धर्मविचारांचीं फळें सर्वत्र पसरलेलीं आहेत. विधवाविवाह मंडळाच्या कामांतून १८७० सालीं पुण्यास जो मोठा शास्त्रार्थाचा प्रसंग निर्माण झाला, त्यांत रानडे

मुद्राकारानें चमकले. या शास्त्रार्थांतून उद्‌भवलेल्या फिर्यादींपैकीं एका फिर्यादीचा निकाल रानड्यांकडून जज्जानें लिहून घेतल्याची बोलवा आहे. १८७० पूर्वीं एल्फिन्स्टन कॉलेजांत इंग्रजी विषय शिकविण्याचें काम करीत असतां त्यांनीं जगांतील सात थोर पुरुषांच्या चरित्रासंबंधीं अविस्मरणीय व स्फूर्तिदायक व्याख्यानें दिल्याचें वृत्त कै. चंदावरकरांच्या एका लेखांत आहे. दुर्दैवानें तीं व्याख्यानें आज उपलब्ध नाहींत. १८७१ मध्यें त्यांची पुण्यास वस्ती झाल्यावर त्यांनीं 'स्वदेशी व्यापारा' विषयीं व्याख्यानें देऊन स्वदेशीची जागृति केली. व्याख्यानाच्या परिणामीं कित्येकांनीं, आजच्या भाषेंत बोलायचें म्हणजे, खादीचें व्रत अंगीकारलें. त्या कामीं स्वदेशी-पुरस्काराचे कीर्तनकारही पुढें आले होते. या व इतर व्याख्यानांतील औद्योगिक उन्नतीच्या विचारांत त्यांनीं कामगार व शेतकरी यांची तुलना करून संघटित कामगार समाजप्रगतीला कसा उपकारक होऊं शकतो याचेंही विवेचन केलेलें आहे. आचरणांत स्वदेशी उतरविणारे कै. गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' हे कांहीं दिवस कित्येक टवाळ पुणेकरांच्या थट्टेचा विषय झाले होते. विदेशी म्हणून घड्याळ वापरायचें नाहीं, अशा बाण्यानें सार्वजनिक काकांपुढें गळ्यांत पाण्यानें भरलेलें एक लहानसें घंगाळ व त्यांत घटकापात्र टाकलेलें, अशा तऱ्हेचें सोंग घेऊन कित्येक कुचेष्टेखोर कांहीं दिवस काकांना मुद्दाम सामोरे जात असत, अशी गंमत सांगणारे वृद्ध वीसपंचवीस वर्षांपूर्वीं पुण्यांत होते.

## धामधुमीचीं पाच वर्षे

१८७५ ते १८८० हीं पांच वर्षें महाराष्ट्राला व एकंदर देशाला फार कठिण गेलीं. दुष्काळानें देश व्यापला होता. महाराष्ट्रांत शेतकऱ्यांनीं तीन चार जिल्ह्यांमध्यें सावकारांना लुटण्याचा, त्यांचीं घरें जाळण्याचा व नाकें कापण्याचा धुमाकूळ आरंभिला. १८७५ मध्यें बडोद्याच्या मल्हारराव गायकवाडांना इंग्रजांनीं गादीवरून उतरविल्यामुळें महाराष्ट्रांत खळबळ उडाली होती. १८७७ सालीं ऐन दुष्काळाच्या तडाख्यांत लिटनसाहेबांनीं दिल्लीस मोठा दरबार भरविला. दरबाराच्या आजूबाजूस दुष्काळानें पटापट माणसें मरत असतां त्याची पर्वा न करतां इंग्रजांनीं आपल्या साम्राज्याचा

दिमाख दरबार भरवून मिरवावा यांचें लोकांना वैषम्य वाटलें. वायव्य-सरहद्दीवर युद्ध भडकलें, तर इकडे महाराष्ट्रांत फडक्यांच्या बंडाच्या ठिणग्यांचे चटके बसू लागले. त्यांतच देशी भाषेंतील वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणाऱ्या कायद्याचा अवतार झाला. १८७९ सालअखेर असे अस्वस्थता चालू ठेवणारे प्रकार घडत होते. या साऱ्या प्रकरणांत पुण्याच्या सार्वजनिक सभेनें रानड्यांच्या नेतृत्वास अनुसरून जी कामगिरी केली तिचें स्मरण महाराष्ट्रानें सदैव ठेविलें पाहिजे. शेतकरी सावकारांविरुद्ध चिसाळून उठले, याची मीमांसा करतांना रानड्यांनीं सावकारांचा दोष नसून खरा दोष सरकारच्या कारभारांत आहे असें सिद्ध केलें. सरकारनें अर्थातच त्यांचें म्हणणें ऐकलें नाहीं. त्यांनीं सावकारांनाच दोषी ठरवून शेतकऱ्यांच्या रक्षणासाठीं नवा कायदा अंमलांत आणला. रानडे तेव्हां कायदेमंडळांत असल्यामुळें त्यांनीं त्या कायद्याच्या उभारणींतील दोष दाखविले; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. कायदा कित्येक-कारणास्तव रानड्यांना मान्य नसतांही सरकारनें त्याच्या अंमलबजावणीचें काम रानड्यांच्या गळ्यांत घातलें. दुष्काळांतील सरकारी कामांतील दोष उघडकीस आणले म्हणून एकदां सार्वजनिक सभेची मान्यता रद्द करण्यापर्यंत सरकारनें आपल्या वक्रदृष्टीची मजल नेली. मल्हारराव गायकवाडांच्या प्रकरणांत सार्वजनिक सभेमार्फत गेलेल्या खलित्यांतील अनेल मूलग्राही सडेतोड विचार पाहून सरकारनें तो मजकूर रानड्यांनींच तयार केला असला पाहिजे असा ग्रह करून घेतला व त्यास अनुसरून लेखकाची चौकशी कलेक्टरमार्फत आरंभिली. कलेक्टरानें रानड्यांचा उजवा हात म्हणून सार्वजनिक काकांना प्रश्न विचारले. काकांनीं त्या मसुद्याची सारी जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन कलेक्टरास जबाब दिला कीं त्याचा लेखक कोणी एकजण असता तर त्याचें नांव सांगता आलें असतें. परंतु तो मसूदा कसा तयार झाला याची हकीकत मोठी विचित्र आहे. माझें घर शाळाकॉलेजांच्या व कचेऱ्यांच्या वाटेवर आहे. मी दाराबाहेर एक टेबल व त्यावर कागद, लेखणी, दौत अशी तरतूद करून ठेवली आणि येणाराजाणाराला अमूक मजकूर इंग्रजींत लिहून द्या अशी विनंति करून मसुद्याची वाक्यं इंग्रजींत लिहून घेतली. त्यांतली चांगलीं कोणतीं आणि वाईट कोणतीं हें समजण्याइतकें इंग्रजीचें ज्ञान मला आहे. त्याप्रमाणें इष्ट व योग्य वाक्यें निवडून जुळवून एकंदर मसुदा तयार केला. यामुळें नांव कोणाचें सांगतां

येणार ? काकांचें उत्तर ऐकून कलेक्टरास गप्प बसण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. काकांच्या हजरजबाबीपणाच्या अनेक दंतकथा आहेत, त्यांतलीच ही एक आहे. आतां तो लेख रानड्यांच्या लेखणीचा ही गोष्ट उघड झालेली आहे. १८७९ मध्यें विश्रामबाग व बुधवारचा असे दोन पेशव्यांचे वाडे जळाले. त्या वाड्यांच्या आगीचे गुन्हेगार शोधण्याचें काम रानड्यांनीं केलें असतांही आगीच्या मुळाशीं बंडखोर फडके व त्याचे सल्लागार रानडे असले पाहिजेत, या संशयानें रानड्यांना पुण्याहून सरकारनें हलविलें व प्रथम नाशकास आणि नंतर धुळ्यास रवाना केलें. तेथें त्यांच्यावर हेरखात्याची नजर होती. तथापि रानडे सर्व संशयांतून बाहेर पडले व पुन्हां पुण्यांत दीड वर्षांनीं आले.

। फडक्यांच्या खटल्यांत आरोपीच्या बचावाची वकिली काकांनीं रानड्यांच्या सांगण्यावरून केली. फडक्यांना शिक्षा झाल्यावर ते एक महान् देशभक्त असल्याचा अभिप्राय एकट्या रानड्यांनीच लोकांच्या नजरेपुढें एका लेखाच्या द्वारे ठेवला. हें धाडस रानड्यांना करवलें. बाकीचे लोक मूग गिळून बसले होते.।

**कॉंग्रेसची स्थापना**

।पुण्यास आल्यावर पुढील तेरा वर्षांत त्यांनीं जीं कामें केली, त्यांतलें इंडियन नॅशनल कॅांग्रेसची स्थापना हें काम अतिशय महत्त्वाचें आहे.। १८८३ मध्यें ह्यूम नांवाचा एक इंग्रज सिव्हिल सर्व्हंट सेवानिवृत्त झाला. त्यानें १८५७ सालांतील बंड अनुभविलें होतें. आणि सेवानिवृत्त होण्याच्या काळांत त्या बंडाच्या पूर्वीसारखीं लक्षणें देशाच्या स्थितींत त्याला दिसूं लागल्यामुळें लोकांच्या धुमसणाऱ्या असंतोषाला वाचा फोडण्याचें साधन शोधण्यांत तो गुंग होता.

त्याच्या प्रयत्नाला १८८३ साली कलकत्त्यास यश आलें. त्याची वाढलेली आवृत्ति मद्रास शहरीं झाली व १८८५ मध्यें कॉंग्रेसच्या स्थापनेनें त्या प्रयत्नाला नवें टिकाऊ रूप प्राप्त झालें. ह्यूम हाच पुष्कळ वर्षें कॉंग्रेसचा चिटणीस होता. परंतु त्याचे मुख्य मार्गदर्शक रानडे होते. रानड्यांच्या नांवावरून तो त्यांना Great God (महादेव) असें म्हणत असे. पहिलीं काहीं वर्षें कॉंग्रेसमध्यें रानडे उघड भाग घेत होते. परंतु सरकारनें आपल्या नोकरांनीं राजकारणांत पडूं नये असें फर्मान जारी केल्यावर रानड्यांनीं कॉंग्रेसला जोडून सामाजिक परिषदेचीं अधिवेशनें सुरूं

केलीं. दोन्ही संस्थांत ते सारखेच आस्थेनें व उत्साहानें भाग घेत होते. नंतर त्यांनीं एकट्याच्या जबाबदारीवर औद्योगिक परिषदेचा पाया घातला. तो प्रथम मुंबई इलाख्यापुरताच होता. पुढें त्याचा विस्तार देशव्यापी झाला. त्यांनीं सामाजिक व औद्योगिक परिषदेंतील भाषणें आजसुद्धां वाचनीय वाटण्याइतक्या दूरदर्शी विचारांची आहेत. औद्योगिक परिषदेचा पाया भक्कम होण्यासाठीं त्यांनीं 'इंडियन एकानॉमिक्स' हा विषय उदयास आणला. अर्थशास्त्र हें गुरुत्वाकर्षणासारखें साऱ्या जगांत एकाच परिणामाचें नसून देशागणिक तें बदलूं शकतें, याचा उहापोह या विषयाच्या प्रतिपादनांत आहे. आतां हा विषय इतक्या परिचयाचा झाला आहे कीं एकदां त्याचा उच्चार करण्याची चोरी होती, याची कल्पनासुद्धां होणार नाहीं. 'इंडियन एकानॉमिक्स' वरील त्यांचें भाषण डेक्कन कॉलेजांत झालें; या कॉलेजांत वेन या नांवाचा एक इंग्रज अध्यापक आपणच काय ते एकटे या विषयाचे खरे मर्मज्ञ-पारंगत आहों, अशा अहंकारानें मिल्लसारख्या नामांकित इंग्रज अर्थशास्त्रज्ञाचेंही कॉलेजांत वाभाडे काढायला मागेपुढे पहात नसे. हिंदुस्थानांत अर्थशास्त्रज्ञ कोणीच नाहीं अशी त्याची ठाम समजूत होती. तो व्याख्यानाच्या वेळीं फिरावयास निघाला असतां रानड्यांचें वक्तृत्व ऐकण्याठीं सभास्थानाच्या दारांत येऊन उभा राहिला; ऐकतां ऐकतां तो इतका तल्लीन झाला कीं, फिरायला जाण्याचें विसरला. व्याख्यान संपताच हळूच बाहेरच्या बाहेर निघून गेला. पण दुसऱ्या दिवशीं वर्गात आल्यावर आपली घमेंड विसरून त्यानें रानड्यांची मुक्तकंठानें प्रशंसा केली.

याच काळांत म्हणजे १८९२ नंतर रानडे Rise of The Maratha Power या पुस्तकाचीं प्रकरणें लिहीत होते. हीं प्रकरणें व्याख्यानाच्या व मागून कित्येक नियतकालिकांतून लेखांच्या रूपानें लोकांसमोर आलीं. सह्याद्रींत वणवा जसा अकस्मात् कांहीं पूर्वयोजनेवांचून पेटतो आणि विझून जातो तसा मराठेशाहीचा प्रकार असल्याची इंग्रज इतिहासकारांची कल्पना खोडून टाकण्यासाठीं रानडे मराठ्यांचा इतिहास लिहूं लागले. मराठेशाहीच्या उदयापूर्वी जनता कशी संघटित होऊं लागली होती व पुढें जनतेच्या संघटनेला स्वराज्याचें फळ कसे आलें, हें सिद्ध करण्याचा उद्देश पुढें

ठेवून त्यांनीं वेगवेगळीं प्रकरणें लिहिली. या प्रकरणांतील संतांच्या कामगिरीचें व शिवाजीच्या राज्यकारभाराचें अशीं दोन प्रकरणें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. संतांनीं देशाला तारण्याचा उद्योग केला हें पहिल्याचें सार असून दुसऱ्यांत शिवाजीच्या राज्यकारभाराच्या सर्व अंगोपांगांचा सूक्ष्म परामर्श आहे. शिवाजी केवळ पराक्रमी योद्धा किंवा धाडसी सेनापति नव्हता तर पहिल्या श्रेणींत बसविण्याच्या योग्यतेचा कुशल राज्यकर्ता होता असें दुसऱ्याचें तात्पर्य आहे.

## ऐतिहासिक संशोधन

संतविषयक प्रकरणामुळें महाराष्ट्रांत संतांच्या चरित्रांचा व वाङ्मयाचा अभ्यास सुरू झाला. राज्यकारभाराच्या प्रकरणानें आपल्याला मार्गदर्शन केलें अशी मराठ्यांच्या राज्यकारभारावर पुस्तक लिहिणारे डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांची साक्ष अगदी अलीकडची आहे. रानड्यांचें तें प्रकरण आपल्या डोळ्यासमोर नसतें तर ऐतिहासिक कागदपत्रांच्या जंगलांतून वाट काढणें कठिण होतें, असा सेनबाबूंच्या साक्षीचा मथितार्थ आहे. हें पुस्तक वाचल्यावर एल्फिस्टन कॉलेजांतील इतिहासाच्या एका इंग्रज अध्यापकानें राजाचें वैभव ललकारून लोकांचें लक्ष वेधून घेणाऱ्या भालदाराप्रमाणें मराठेशाहीचें चित्तवेधक भव्य स्वरूप रानड्यांनीं प्रकाशांत आणले आहे, असे उद्गार काढून तें पुस्तक वाचण्याबद्दल विद्यार्थ्यांना शिफारस केली. महाराष्ट्राविषयींचा रानड्यांचा अभिमान मराठ्यांनीं संभाजीच्या पश्चात औरंगजेबाशीं जो अठरा वर्षें निकराचा लढा केला त्याच्या हकीकतीच्या प्रकरणांत व्यक्त झाला आहे. हा इतिहास काशीनाथपंत तेलंगांनीं लिहावा असा संकल्प असतां त्यांच्या अकालनिधनामुळें आपल्याला हें काम करावें लागत आहे, असेंहि रानड्यांनीं म्हटलें आहे. या पुस्तकाची प्रस्तावनासुद्धां त्यांच्या मूलग्राही बुद्धिमत्तेबद्दल विस्मय उत्पन्न करणारी वाटेल. अफझुलखानाला शिवाजीनें मारल्याचा प्रसंग त्यांनीं अशा न्याय-शुद्ध शब्दांनीं वर्णिला आहे कीं, कांहीं वर्षांमागें फर्ग्युसन कॉलेजांत रालिन्सन व म. म. पोतदार यांचा या प्रसंगावरून वाद झाला तेव्हां रानड्यांच्या वर्णनांतील सूचकतेच्या साह्यानें पोतदारांनीं प्रतिपक्षावर मात

केल्याचें पुष्कळांच्या स्मरणांत असेल. रानड्यांनीं हें पुस्तक लिहिलें त्यावेळीं आजच्याइतकीं साधनें उपलब्ध नव्हतीं. परंतु रानड्यांच्या ठिकाणीं इतिहासाच्या ज्ञानाची प्रतिभा होती. तिच्या बळावर त्यांनीं जें कार्य केलें तिला मागें टाकणाऱ्या प्रतिभेचा पुरुष अद्यापि महाराष्ट्रांत उदयास आलेला नाहीं.

तेलंगांचें कार्य आपण करित आहों, असें रानड्यांनीं मित्रप्रेमानें आपल्याकडे कमीपणा घेऊन म्हटलें असलें तरी रानड्यांचें इतिहाससंशोधन व अध्ययन पुष्कळ आधीपासून चाललें होतें. १८७८ त काव्येतिहास संग्रह हें मासिक निघालें त्यावेळीं त्याकरितां आपल्याजवळची ऐतिहासिक साधनें रानड्यांनीं दिलीं. या मासिकाला त्यांची मदत होती. याच सुमारास वक्तृत्वोत्तेजक सभेंत 'शिवाजीच्या राजकारणाचें स्वरूप' या सारखे विषय ठेवून त्यावर बोलणाऱ्या तरुण वक्त्यांच्या विचारांचा परामर्श ते घेत असत. पुढें एका इंग्रज गृहस्थानें शिवाजीच्या समाधीची उध्वस्तावस्था एका लेखांत रेखाटून महाराष्ट्राच्या अभिमानाला व इंग्रज राज्यकर्त्यांच्या समंजसपणाला जोराचा धक्का दिला. त्या धक्क्यानें १८८६ सालीं पुण्यांत अखिल महाराष्ट्रानें शिवाजी महाराजांचा टोलेजंग स्मरणोत्सव साजरा केला. त्यांत राजेरजवाडे, जहागीरदार, इनामदार असे सर्व वर्ग सामील होते. शिवाजीच्या समाधीचा जीर्णोद्वार हा त्या समारंभाचा उद्देश होता. या समारंभाच्या योजनांत रानडे होते. यानंतर सरकारी रोषाच्या भितीनें राजे–इनामदार यांनीं त्याच्याशीं संबंध सोडला. यामुळें समारंभ मागसला, पण शिवाजीच्या अभिमानाबरोबरच एकंदर इतिहासाच्या ज्ञानाची जागृति वाढत गेली. नंतर टिळकांच्या पुढाकारानें लोकांनीं तो उत्सव हातीं घेऊन त्याची कार्यक्षमता वाढविली.

रानड्यांच्या ऐतिहासिक लेखांमुळें मराठेशाहीच्या समीक्षणाला निराळी पाणीदार गति मिळाली. मराठ्यांच्या प्रकृतीवर रानटी, क्रूर, लुटारू, योजनाशून्य वगैरे दोष लादून इंग्रजानीं जो तेजोभंग चालविला होता तो रानड्यांच्या इतिहासानें नष्ट झाला. रानड्यांनीं हा इतिहास शाहूच्या कारकीर्दीपर्यंत आणून सोडला. पुढचा भाग त्यानीं लिहिला होता. परंतु तो त्यांच्या मृत्यूनंतर कोणीतरी लांबवून कायमचा नाहींसा केला. ज्याच्याकडे तो गेला त्याला कै. रमाबाईनीं व रानड्यांच्या इतर मित्रांनीं अनेक विलोभनें दाखविलीं. पुष्कळ

वजविजी केल्या परंतु त्यांचा उपयोग झाला नाहीं. तो भाग कायमचा नाहींसा झाला, असें आज समजावें लागतें.

## पेशवे रोजनिशांची प्रस्तावना

इतिहासाच्या क्षेत्रांतील आणखी एक प्रबंध म्हणजे पेशवे रोजनिशांना लिहिलेली प्रस्तावना हा होय. ही प्रस्तावना रानड्यांनीं १८९३ सालीं लिहिली. रोजनिशांचें प्रकाशन पुढें हळूहळू १५ वर्षं चाललें होतें. १८८३ सालीं त्यांनीं व तेलंगांनीं सरकारच्या मागें पेशवे दप्तरांतील कागदपत्रांच्या अभ्यासाला परवानगी मिळविण्यासाठीं तगादा सुरू केला. सरकारानें परवानगी दिल्यावर पेशवे रोजनिशींचे कागद निवडून ते छापण्याला प्रारंभ करण्यांत आला. रानड्यांनीं त्यांच्या प्रसिद्धीपूर्वीच त्यांचा अभ्यास करून आपली प्रस्तावना लिहिली व तिच्या आधारें इंग्रजांना आपला चलनव्यवहार सुधारण्यासारख्या अनेक गोष्टी पेशवाईंत घडत असल्याचें दाखवून दिलें आहे. पेशवाई म्हणजे बेबंदशाही नव्हे असें पटविण्याचा रोख त्यांच्या प्रस्तावनेंत आहे. रानड्यांच्या कांहीं महत्त्वपूर्ण लेखनाचा येथें निर्देश केला आहे. याशिवाय त्यांची इंग्रजी राज्यांतील जमाबंदी खात्याबद्दल व फडनिशी खात्याबद्दल अशीं दोन पुस्तकें आहेत. तीं यापूर्वींचीं आहेत. पेशवे रोजनिशा ज्या संस्थेमार्फत प्रसिद्धी पावल्या ती डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी रानड्यांनीं लोकहित-वादीचें स्मारक म्हणून अस्तित्वांत आणली. या नांवाची एक संस्था १८५० च्या सुमारास अस्तित्वांत होती. पुढे दक्षिणा प्राईज कमेटी त्या संस्थेचें काम करूं लागली. पण ती अस्तास गेली. तेव्हां तिच्या करितां सरकारांतून खर्ची पडणारें द्रव्य आपल्या संस्थेकडे ओढून रानड्यांनीं या संस्थेचें आसन दृढ केलें. रानड्यांचा हात लोकहितवादींच्या मराठी ग्रंथोत्तेजक मंडळात व त्याच्या विद्यमानें भरणाऱ्या ग्रंथकारांच्या संमेलनांत होताच. आता या संमेलनांचें साहित्यसंमेलनांत रूपांतर झाल्याचें सर्वांना माहीतच आहे.

## विद्यापीठांत देशी भाषांचा प्रवेश

१८७० सालीं मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांतून देशी भाषांना अर्ध-चंद्र मिळाला. रानडे हे मराठीचे विद्यार्थी. संस्कृतचा अभ्यास त्यांनीं पुढें केला. परंतु त्यांचा मराठीचा अभिमान सुटलेला नव्हता. त्यांचे आरंभींचे लेख

मराठीत लिहिलेले आहेत. आपल्या जन्मभाषेची विद्यापीठांतून झालेली हकालपट्टी त्यांना सहन झाली नाहीं व त्यांनीं सतत वीस वर्षें झटून उद्योग चालवून विद्यापीठांत मराठीचा प्रवेश करून दिला. १८६७ मध्यें एका लेखांत त्यांनीं मराठीच्या उत्कर्षाबद्दल दाखविलेला आशावाद पुढील काळांत सफल होऊं लागला होता. तरी मराठी ही विद्यापीठीं शोभणारी भाषा नाहीं अशी कल्पना उराशीं बाळगणारे कित्येक दुराराध्य महाराष्ट्रांत होते. शेवटीं रानडे या सर्व दुराराध्यांना पुरून उरले. १८९० नंतर या बाबतींत रानड्यांनीं दाखविलेली चिकाटी विलक्षण वाटणारी आहे. त्या चिकाटीचाच शेवटीं विजय झाला.

## राजकीय धोरण

आतां त्यांच्या राजकीय विचाराकडे वळणें बरें. रानड्यांवरही इंग्रज-धार्जिणेपणाचा आरोप आहे. इंग्रजांशीं गांठ पडली या दैवयोगाबद्दल कधीं त्यांनीं तिरस्कार दाखविला नाहीं, हें या आरोपाचें मूळ आहे. त्यांनीं तिरस्कार दाखविला नाहीं, उलट इंग्रजी वर्चस्वाच्या दैवयोगानें आपलें नशीब उघडेल अशी भावना व्यक्त करून त्यांनीं या आरोपाला अवकाश करून दिला असेंही म्हणतां येईल. हा आरोप आपलें स्वराज्याचें अंतिम ध्येय कोणत्या भाषेंत व्यक्त करावयाचें या प्रश्नाशीं संलग्न आहे. परंतु या आरोपाचें परीक्षण करूं लागल्यास प्रातिनिधिक राज्य, वसाहतीचें स्वराज्य या कल्पनांचा उच्चार रानड्यांच्या तोंडून प्रथम बाहेर पडलेला पाहून या आरोपामध्यें तथ्य नसल्याचें दिसून येण्याला उशीर लागत नाहीं. हिंदुस्थानांतून विलायतच्या पार्लमेंटांत पंचवीस तीस प्रतिनिधि जावे, हें ध्येय रानड्यांनीं १८७४ मध्यें सार्वजनिक सभेमार्फत पार्लमेंटकडे एका अर्जाच्या रूपानें रवाना केलें. त्यावर टीका झाली तेव्हां वसंत व्याख्यानमालेच्या प्रारंभीं त्यांनीं राजकीय ध्येयाचें लोकांना शिक्षण देण्यासाठीं हा प्रयत्न आहे, असें उत्तर एका व्याख्यानांत दिलें आहे. पुढें १८७७ सालीं हिंदुस्थानांतील कायदेमंडळाला राजेरजवाड्यांचे एक वरिष्ठ कायदेमंडळ जोडून कॉमन्स व लॉर्डस् यासारख्या सभांची स्थापना येथें व्हावी अशी आकांक्षा त्यांनीं दिल्ली दरबारांत सार्वजनिक सभेच्या विद्यमानें सादर केली. नंतरच्या वर्षांत ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहतींच्या स्वराज्याची मागणी त्यांनीं खोलून दाखविलेली आहे.

हिंदुस्थान हा तीस कोटी लोकसंख्येचा देश कायमच्या गुलामगिरींत ठेवणें इंग्रजांना शक्य नाहीं. चालू पारतंत्र्यांतून त्याची मुक्तता होण्याचे मार्ग दोन आहेत. एक बंडाळीचा व दुसरा इंग्रजांनीं स्वेच्छेनें स्वराज्य देण्याचा. बंडाळीचा मार्ग घातक असल्यानें इंग्रजांनी वसाहतींना दिलें तसें स्वराज्य येथें द्यावें, अशी त्यांची विचारसरणी कित्येक लेखांतून पुढें आलेली आहे. रशिया, फ्रान्स, अमेरिका व इंग्लंड यांच्या साम्राज्यतृष्णेचा विचार करून एकदां त्यांनीं असेंही भाकीत वर्तविलें होतें कीं, या चार राष्ट्रांच्या संघर्षामुळें हिंदुस्थान देश पारतंत्र्यांतून सुटण्याचा योग येईल. हिंदी जनता ही देवाची लाडकी जनता आहे, तिची उपेक्षा देव कधींच करणार नाहीं; परंतु ती सर्वांगसंपन्न झाली पाहिजे. सर्वांगसंपन्नतेची तपश्चर्या आज देव करायला लावीत आहे. ही तपश्चर्या आपल्या देशाला जगाच्या गुरुस्थानीं बसवील, असा त्यांचा दृढविश्वास त्यांनी वारंवार प्रकट केलेला आहे. कॉंग्रेससारख्या राजकीय संस्थेच्या जन्मदात्यामध्यें ज्यांची गणना करावी लागते, त्यांची इंग्रजधार्जिणे या शब्दानें संभावना करण्याला त्यांच्या कामगिरींत सवड नाहीं. त्यांच्या हयातीच्या काळांत राज्यद्रोहाची भावना सुशिक्षितांच्या हृदयाला स्पर्शदेखील करीत नव्हती याचे पुरावे पुष्कळ आहेत.

## धार्मिक मतें

आपल्या देशाच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल जसा त्यांचा विश्वास होता, तसाच हिंदुधर्माबद्दलही होता. प्रार्थनासमाज हा हिंदु भागवत धर्माचा नवा अवतार आहे असें ते म्हणत, यांतही तोच विश्वास दिसतो. हिंदूंच्या ईश्वर-वादाबद्दल त्यांनीं दोनदां जाहीर व्याख्यानें दिलीं. एकदां पुण्यास पेन्टीकास्ट नांवाच्या मिशनऱ्याच्या व्याख्यानांचा समारोप करतांना व दुसऱ्यांदा विल्सन कॉलेजांत स्वतंत्रपणें. पेन्टीकास्ट हा मिशनरी ख्रिस्ती धर्माच्या जयजयकाराचा झेंडा नाचवीत १८९२ सालीं पुण्यास आला. त्याचीं बरींच व्याख्यानें पुण्यास झालीं. रानड्यांनीं त्याचे आभार मानून समारोप केला. त्यावेळीं सर्व धर्मांची तुलना करून हिंदू धर्माच्या पायाशीं बसून इतर धर्मांनीं आध्यात्मिक उन्नतीचे पाठ घ्यावे, असें त्यांनीं प्रतिपादन केलें. दुसऱ्या प्रसंगाचीं व्याख्यानें हिंदु ईश्वरवाद ( Theism ) या विषयावर होती. तेव्हां देखील त्यांनीं हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व पटवून देणारा प्रमाणशुद्ध युक्तिवाद लोकांसमोर ठेवला. या दोन्ही

प्रसंगीं त्यांचें इतर धर्मांचें ज्ञान किती व्यापक आहे, त्याचा सर्वांना पडताळा आला.

## रानड्यांचें श्रेष्ठत्व

अशा या थोर पुरुषाच्या चरित्राची पहाणी केल्यास तिच्यांत हिंदु तत्त्वज्ञान मुरलेलें दृष्टीस पडतें. हिंदूंच्या आध्यात्मिक ग्रंथांतून ज्या चारित्र्य-गुणांची स्तुति आहे त्या गुणांची संपादणी आणि वाढ रानडे जन्मभर करीत होते. त्यांची सरकारांत निःस्पृह असूनही मानमान्यता वाढली. त्यांनीं कधीं लांगूलचालन केलें नाहीं, वरिष्ठांच्या मर्जीखातर आपलीं देशोद्धाराचीं मतें किंवा कामें सोडलीं नाहींत. परनिंदेचा विटाळ आपल्या जिभेला होऊं दिला नाहीं. ज्याची जेवढी कुवत असेल तेवढ्या बेतानें त्यांच्याकडून कामें करून घेतलीं. जनतेकडून निंदा, अवहेलना झाल्यास तिचा राग अथवा विषाद न बाळगता जनतेच्या कल्याणाचा उद्योग आईच्या कळवळ्यानें सदैव चालू ठेवला. सार्वजनिक हिताची कार्यें जणू काय घरचीं जिव्हाळ्याचीं कार्यें अशा भावनेनें त्यांनीं त्यांची जोपासना केली. आपली योग्यता मोठी या जाणिवेनें त्यांनीं कधीं कोणाचा अधिक्षेप केला नाहीं.

टिळक त्यांच्यावर प्रतिकूल टीका करणारे असतांही ते रानड्यांकडे सल्लामसलतीसाठी गेल्यास सुहृद्भावनेच्या मोकळेपणानें ते सल्लामसलत देत. महाराष्ट्रांत आगरकर–टिळकांनीं जो स्वार्थत्यागी लोकसेवेचा नवा तेजस्वी संप्रदाय सुरू केला त्याचा आदर सर्वांपूर्वी मोठ्या कौतुकानें व उत्साहानें करणारे रानडेच होत.

महाराष्ट्राला पेशवाईनंतर आलेली प्रेतकळा उडवून लावून त्याला सचेतन करण्याची काळजी रानड्यांनीं आमरण वाहिली हा टिळकांचा अभिप्राय किंवा अनेक जड गोलांना आपल्या बुद्धिवैभवाचें तेज पुरवून अर्वाचीन हिंदी इति-हासाला संतेज करून सोडण्याचें पुण्य रानड्यांचें, हा गोखल्यांचा अभिप्राय अक्षरशः यथार्थ असल्याचा अनुभव रानड्यांचें कर्तृत्व पाहातांना कुणाच्याही मनाला निर्विवाद पटण्यासारखा आहे. म. गांधींनीं त्यांना हिमालयाची उपमा लावली आहे. सारे उपमा–दृष्टांत असेच आहेत कीं, जे रानड्यांची अतुलनीय श्रेष्ठताच निदर्शनास आणतात.

———

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

पूर्वी वर्णन केलेल्या चार थोर महाराष्ट्रियांपैकीं तिघांच्या चरित्रांत व टिळकांच्या चरित्रांत मूलतः जो फरक सहज दृष्टीस पडणार आहे तो हा कीं, लोकहितवादी, भांडारकर, रानडे हे तिघे सरकारी नोकरीच्या मर्यादा सांभाळून देशसेवा करणारे होते. एकटे ज्योतीबा फुले हेच काय ते स्वतंत्र धंद्यांत राहून लोकजागृतीचा उद्योग करणारे दिसतात. ज्योतिबांची धडाडी मोठी यांत संशय नाहीं. पण त्यांना पुस्तकीं ज्ञानाचें बळ कमी होतें व त्यांनीं जें कार्यक्षेत्र निवडलें तें सहज सफळ व्हावें, असा कस त्यांत उत्पन्न झालेला नव्हता. टिळकांनीं एका ठिकाणीं म्हटलें आहे कीं, ' 'सूर्याचे किरण प्रथम डोंगराच्या उंचवट्यावर पडतात व मग खालीं सपाटीवर उतरतात.' तसाच प्रकार ज्ञानाच्या प्रसाराचा असतो. ज्ञानाचे किरण हिंदूंतील उच्च जातींवर आधीं पडले व त्या जाती प्रथम जागृत झाल्या. नंतर ते किरण बहुजनसमाजाच्या सपाटीवर येऊं लागले. या सपाटीवर ज्ञानाचे किरण पोंचण्यापूर्वींच ज्योतीबांनीं त्या सपाटीला जागृत करावें असा उद्योग चालविला व तो त्यांच्या हयातींत विशेष जोरावला नाहीं. लोकहितवादी नुकतीच विचार पेरण्याची कामगिरी बजावीत होते. एखाद्या विचाराचा प्रभाव अनेकांत दिसूं लागला म्हणजे तशा समान विचाराच्या व्यक्तींना संस्थेच्या रूपानें संघटित करण्याचें दुसरें कर्तव्य रानड्यांनीं पार पाडलें. जागृति, संघटना व प्रत्यक्ष कामगिरी अशा देशोन्नतीच्या तीन पायऱ्या ध्यानांत घेतल्यास कामगिरीच्या तिसऱ्या पायरीवर जनतेला चढविण्याची जबाबदारी टिळकांनीं अंगावर घेतल्याचें दिसून येईल. भांडारकर व लोकहितवादी प्रत्यक्ष कामगिरीच्या चळवळींत शिरल्याचें व त्यांतच रंगून गेल्याचा देखावा त्यांच्या चरित्रांत दिसत नाहीं. रानड्यांनीं चळवळीची दिशा व आस्था दाखविली, परंतु प्रत्येक चळवळींत अगदीं उघडा पुढाकार घेतला नाहीं. जागृति व संघटना या दोन लोकोद्धाराच्या पायऱ्या अस्तित्वांत आल्या होत्या परंतु संघटना क्रियाशील व्हावी लागते. संघटना ही कामगिरीची पूर्वतयारी होय. ती साधन आहे. संघटना क्रियारूढ झाली तरच लोकोद्धाराचा खरा प्रारंभ झाला असें ठरतें. लोकहित-

वादींच्या काळापासून जागृति व संघटना अशा दोन अवस्था जनतेनें प्राप्त करून घेतल्या होत्या. तिसरी प्रगतीची अर्थात हालचालीची किंवा चळवळीची अवस्था उत्पन्न होण्यासाठी एकेका कार्याला ऐन तारुण्यांत सर्वस्व वेचण्याच्या तयारीनें वाहून घेणारी माणसें पाहिजेत, अशी तळमळ रानडे व्यक्त करीत असत. त्यांनीं स्वामी दयानंदाचा सत्कार पुणें शहरीं याच दृष्टीनें केला होता. आपल्या देशांत सर्वसंगपरित्यागानें कार्य करण्याची तयारी मोठ्या योग्यतेची व मानाची समजली जाते. दयानंद हे संन्यासी असून धर्मसुधारणेचा उद्योग त्यांनीं स्वीकारला; त्यांचा आदर्श इतरांनीं गिरवावा या भावनेनें रानड्यांनीं स्वामींचा सत्कार केला. टिळक–आगरकर हे दयानंदांच्या तत्त्वाचे, म्हणजे गृहस्थाश्रमी असले तरी संन्यासवृत्तीनें देशकार्यांतील लोकशिक्षणाचें एक अंग आपल्या शिरावर उचलण्याची हिम्मत धरलेले तरुण जेव्हां रानड्यांकडे शाळा स्थापन करण्याचा संकल्प सांगायला आले तेव्हां त्यांचा रानड्यांनीं गौरव केला.

### चंदावरकरांची आठवण

रानड्यांच्या भेटीस टिळक–आगरकर एकदां आले असतां तेथें सर नारायण चंदावरकर होते. रानड्यांच्या पिढीची दुसरीही मंडळी होती. रानड्यांना टिळक–आगरकरांनीं आपला संकल्प सांगितल्यावर बहुतेकांनीं मौन धारण केलें. त्यांतल्या एकानें मात्र या तरुणांची थट्टा उडविली. रानडे गंभीरपणें म्हणाले : आजवर देशकार्य ज्या पद्धतीनें चाललें आहे त्यापेक्षां निराळ्या पद्धतीनें हे तरुण देशकार्यांत प्रवेश करणारे असल्यामुळें त्यांची हेटाळणी न करतां त्यांना आपण उत्तेजन दिलें पाहिजे. स्वार्थत्यागाच्या व्रतानें देशकार्याला आमरण वाहून घेण्याच्या निश्चयाचे हे तरुण आहेत, ते महाराष्ट्रांत एक नवा संप्रदाय उत्पन्न करणार आहेत. यामुळें त्यांचा हिरमोड करण्यांत स्वारस्य नाहीं. उलट जी पडेल व शक्य असेल ती मदत आपण केली पाहिजे. यावर कोणी 'यांचा संप्रदाय टिकला नाहीं तर?' अशी शंका काढली. रानड्यांचें या शंकेवर आशावादी उत्तर तयार होतें. 'संप्रदाय मोडल्यास त्याच्या खुणा, त्याच्या स्मृति मागच्यांना स्फूर्तिदायक होतील' अशी माहिती चंदावरकरांच्या एका आठवणींत आहे. संघटनेला क्रियेंत उतरविणारे टिळक–आगरकर असल्यानें त्यांच्या कर्तबगारीचें सत्त्व पूर्वींच्याहून निराळें दिसल्यास नवल नाहीं.

टिळकांचा जन्म १८५६ सालांतला. त्यांचें विद्यार्जन पुण्यास घडलें. मातापित्यांच्या छत्राचा लाभ त्यांच्या दैवी फारसा नव्हता. लहानपणींच त्यांच्या बुद्धीची कुशाग्रता त्यांच्या वडिलांच्या निदर्शनास आली होती. त्यांचे वडिल गंगाधरशास्त्री हे मराठी व्याकरणकर्ते असूनही कधीं त्यांच्याकडे कोणी व्याकरणाची शंका घेऊन गेल्यास ते आपल्या बाळाकडे बोट दाखवीत व सांगत कीं, तुमच्या शंकेचें उत्तम प्रकारे निरसन तो करील. आपला मुलगा कधीं खोटें बोलत नाहीं, असाहि टिळकांबद्दल बापाचा विश्वास होता. बुद्धि तीव्र व सशक्त असली तरी टिळक लहानपणीं प्रकृतीनें फार अशक्त होते. कॉलेजच्या तिसऱ्या वर्षापर्यंत त्यांनीं आपल्या प्रकृतीकडे लक्ष दिलें नाहीं. त्यावर्षीं त्यांनीं व्यायाम केला. व्यायामाचा असा पिच्छा पुरविला कीं, त्यांच्या प्रकृतीच्या मेणाला पोलादाचा टिकाऊ दणकटपणा आला. त्या दणकटपणावर भावी आयुष्यांत राजकीय चळवळीच्या अनुषंगानें अनेक जोराचे आघात झाले असतांही तो विशेष काळजी घेतल्याशिवाय चौसष्ट वर्षांपर्यंत टिकला. जो विषय अभ्यासाकरितां पुढें येईल त्याची आमूलाग्र बारीक पाहाणी करावयाची अशी त्यांच्या अभ्यासाची पद्धत होती. यामुळें त्यांची इंग्रजी वाङ्मयेतिहाच्या अभ्यासाचीं टिपणें पुढें अनेक वर्षें विद्यार्थ्यांना उपयोगी पडत असल्याची आख्यायिका आहे. एकदां त्यांच्या बुद्धीनें संस्कृत कवितेंतील वृत्तांचा झाडा घेण्याचें ठरविलें. असलेल्या वृत्तांच्या गणमात्रांप्रमाणें नव्या वृत्ताच्या गणमात्रांचीं कोष्टकें स्वतःच्या यत्नानें तयार केलीं. मोरोपंत कवीच्या अस्सल हस्तलिखितांचे प्रकाशक श्री. रामकृष्णपंत पराडकर यांना एकदा वृत्तांसंबंधीं कांहीं अडचण उत्पन्न झाली असतां ते टिळकांकडे गेले. टिळकांनीं विद्यार्थीदशेंतला कोष्टकांचा तो कागद जपून ठेवलेला होता. त्यांनीं पराडकरांसमोर तो ठेवला आणि त्याच्या योगानें पराडकरांची अडचण संपली. पराडकर ही गोष्ट अनेकदां मोठ्या धन्यतेनें मरेपर्यंत सांगत असत. टिळकांच्या अभ्यासाची कल्पना येण्याला हें उदाहरण पुरेसें आहे. टिळकांचें संस्कृत पहिल्यापासून चांगलें होतें. पण कॉलेजांत गेल्यावर ह्या भाषेवरील प्रभुत्व वाढविण्यासाठी त्यांनीं संस्कृत काव्यरचना आरंभली होती. हा त्यांच्या अभ्यासाचाच एक भाग होता.

## टिळक-आगरकर सहाध्यायी नव्हते

टिळक १८७२ मध्यें मॅट्रिकची परीक्षा उतरले. कॉलेजचें शिक्षण त्यांनीं १८७६ सालीं संपविलें. नंतर तीन वर्षांनीं एल्. एल्. बी. चा अभ्यास निवांतपणें करण्यासाठीं डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थिवसतिगृहांत रहायला गेल्यावेळीं त्यांची व आगरकरांची तेथें गांठ पडली. आगरकर तेव्हां फेलो या नात्यानें एम. ए. चा अभ्यास करीत होते. आगरकर १८७५ चे मॅट्रिक व १८७८ मध्यें ते बी. ए. झाले. टिळक व आगरकर हे सहाध्यायी नसतांनाही त्यांना सहाध्यायी समजणारांसाठीं या तारखा दिल्या आहेत. आगरकरांना लोकशिक्षणाचें काम पत्करण्याची तळमळ होती; टिळकांनाहीं देशसेवेचा एखादा मार्ग आक्रमावा असें वाटत होतें. पण टिळक त्या काळांत फार कमी बोलणारे होते. आगरकर त्यांच्या मानानें जास्त बोलके. आगरकर आपल्या सहाध्यायांशीं भावी आयुष्यांत देशसेवा करण्याविषयीं चर्चा करीत असत. या चर्चेत टिळक भाग घेऊं लागले व पुढें त्यांचें इतकें सख्य जुळलें कीं, या दोघांतच देशसेवेच्र्चा खलबतें होऊं लागलीं. कॉलेजच्या आसपास तेव्हां वसती नव्हती. आपली चर्चा निर्विघ्न व मनसोक्त चालावी म्हणून हे दोघे पुष्कळदां रात्रींच दूर माळावर जाऊन बसत. देशांत भरपूर ज्ञान वाढल्या-शिवाय देशाचा उद्धार होणार नाहीं, याबद्दल दोघांचें मतैक्य झाल्यावर ज्ञानप्रसाराचें साधन या नात्यानें दोघांनीं शाळा स्थापन करण्याचा उद्देश निश्चित केला व ते रानड्यांकडे सल्लामसलतीला जाऊं लागले. चंदावरकरांची आठवण अशा एका भेटीच्या वेळेची आहे. परंतु फडक्यांच्या बंडामुळें सरकारनें रानड्यांची पुण्याहून एकदम उचलबांगडी केल्यामुळें या दोघांचा मुख्य आधार गेला. तथापि निश्चय ढळला नाहीं. इतक्यांत त्यांना समजलें कीं, विष्णुशास्त्री चिपळूणकर एक खासगी शाळा काढणार आहेत. आगरकर-टिळकांनीं त्या शाळेंत दाखल होण्याचा मार्ग स्वीकारला तरीसुद्धां हें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे कीं, शाळा काढण्याविषयीं जो टिळक-आगरकरांचा भव्य संकेत होता, त्या संकेतानें विष्णुशास्त्री शाळा काढण्याला उद्युक्त झालेले नव्हते.

## टिळक-आगरकर जुटीची भिंत फाटली

१८८० मध्यें शाळा निघाली. पण आगरकर आले नाहींत. १८७९ सालीं ते एम. ए. च्या परीक्षेंत नापास झाले व आणखी एक वर्ष अभ्यासांत

घालविण्याचें त्यांनीं ठरविलें. न्यू इंग्लिश स्कुलांत टिळकांना सुरवातीस कोणी जिव्हाळ्याचा सोबती नव्हता. न जाणो आगरकर एम. ए. झाल्यावर शाळेंत न आल्यास पुढें काय, अशा संदेहाच्या स्थितींत टिळकांनीं लवजज्जाच्या जागेसाठीं अर्ज टाकून ठेवलेला असावा. परंतु १८८० च्या ऑगस्टांत टिळकांशीं परीक्षेच्या यशांत सरशीनें स्पर्धा करणारे वामन शिवराम आपटे शाळेच्या शिक्षकांत दाखल झाल्यावर टिळकांनीं त्या अर्जाच्या निकालाची फिकीर सोडली. आपट्यांचा व सरकारी शाळाखात्याचा वेबनाव होऊन आपटे आपल्या महत्त्वाकांक्षेचें क्षेत्र पहात होते. शाळाखात्याच्या वरिष्ठांशीं वेबनाव झाला तेव्हां त्यांनी एखाद्या कॉलेजांतील प्रिन्सिपॉलची जागा पटकावून शाळाखात्याच्या डोळ्यांत अंजन घालण्याची प्रतिज्ञा उच्चारली होती. यासाठींच कीं काय ते न्यू इंग्लिश स्कूलचे पहिले प्रमुख बनले. वर्षाच्या अखेरीस आगरकरही येऊन मिळाले आणि शाळेबरोबरच इंग्रजी–मराठी अशीं दोन भाषातील वृत्तपत्रें काढण्याविषयीं या मंडळींत विचारविनिमय होऊन १८८१ सालीं 'केसरी' व 'मराठा' अशीं दोन वृत्तपत्रें उदयास आलीं. टिळकांना लिहिण्याची हौस मुळांत कमी; त्यांत मराठीमध्यें लेखन करण्याची हौस तर सुरवातीस अजिबात नव्हती. तरी टिळकांनीं 'मराठ्या'ची व आगरकरांनीं 'केसरी'ची याप्रमाणें दोघांनीं या पत्रांची जबाबदारी पत्करली. 'केसरी–मराठा' यांचा उद्देश शाळेबाहेरील जनतेला शिक्षण देण्याचा होता असें चिपळूणकरांच्या मृत्यूनंतर टिळक–आगरकर हे बर्वे प्रकरणाच्या तुरुंगवासांतून सुटून आल्यावर शाळेच्या प्रमुखांनीं आपल्या शाळेच्या अहवालांत स्पष्ट म्हटलेलें आहे. कोल्हापुर संस्थानाचे तत्कालीन दिवाण बर्वे यांच्याविरुद्ध छत्रपतींच्या अभिमानानें कांहीं लेख छापल्यामुळें टिळक–आगरकरांवर खटला भरला जाऊन त्यांना १८८२ सालीं मुंबईतील डोंगरीच्या तुरुंगांत १०१ दिवस काढावे लागले. वृत्तपत्रांमुळें टिळकांचा जनतेशीं अधिक संबंध येऊन त्यांना सार्वजनिक सेवेचे पाठ शिकायला सांपडले. टिळक शाळेचें काम डावलून बाहेरच्या चळवळींत जास्त लक्ष घालतात अशी जाहीर कुरकूर १८८३ सालांतच दृष्टीस पडते. शाळा निघाली. तिच्यांत शिकविण्याकरितां आपण लिहिलेलीं पुस्तकें पाहिजेत अशा हेतूनें टिळकांनीं यंत्रशास्त्राचें पुस्तक

लिहिलें. त्या काळांतील शाळांच्या अभ्यासक्रमांत हा विषय होता. आपट्यांनीं कुसुममाला, गाइड टु संस्कृत कांपोझिशन अशीं पुस्तकें लिहिलीं. पुढें गोपाळ कृष्ण गोखले यांनीं गणिताचें पुस्तक तयार केलें तें याच हेतूसाठीं. आगरकरांचें व्याकरणविषयक पुस्तक त्याच हेतूच्या प्रेरणेचें होतें. १८८३ साली डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापण्याचा विचार निघाला. पुढील वर्षी त्याला मूर्तस्वरूप येऊन १८८५ मध्यें फर्ग्युसन कॉलेज उदयास आलें. टिळक-आगरकर-आपटे यांच्या स्वार्थत्यागी उद्योगाला इतक्या झपाट्यानें सफलता प्राप्त झाली कीं, आणखी दोन वर्षांनीं सरकारी डेक्कन कॉलेज या नव्या मंडळीच्या हवालीं करण्याची उत्सुकता सरकारांत संचरली, परंतु ती उत्सुकता अपेशी ठरली. याच सुमारास सोसायटीच्या पोटांत स्वार्थत्याग, शाळेच्या बाहेरची कामें वगैरे निमित्तांवरून आपखांतील वेवनावाचा रोग जोरानें वाढत होता.

याच सुमारास सामाजिक आधीं कीं राजकीय आधीं या वादानें या मंडळींच्या जुटीची भिंत फाटण्याचा योग आला. परिणामी आगरकरांवर ‘ केसरी ’ ला रामराम ठोकण्याची पाळी आली व त्यांनी ‘ सुधारक ’ नांवाचें स्वतःचें साप्ताहिक जन्मास घातलें. १८९० च्या अखेरपर्यंत टिळक या संस्थेंत राहिले. पुढें त्यांनीं राजीनामा दिला व केसरी-मराठा हीं पत्रें आपल्याकडे घेऊन त्यांनीं आपल्या कार्याचा निराळा स्वतंत्र गोट उभारला.

## भावी कामगिरीचा पाया

टिळक सोसायटीच्या बाहेर आले त्यावेळीं कांहीं अंशी सार्वजनिक जीवनांत निराधार होते. केसरी-मराठ्याच्या कर्जाचाही भार त्यांनीं शिरावर घेतला होता. त्या दिवसांत सार्वजनिक जीवनावर रानड्यांच्या विचारसरणीचा मोठा प्रभाव होता. ती विचारसरणी सगळीच्या सगळी टिळकांच्या बुद्धिमत्तेला मानवत नव्हती. निराळा पंथ काढण्याची दिशा फक्त एकच म्हणजे एकांगी राजकीय चळवळीची होती. कॉंग्रेसदेखील लोकजागृतीपेक्षा दुसरें कांहींच काम करीत नव्हती. टिळकांच्या प्रकृतीनें सोसायटीबाहेर पडण्यापूर्वी क्राफर्ड कमिशनच्या निमित्तानें चळवळींची गोडी चाखली होती व त्या प्रकरणाच्या धामधुमींत त्यांना जनतेच्या मनोगताचा ठाव घेता आला होता. या प्रसंगी ते रानड्यांच्याच तंत्रानें वागत

असले तरी त्यांच्या स्वभावाचें तेज निराळें चमकलें. टिळकांनीं व गोखल्यांनीं या धामधुमींत भाग घेतला असतांनाही क्राफर्ड कमिशनच्या प्रकरणाशीं लोकांनीं टिळकांचें नांव कायमचें जोडलें तें त्यांच्या विशेष तेजाच्या कार्यामुळें. टिळक सोसायटीतून निघाले याच्या मुळाशीं त्यांना सामाजिक सुधारणेचे मार्ग पसंत नाहींत, अशा ब्रोभाट्यापायीं त्यांच्याकडे लोकप्रियता हळूहळू चालून आली. कारण सामान्य जनतेला समाजसुधारणेचें तितकेसें प्रेम नव्हतें. स्वतंत्र होतांच त्यांनी संमतिवयाच्या कायद्याविरुद्ध टीकेचें हत्यार उपसलेलें पाहून लोकप्रियता त्यांच्यावर जास्तच प्रसन्न झाली. १८९२ मध्यें पंडिता रमाबाईच्या शारदा–सदनांतील बाटवाबाटवीच्या भानगडीनें त्यांना लोकप्रियतेच्या जास्त उंचीवर चढतां आलें. १८९३ मध्यें मुंबईतील हिंदु—मुसलमानांच्या दंग्यानें त्यांच्या लोकप्रियतेंत आणखी भर टाकली. १८९५ सालीं ते कायदेमंडळाचे सभासद निवडले गेले. तेव्हां ते विद्यापीठाचेही सदस्य होते. त्या काळीं कायदेमंडळाच्या नामदारीला मोठा मान होता. कायदेमंडळांत टिळक गेले ते आपलें सार्वजनिक जीवनांतील आसन स्थिर करण्यासाठीं. कायदेमंडळाच्या चौकटींत राहून प्रकाशण्याची वृत्ति टिळकांची नसल्यानें तेथें त्यांना लोकांचे डोळे दिपविणारें काम करतां आलें नाहीं. तसें त्यांचे काम कोठल्याही संस्थेत दिसून येत नाहीं. सोसायटीतून निघतां निघतां त्यांनीं लिहिलेल्या ‘ओरायन’ नांवाच्या पुस्तकानें त्यांच्या विद्वत्तेची कीर्ति परदेशात जाऊन तिचाही लाभ टिळकांच्या सार्वजनिक जीवनांतील आसनाच्या स्थिरतेला मिळाला. टिळकांनीं आपल्या भावी कामगिरीचा पाया कोणत्या रीतीनें भक्कम केला याची ही थोडीशी मीमांसा आहे. सोसायटीतून सुटल्यावर थोड्याच अवकाशांत त्यांनीं आपण रानड्यांचे अनुयायी नसल्याची गोष्ट जाहीर करून आपल्या कर्तृत्वाला बाधणारा पूर्वपरंपरेपैकीं कसलाच पाश शिल्लक ठेवला नाहीं.

### ‘केसरी’ मुखपत्र बनलें

डेक्कन एज्युकेशन सोसायटींतून निघाल्यावर त्यांनीं आपल्या कामगिरीची दिशा कोणत्या रीतीनें निश्चित केली याचा धावता आढावा सांगितला. आतां रानड्यांच्या भाकिताप्रमाणें त्यांच्या नव्या संप्रदायाचे ;परिणाम पारखून मग पुढें गेल्यास ठीक होईल.

बुद्धिमान तरुणांनीं भावी स्वार्थाचा मोह झिडकारून केवळ अन्नवस्त्रापुरत्या मिळकतीवर देशसेवेला वाहून घेण्याचा संप्रदाय अर्वाचीन भारतामध्यें प्रथम महाराष्ट्रांतच उदय पावला, असें एकंदर इतिहासाकडे निरीक्षण करून म्हणावेसें वाटतें. १८८० नंतर हिंदुस्थानांत या संप्रदायाचे अनुकरण होऊं लागलें. महाराष्ट्रांत तर त्याला चांगलाच बहर आला. डे. ए. सोसायटीच्या अनेक शिक्षण संस्था निघाल्या. भारतसेवक समाज ( Servants of India Society ) ही त्या संप्रदायाचीच शाखा समजणें प्राप्त आहे.

'केसरी-मराठा' पत्रांनीं वृत्तपत्रांच्या सृष्टींत क्रांति करून सोडली. पूर्वी वृत्तपत्रें पुष्कळ होतीं; पण त्यांचा संपादकवर्ग स्वार्थत्यागाच्या तपश्चर्येनें आपल्या बुद्धिमत्तेची प्रगतिकारक फळे जनतेला चाखावयास लावणारा नव्हता. कोणीतरी चालक व कोणीतरी पगारी संपादक अशा रीतीनें पूर्वीची वृत्तपत्रे चाललेली होती. अशा संपादकाच्या लेखणीत भाषेचे किंवा स्वतंत्र विचाराचें वैभव दिसूं नये हे सरळच आहे. देशस्थितीचा विचार स्वतःच्या बुद्धीनें करीत राहून जें कांहीं सुचेल ते आडपडदा, भीड, ओशाळेपणा, सरकारची वा लोकमताची भीती न बाळगतां रोखठोकीच्या रमणीयतेने लोकांना निवेदन करण्याचा या संपादकांनी विडाच उचललेला होता. टिळकांनीं 'केसरी मराठा' हाती घेतल्यावर हा प्रकार चालू ठेवला. टिळकांमध्ये स्पष्टोक्तीचा गुण असल्याने त्यांचें लेख बंदुकीच्या गोळीप्रमाणें वातावरण गर्जवून प्रतिपाद्य विषयाचे मर्म ग्रहण करणारे आहेत असा लोकांना अनुभव येऊ लागला. त्यांचे वळण नंतर महाराष्ट्रांत अनेकांनी स्वीकारलें व त्याकरितां त्यांच्याप्रमाणेच सरकारच्या रोषाचे तडाखे अनेकांनीं मोठ्या आनंदानें सोसले. टिळकांच्या चळवळीमुळे 'केसरी' हें त्यांचें मुखपत्र बनलें. राजकीय मनोगताचें टिळकांनीं महाराष्ट्राला प्रखर भांडवल पुरविलें. सरकारचीं गुप्त पत्रकें चव्हाट्यावर आणून सरकारलाही कित्येकदा चकीत तर लोकांना सावध केलें. शिशिरकुमार घोस-अमृतबझार पत्रिकेचें संस्थापक व संपादक-यांना टिळक वृत्तपत्रव्यवसायांतील आपले गुरु मानीत असत.

## महाराष्ट्राच्या पंचांगांत राजकारणाचे पर्वकाळ

राजकारणाला आध्यात्मिक गुणाची जोड असली पाहिजे ( Politics must be spiritualised ) असा गोखल्यांचा एक लाडका सिद्धांत होता. हा

सिद्धांत त्यांनीं रानड्यांच्या विचारपरंपरेंतून उचलला होता. टिळकांच्या कामगिरींत त्याच सिद्धांताचें बिंब दिसणारें आहे. १९०७–०८ सालांतील व्याख्यानांतून टिळकांनीं हा सिद्धांत पुष्कळदां लोकांना सांगितला होता. फरक असेल तर तो फक्त भाषेचा असेल. राजकारणाचें अध्यात्म म्हणजे काय याचा विचार केल्यास राजकारण हा पारलौकिक धर्माच्या व्यवहाराप्रमाणें लोकांनीं आपल्या रोजच्या जीवनांत आचरण्याचा विषय आहे असा त्याचा अर्थ निघतो. स्नानसंध्या, देवपूजा, एकादशी, प्रदोष, शिवरात्र, या नित्यनैमित्तिक कर्माप्रमाणें राजकारणाची कर्में लोकांनीं आचरणांत आणल्याशिवाय त्यांना राजकीय मोक्षाची अर्थात निर्मळ स्वातंत्र्याची प्राप्ती होणार नाहीं, असा या सिद्धांताचा अर्थ असल्यानें टिळकांनीं गणेशोत्सव, शिवाजीउत्सव यांसारखे राजकारणाचे पर्वकाळ महाराष्ट्राच्या राजकीय पंचागांत कायमचे आणून बसविले. हे उत्सव उदाहरणादाखल आहेत. याशिवाय त्यांनीं लोकांच्या मागे आणखी व्रते लावली होती. पैसाफंड, शिवाजीच्या समाधीच्या जीर्णोद्धाराचा फंड, हे लोकांच्या दानाचे व्रत देशभक्तीकडे ओढून घेणारे होत. १९०० सालानंतर लग्न मुंजीच्या मेजवान्यातून जेवणारापुढे ठेवला जाणारा दक्षिणेचा पैसा, पैसाफंडाकरितां जेवणारादेखत त्याच्या संमतीनें ठेवल्याक्षणींच उचलला जात असे, याचें स्मरण ही माहिती वाचतांना पुष्कळांना होईल. टिळकांच्या पुढाकारानें ज्यांना व्रतवैकल्याची योग्यता आली, त्यांतली वरीच कार्यें मात्र टिळकांच्या कल्पकतेमधून निघालेलीं नव्हतीं. टिळकांच्या चरित्रांत ही एक चमत्कारीक घटना आहे कीं ज्या उद्योगधंद्यात तें गाजलें, त्यापैकीं पुष्कळ उद्योग दुसऱ्यांच्या कल्पनांचें होते.

शिवाजी उत्सव १८८६ सालीं सुरू झाला पण त्याला नावारूपास आणलें टिळकांनीं. गणेशोत्सवाचें कल्पकत्व दुसऱ्याचें असलें तरी त्याचा साऱ्या महाराष्ट्रीयांत प्रसार झाला तो टिळकांमुळेंच. पैसाफंडाचें जनकत्व कै. अंताजी दामोदर काळे यांचें; परंतु तो उत्कर्षास चढून सफल झाला टिळकांच्या कर्तृत्वानें. अशी आणखी उदाहरणें दाखवितां येतील. ही सर्व कार्यें राष्ट्रीयत्वाच्या विकासाची साधनें असून धार्मिक कृत्याप्रमाणें त्यांचा आस्थेने व आदरानें लोक आचार करूं लागले.

## टिळकांना दीड वर्षांची कैद

टिळकांची लोकप्रियता ही संकटांनीं व्यापलेली होती. १८९० नंतर त्यांनीं अवघ्या पांच सहा वर्षांच्या आंत महाराष्ट्राला अगदीं आपलेसें करून सोडलें. लोकांच्या चित्तावर असा प्रभाव गाजविणारा त्या कालावधींत दुसरा पुढारी दाखविता येणार नाहीं. केवळ वृत्तपत्रांतील झणझणीत लेखनानें हा प्रभाव जन्मास आलेला नव्हता, त्याच्यामागें लोकहिताच्या पराक्रमाचें बळ होतें. १८९६ साली महाराष्ट्रांत दुष्काळ पडला तेव्हां सरकारी कायद्याप्रमाणें दुष्काळी भागांतील जनतेने सारावसुलीच्या बाबतींत आपल्या स्थितीकडे लक्ष पुरवून कसें वागावें, याची शिकवण जनतेला देण्याची कामगिरी टिळकांनीं आरंभिली. ही कामगिरी सारा न भरण्याच्या स्वरूपाची होती. शेतकऱ्यांनीं जूट करून सारा वसुलीच्या सरकारी व्यवहाराला सुरळीत चालू देऊं नये, असा त्या कामगिरीचा परिणाम ओळखून सरकारनें दडपशाहीचें भयानक देखावे निर्माण केलें. जनता या वेळीं दडपशाहीविषयी निर्भयता बाळगण्याइतकी मनानें तयार झालेली नव्हती. यामुळें टिळकांना सहकाऱ्यांची देखील कमतरता पडली. टिळकांची कामगिरी अर्थातच मागें हटली; परंतु म. गांधींनीं १९२७–२८ मध्यें बारडोली तालुक्यांत जो शेतकऱ्यांचा सत्याग्रह सरकारशीं लढविला, त्याचा टिळकांनीं १८९६ सालीं ‘ श्रीकार ’ निर्माण केला असा ठोकताळा बसविता येतो. सरकारच्या अडवणुकीचा हा प्रकार टिळकांच्या विचारपरंपरेत पुढेंही टिकून होता, याची साक्ष ‘ नव्या पक्षाचीं तत्त्वें ’ ( Tenets of the New party ) या नांवानें १९०६ व १९०७ सालीं सादर केलेल्या त्यांच्या एका कैफियतींत आहे.

१८९६ सालांतील साराबंदीसंबंधींच्या प्रयोगानें टिळक सरकारच्या अंतरंगाला बोचणारें शल्य ठरलें. हें शल्य उपटून टाकण्याच्या संधीसाठीं टपलेल्या सरकारला १८९७ सालीं प्लेगच्या निमित्तानें तशी संधि सांपडली. पुण्यांत १८९७ च्या पहिल्या तिमाहीनंतर प्लेगनें हाहाकार करून सोडला. गोऱ्या सोजीरांच्या बंदोबस्तामुळें लोकांची आणखी हैराणगत झाली. सोजिरांकडून चाललेल्या व्यवस्थेचा अधिकारी रँड नांवाचा एक इंग्रज होता. त्याला चाफेकरबंधूनीं ठार मारलें. त्याबरोबर आणखीही एका इंग्रजाचा बळी पडला. इतक्यांत शिवाजी उत्सव आला त्यांत टिळकांनीं केलेल्या भाषणामध्ये झालेल्या

खुनाचें समर्थन करण्यासारखा मजकूर असल्याच्या कल्पनेचा जोर घेऊन टिळकांवर सरकारनें राजद्रोहाचा खटला भरला व टिळकांना दीड वर्षाची कैद भोगण्याची पाळी आली.

जुलैच्या अखेरील टिळक मुंबईला गेले असतां तेथें त्यांना पकडले. ती वेळ रात्रीची होती. पोलिसांनीं ते उतरले होते त्या घराभोवतीं आपलें कडें उभें केलें. मुंबईच्या पोलिसांत टिळकांना निश्चितपणें ओळखणारा मनुष्य नव्हता, म्हणून पुण्याहून कांहीं पोलीस बोलावले होते. ते येऊन पोंचल्यावर त्यांच्या माहितीनें टिळकांना ओळखून पकडलें व कच्च्या कैदेच्या खोलीत कोंडून ठेवले. आपल्याला पकडण्यांत येईल, अशी कल्पना टिळकांच्या मनाला शिवूनही गेलेली नव्हती, अशा स्थितीत त्यांना पकडले; परंतु या स्थितीमुळेंच त्यांच्या लोकोत्तर धैर्याची परीक्षा झाली. अटकेच्या खोलींत जातांच ते स्वस्थ झोपी गेले. तिकडे त्यांचे मित्र कै. दाजी आबाजी खरे मॅजिस्ट्रेटाच्या बंगल्यावर जाऊन टिळकांची जामिनावर सुटका करण्याच्या खटपटीत गुंतले. या खटपटीला यश यावयाचें नव्हतेंच. त्याप्रमाणें अनुभव आल्यावर ते टिळकांना घडलेला वृत्तांत सांगण्याकरितां गेले. टिळक तेव्हां गाढ झोपेंत होते. पहारेकऱ्याला त्यांना जागे करितां आले नाहीं, यामुळे तो अचंब्यांत पडला असतां त्याच्याच परवानगीने खऱ्यांनी आंत जाऊन टिळकांना हालवून जागे केले व सांगितले काय ? तर 'सुटका होत नाहीं !' 'हें सांगण्यासाठी झोपमोड करण्याचें काय कारण होतें ? ही गोष्ट मला उद्या सकाळीसुद्धां कळली असती' असें विनोदी उत्तर देऊन टिळकांनीं पुनः झोपेचा आश्रय घेतला व खरे आपल्या घरी परतले अशा तऱ्हेची माहिती तेव्हांच्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेली पाहिली म्हणजे टिळकांच्या मानसिक कणखरपणाबद्दल निराळा पुरावा हुडकण्याची गरज रहात नाहीं. राजद्रोहाचा हा तोंवरचा स्वदेशाला दुसरा खटला होता. पहिला खटला बंगालमध्यें झाला होता, परंतु तो निकरावर गेला नाहीं. या गुन्ह्याला जन्मठेपेसारखी भयंकर शिक्षा कायद्यात असून त्याचा आरोप अगदी अनपेक्षितपणें आपल्याव[illegible] झाल्याचें पाहून दुसरा कोणी इसम गांगरून गेला असता, परंतु टिळकांच्या कर्मयोगी स्वभावावर त्याचा लवमात्र विपरीत परिणाम घडला नाहीं.

## टिळकांचा तुरुंगांतील स्वाध्याय

टिळकांनीं हा खटला कायद्याच्या तंत्रानें लढविला. या तंत्रासाठीं लागणारा पैसा एकट्या महाराष्ट्रानेंच नव्हे तर बंगालनेंही पुरविला, यावरून त्यांच्या लोकप्रियतेचा अंदाज करतां येतो. या खटल्यांत त्यांनीं माघार घ्यावी, असाही यत्न चालू होता. सरकारला राजद्रोह सिद्ध करतां येणार नाहीं ही टिळकांच्या मनाची खात्री जज्जानें कायद्याच्या शब्दांचा विपरीत अर्थ केल्यामुळें वाया गेली. सरकारनें या विपरीत अर्थालाच नंतर विपरीतपणें कायद्यांत दुरुस्ती करून सामावून घेतलें. टिळक तुरुंगात अडकले परंतु तेथें त्यांनीं मजुरीचें काम संभाळून विद्याव्यासंग चालू ठेवला होता. टिळकांसारखा विद्वान् राजद्रोह करू शकत नाही या भावनेनें विलायतेत त्यांच्या सुटकेसाठी धडपडणारे मॅक्समुल्लर-साहेब यांनीं त्यांच्याकरितां आपली ऋग्वेदाची प्रत पाठविली. टिळकांनीं त्याबद्दलच्या एका पत्रांत म्हटलें आहे कीं, ‘ब्राह्मणानें स्वाध्याय सोडू नये या धर्मवचनानुसार आपण मिळणाऱ्या फुरसतींत वेदाचें परिशीलन करीत असतो’ या तुरुंगांतील स्वाध्यायाचा परिपाक नंतर ‘आर्यांची ध्रुवप्रदेशांतील वस्ती’ (Arctic Home in the Vedas) या पुस्तकाच्या रूपानें विद्वानांच्या साधक-बाधक चर्चेचा विषय झाला. या ग्रंथाची रूपरेषा टिळकांनीं मॅक्समुल्लरसाहेबांच्या डोळ्यावर घातली तेव्हां ‘त्यांतील कल्पना फार धाडसाच्या आहेत व त्या कदाचित् निर्विवाद रीतीनें सिद्ध होणार नाहींत’ असा आपला अभिप्राय त्या पंडितानें टिळकांना कळविला. ब्राह्मणांच्या दृष्टीनें या कथेचे रहस्य ‘टिळकांची स्वाध्यायशीलता’ हें आहे. ‘माणसानें स्वतःच्या अभिरुचीचें एक ज्ञानाचें निराळें क्षेत्र राखून ठेवावें व जेव्हां बुद्धि एरवीच्या व्यवहारानें शिणल्याचा अनुभव येईल तेव्हां त्यानें त्या क्षेत्रांत आपली बुद्धि सोडावी म्हणजे तिचा शीण जातो, एवढेंच नव्हे तर तिला तजेला चढतो’ असा एक अनुभव टिळक सांगत असत. त्यांनीं स्वतःकरिता वैदिक संस्कृति, वैदिक धर्म यांच्या संशोधनाचें क्षेत्र निश्चित केलें होतें. महाभारतावर त्यांची विशेष भक्ती होती व जेव्हां राजकारणाच्या धकाधकींतून सवड मिळेल तेव्हां त्या क्षेत्रांत बुद्धीला रमवून ते पुनः नव्या धकाधकीसाठी ताजेतवानें होत असत. संशोधनपर व्यासंग हीच त्यांची करमणूक आणि विश्रांति होती, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

## बॉम्बगोळ्याचा पहिला स्फोट

१८९८ च्या सप्टेंबरांत टिळक एका वर्षानें तुरुंगांतून बाहेर आले. सुटकेच्या अटी आणि विश्रांति या निमित्तानें त्यानीं १८९९ च्या उत्तरार्धापर्यंत केसरी–मराठ्याची धुरा स्वीकारली नाहीं. त्यांना पकडल्या नंतर कच्च्या कैदेंत सुमारे पंधरवडाभर असतां त्यांना तापानें पछाडले होते. त्यावर कोयनेल्चा मारा केल्यानें त्यांच्या कानाला बहिरेपणाचा दोष जडला. पुढें तुरुंगांत त्यांचे हाल झाले. तेव्हांचा तुरुंगवास गांधी सत्याग्रहाच्या तुरुंगवासाप्रमाणें सुखाचा नव्हता व मानाचाही नव्हता. देशाकरिता तुरुंगवास हा आयुष्याचा सन्मान्य अलंकार ही कल्पना टिळकांच्या तुरुंगवासामुळे मात्र रूढ झाली.

राजद्रोहाची शिक्षा भोगलेला हा गृहस्थ म्हणून त्याचा संबंध टळावा अशा समजुतीच्या लोकांचा भरणा त्या काळीं शिक्षित वर्गात मोठा होता. टिळकांमुळें ब्राह्मणांना --प्रामुख्याने कोंकणस्थांना सरकारी नोकरींत सहज प्रवेश मिळेनासा झाला म्हणून त्यांच्या नांवानें जळफळणारे लोंकहि तेव्हा थोडे थोडके नव्हते. टिळक चित्पावन म्हणून चित्पावन जातीला टिळकांचा राजद्रोह नोकरीच्या बाबतींत जास्त जाणवून त्यांतील कित्येकांना त्यांचा द्वेष वाटत असल्यास नवल नाहीं. परंतु टिळकांना याचा विचार करण्याचें कारण नव्हतें. त्यांनीं ब्रह्मदेश–सिलोन येथें प्रवास करून आणि विश्रांति घेऊन १८९९ मध्यें ‘ पुनश्च हरिः ॐ ’ या घोषणेनें आपलें कार्य चालू केले. याच सुमारास त्यांना मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालय संस्थेनें पाचारण केलें असतां टिळकांचा सन्मान केल्यास कदाचित् संस्थेवर सरकारचा रोष ओढवेल, असें भय पुष्कळांना वाटलें. परंतु त्या भयाचें रानड्यांकडून निराकरण घडल्यावर संस्थेतर्फे त्यांचा सन्मान झाला. ही गोष्ट लोकांच्या तत्कालीन मनस्थितीचें गमक म्हणून सांगितली आहे. १८९९ पासून पुढचीं कित्येक वर्षें टिळकांना ताई-महाराजांच्या प्रकरणांतून व्यक्तिशः त्यांच्या चारित्र्यशुद्धतेला मातीस मिळवूं पाहाण्याच्या धोरणानें उद्भवलेल्या फौजदारी खटल्याशीं टक्कर देण्यांत खर्ची घालावीं लागलीं. त्यांतून सुटल्यावर १९०५ मध्यें बंगभंगनिर्मित प्रक्षोभाच्या लाटेंत ते पुढाकारानें शिरले. त्यानंतर जेमतेम दोन वर्षे त्यांना मोकळेपणानें कार्य करतां आलें. टिळकांच्या देशभक्तीची प्रखरता या दोन वर्षांत अत्यंत परिणामकारकतेनें गाजल्याचा अनुभव येतो. लोकांच्या प्रक्षोभदर्शक चळवळीनें त्यांच्या उत्साहाला

सीमा राहिली नाहीं. इतक्यांत १९०८ साली बंगालमध्यें बॉंबगोळ्याचा पहिला स्फोट (ता. ३० एप्रिल) झाला व त्यानिमित्तानें लिहिलेल्या लेखांसाठीं पुनः टिळकांना तुरुंगवासांत सहा वर्षांकरितां जावें लागलें.

## टिळकांचा तिसरा तुरुंगवास

१९०८ सालच्या खटल्यांत टिळकांनीं आपल्या बचावाचें काम स्वतःच केलें. या वेळीं टिळकांना आपल्या संकटाची अटकळ असल्यानें त्यांना पकडण्याकरितां पोलीस अधिकारी आले तेव्हां 'तुम्हांला विलंब झालेला दिसतो. यापूर्वींच तुम्हीं याल अशी अपेक्षा होती' अशा अर्थाच्या त्यांच्या उद्गारांची आख्यायिका या अटकळीची कल्पना आणून देणारी आहे. टिळकांचें वय आतां ५२ वर्षांचें होतें. चळवळीच्या श्रमानें व अनेक रोगांनीं त्यांची प्रकृति पुष्कळच खालावलेली होती. यावेळीं त्यांची जामिनावर सुटका झाली नाहीं. खटल्याच्या तयारीचा देखावा भयप्रद होता. टिळकांनीं त्यावरून मोठी शिक्षा होणार अशी खूणगांठ आपल्या मनाशीं बांधून शिक्षेच्या मुदतीमध्यें तुरुंगांत मृत्यु आल्यास आपल्या देशसेवेचा मार्ग जनतेला चोखाळतां यावा अशा उद्देशानें आपल्या बचावाचें भाषण केलें. तें बचावाचें भाषण नसून राजकीय चळवळीच्या उपदेशाचें वक्तृत्व होतें. Political Testament असा एका विद्वानाचा त्याविषयींचा अभिप्राय लक्षांत घेतल्यास त्या भाषणाला वकीलीच्या धंदेवाईकपणानें नाकें मुरडणारांचें समाधान व्हावयास हरकत नाहीं. त्यांचें भाषण संपलें. फिर्यादी पक्षाचें उत्तर, न्यायाधिशाची मल्लीनाथी व ज्यूरीचा निर्णय वगैरे विधि उरकले. हे विधि चालू असतांना टिळक अंतर्मुख वृत्तीनें देशकल्याणाच्या चिन्तनांत गर्क असल्याप्रमाणें ज्यूरीचा निर्णय ऐकतांच त्यांनीं जे उद्गार काढले ते त्यांनीं जन्मभर कमावलेल्या दैवी संपत्तीचे बोल असल्याचा स्फूर्तिदायक साक्षात्कार आज देखील त्या उद्गारांच्या श्रवणानें किंवा दर्शनानें होऊं शकतो. इहलोकींच्या न्यायपद्धतीनें आपल्यावर गुन्हेगारी लादली तरी आपण निर्दोष असल्याची खात्री आपल्याला आहे. तरीसुद्धां शिक्षा भोगावी लागणार याचा अर्थ असा कीं, आपल्या शिक्षेमुळें आपलें देशसेवेचें कार्य जास्त फोफावयाचें आहे अशी ईश्वरी इच्छा दिसते. त्या उद्गाराचा असा आशय निघतो.

सत्कार्याच्या पुढाऱ्यांची विपत्ति त्यांच्या सत्कार्यांना अधिक वेगानें वाढीस

लावते, अशीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत कितीतरी आहेत. त्या उदाहरणांच्या दृढ विश्वासानें टिळकांनीं ते उद्गार उच्चारले. न्यायाधीशानें शिव्याशापांची आग पाखडून सहा वर्षांची शिक्षा सुनावली. एक प्रसंग संपला, अशा स्थित-प्रज्ञतेनें टिळक आगगाडींतून तुरुंगाकडे स्वस्थ झोप काढीत गेले. हा खटला व टिळकांचे उद्गार यासंबंधीं कै. कृष्णाजीपंत खाडिलकरांचें 'केसरी' तील लेख अवश्य वाचनीय आहेत. हा टिळकांचा तिसरा तुरुंगवास होता. पहिला तुरुंगवास बर्वे प्रकरणानें १८८२ सालीं बर्व्यांची माफी मागूनदेखील चुकला नाहीं. तो १०१ दिवसांचा होता. दुसरा एक वर्षाचा व तिसरा हा सहा वर्षांचा. पहिल्या व दुसऱ्या प्रसंगाच्या दरम्यान ताईमहाराज प्रकरणांतील फौजदारी खटल्यापायीं त्यांना काही तासाकरितां तुरुंगाची हवा खावी लागली होती.

## कामाच्या गर्दीचीं वर्षें

१९१४ सालीं टिळक ब्रह्मदेशाच्या तुरुंगांतून स्वदेशीं आले. आल्यावर दोन महिन्यांच्या आंत १९१४ चें पहिलें जागतिक युद्ध युरोपांत पेटलें. त्या युद्धाचा व्याप अत्यंत विस्ताराचा व भयंकर असल्यानें येथील ब्रिटिश राज्यकर्त्यांना हिंदी जनतेला थोडाफार खुष ठेवण्याचा पवित्रा टाकणें भाग पडलें. हा योग नव्या चळवळीच्या शकुनाचा समजून टिळकांनी १९१५ सालीं होमरूलचें निशाण खडें केलें व स्वराज्याच्या मागणीचा प्रचार चालविला. त्या प्रचाराला सरकारनें पुनः भाषणबंदीच्या हुकुमानें खीळ घातली. हायकोर्टानें ती खीळ उपटून टाकल्यावर टिळक जास्त आवेशानें आपल्या कार्याला सरसावले. टिळक तुरुंगांत असतां चिरोलसाहेबांने त्यांच्याबद्दल आपल्या 'हिंदी असंतोष' या पुस्तकांत बदनामीचा मजकूर लिहिल्यावरून टिळकांनीं विलायतेस त्यावर फिर्याद लावली. स्वराज्याची मागणी व ही फिर्याद अशा दुहेरी कामासाठीं टिळक विलायतेस गेले. तेथून परत येण्यापूर्वी १९१९ च्या एप्रीलमध्यें पंजाबांत उद्भवलेलें लष्करी कायद्याचें थैमान संपून अमृतसरला कॉंग्रेसचें अधिवेशन भरण्याची सिद्धता झाली होती. १९१८ पासून म. गांधींचा पुढारीपणा हिंदी राजकारणांत झळकू लागला होता. १९१९ च्या डिसेंबरांत मांटेग्यू चेम्सफर्ड यांच्या राज्यसुधारणांचा कायदा पार्लमेण्टात पास झाला. त्या सुधारणांबद्दल आधीं वाद चालूच होते. सदर कायद्यानें त्या वादांना तीव्रता आली. १९१४

नंतरच्या सहा वर्षांत जनतेची जागृति विस्तीर्ण आणि उत्कट झालेली होती व ती जास्त जास्त तापविण्याच्या उद्योगांत टिळक अहोरात्र खपत होते. हीं सहा वर्षें जशीं टिळकांच्या आयुष्याच्या अखेरचीं तशींच त्यांच्या कामाच्या कडेलोट गर्दीचीं आहेत. १९२० च्या १ ऑगस्ट रोजीं त्यांचें देशकार्यांत अव्याहत झिजणारें शरीर कालाच्या उदरांत कायमचें लय पावलें.

## गीतारहस्य

खाडिलकरांनीं टिळकांच्या मृत्यूनंतर केसरींत लिहिलेल्या शेवटच्या लेखांत म्हटलें आहे कीं, कालांतरानें टिळकानीं राजकारणांत केलेल्या लढाया लोक विसरून जातील, परंतु त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें निर्माण केलेला देशसेवेचा आदर्श लोकांना कधींच विसरतां येणार नाहीं. खाडिलकरांनीं या अभिप्रायाचें विवरण गीतारहस्याच्या प्रशंसेनें केलेलें आहे. टिळकांच्या केळकर–चरित्रांत गीतारहस्याचा जेवढा गौरव पाहिजे तेवढा पहायला सांपडत नाहीं. कालिदासानें मेघदूत हें एकच काव्य लिहिलें असलें तरी तो अजरामर झाला असता असें प्रतिपादन करणारे नामांकित विद्वान् आहेत. तशाच अनुरोधानें गीतारहस्य लिहिण्यापलिकडे टिळकांनीं आपल्या आयुष्यांत दुसरें कांहीं केलें नसतें तरी त्यांची अजरामर कीर्ति झाली असती असें म्हटल्यास चूक होणार नाही. इंग्रजी विद्या शिकलेल्या थोर विचारवंतांनीं कर्मयोगाची एक नवीं विचारसरणी लोकांपुढें ठेवण्याला प्रारंभ केला होता. परंतु त्या विचारसरणीचें स्वरूप अनेक रंगाच्या ढिगळांनीं बिघडले होते. कर्मयोगासंबंधांतील लोकांचा बुद्धिभेद नाहींसा करण्यासाठीं गीतारहस्याचें लेखन करण्याचा उद्योग अनेक वर्षे यथावकाश टिळकांनी चालविला होता. खरें गीतारहस्य कोणतें या प्रश्नानें त्यांच्या हृदयांत १८७२ सालींच घर केलेलें होतें. पुढें पौर्वात्यपाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या तुलनात्मक अभ्यासानें तो प्रश्न सुटत गेला व खऱ्या गीतारहस्याचें त्यांना अधिकाधिक स्पष्ट दर्शन होऊं लागलें. शेवटी मंडालेच्या कारागृहांत ‘ गीतारहस्य ’ हें पुस्तक जन्माला आलें.

निराशेचे टोले वारंवार बसत असतां मनुष्य स्वीकृत ध्येयाला ज्या मानसिक अवस्थेनें घट्ट चिकटून रहातो ती अवस्था टिळक स्वतःच राजकारणाच्या कांटेरी रगाड्यांत अनुभवीत असल्यामुळें त्या अवस्थेची निस्संदिग्ध मीमांसा त्यांना गीतेच्या तत्त्वज्ञानांत दिसली. त्या मीमांसेच्या स्पष्टीकरणाला

त्यांची कर्तबगारीही मदत करीत होती. यामुळेच गीतारहस्यांत त्यांच्या कर्तृत्वाचें चित्र उमटलें असल्याचा तर्क करतां येतो. हा त्यांचा मराठींत लिहिलेला महाग्रंथ महाराष्ट्रजनतेला व भाषांतराच्या द्वारें अखिल भारतीय जनतेला निष्काम कर्मयोगाची शिकवण देण्याकरितां आहे.

ग्रंथ कसा लिहावा, कसा छापावा, त्यांतील आधार कसे असावे, अशा कितीतरी प्रश्नांचें कोडें हा ग्रंथ पाहिल्यानें उलगडतें. त्यांत जगांतील सर्व तत्त्वज्ञानांचें समालोचन आहे. पाश्चात्यांच्या तत्त्वज्ञानाला मागें टाकणारे कोणते विशेष भारतीय तत्त्वज्ञानांत आहेत, याचाही ऊहापोह आहे. अगदीं सुबोध मराठी भाषेंत पश्चिमेकडील तत्त्वज्ञानांचें संकलन करतां येतें हा चमत्कार दाखवून मराठी भाषेंत एक नवा आत्मविश्वास या ग्रंथानें निर्माण केला. गीतेचा उपसंहार अशा थाटाचें एक पुस्तक कै. चिंतामणराव भानूंनीं गीतरहस्याच्या आधीं प्रसिद्ध केलें होतें. तें गीतारहस्याच्या जोडीला ठेवून दोघांची तुलना केल्यास गीतारहस्यावद्दल येथें केलेली विधानें खरीं असल्याचें जिज्ञासूंना पटेल. गीतारहस्याची मूळ हस्तलिखित प्रत पाहिल्यास टिळकांच्या बुद्धिमत्तेप्रमाणें त्यांच्या लेखनशक्तीचेंही आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं. टिळकांना स्वतःच्या हातानें लिहिण्याची संवय नव्हती परंतु तुरुंगांत लेखक कोठून मिळणार ? लेखकाशिवाय इतरही अडचणी पुष्कळ होत्या; परंतु त्या साऱ्या अडचणी ओलांडून त्यांनीं हा ग्रंथ अवघ्या चार महिन्यांत पुरा केला व एका पत्रानें त्याच्या प्रकरणांची माहिती इकडील सहकाऱ्यांना कळविली. तें पत्र १९११ सालींच अनेक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालें होतें. तो ग्रंथ लिहून झाल्यावर त्यांनीं दुसरे विषय हातीं घेतलें; पण त्यांचें लेखन झालें नाहीं. हिंदुस्थानांत आल्यावर हा ग्रंथ कांहीं महिने सरकारच्या ताब्यात होता आणि सुरक्षित हातीं येईल कीं नाहीं याची काळजी उत्पन्न झाली होती. अखेरीस तो हातीं आला. आणि १९१५ साली प्रकाशन समारंभावांचून तो प्रसिद्ध झाला. त्या ग्रंथानें महाराष्ट्रांत ग्रंथरचनेचें एक नवें युग उदयास आणलें. त्यावर टीकेची झोड उठली. टिळकांनीं या टीकांचा सडेतोड समाचारही घेतला. प्रतिकूल टीकांचें वादळ शमल्यावर त्यांतील ग्राह्यांशाच्या अनुरोधानें गीतारहस्याची सुधारून आवृत्ति काढावी असा टिळकांचा हेतू होता परंतु तो सिद्धीस जाण्याचा योग नव्हता.

## टिळकांचें शुद्ध चारित्र्य

टिळक हे राष्ट्रविकासांतील तिसरी जी क्रियाशीलतेची अवस्था तिचे एक थोर प्रतिनिधि म्हणतां येतात. म. गांधींप्रमाणें प्रत्येक नागरिकानें सदाचारसंपन्न व्हावें, अशी शिकवण त्यांच्या चळवळींत नसली तरी व्यक्तिशः त्यांचें चारित्र्य इतके शुद्ध होतें कीं, त्यांचा कित्ता कोणीही गिरविल्यास त्याचा खाजगी व सार्वजनिक जीवनांत उद्धारच होईल. त्यांच्या शीलावर डाग उठविण्याचा यत्न शत्रूंकडून झाला. परंतु तो शत्रूवरच उलटला आणि विरला. टिळकांचे चरित्र हें महाराष्ट्रियांना सदैव साभिमान संस्मरणीय वाटणे स्वाभाविक आहे.

---

# नामदार गोपाळ कृष्ण गोखले

गोपाळ कृष्ण गोखले हे टिळक–आगरकरांच्या लोकसेवेनें डे. ए. सोसायटीच्या कारभारांत ओढले जाऊन पुढें एकंदर देशहिताच्या कार्यात रानड्यांच्या नेतृत्वानें राबण्यास सिद्ध झालेले टिळकांसारखेच एक महाराष्ट्रीय थोर पुरुष आहेत. टिळकसुद्धां प्रारंभीं रानड्यांच्याच तालमींत वाढलेले. त्या तालमीचा एक गुण म्हणजे जनतेशीं समरस होऊन तिला स्वोद्धाराच्या कामास जुंपण्याचा; तो टिळकांनीं उचलला. दुसरा गुण गोखल्यांनीं घेतला. जनतेच्या चळवळीनें टिळक सरकारशीं झगडत होते. गोखले सरकारी संस्थांमधील अवकाशांत राहून सरकारी वरिष्ठ अंमलदारांच्या डोळ्यांमध्यें टीकेचें सणझणींत अंजन घालण्याचें काम करीत होते. हें काम एकदम डोळ्यांत भरणारें नसलें तरी त्याचा अप्रत्यक्षपणें जनतेचा असंतोष वाढविण्याकडे उपयोग झाल्याशिवाय रहात नाहीं. राज्यकारभारांतील अन्यायाचें बिनतोड युक्तिवादानें दर्शन करविलें तरी समंजसपणाचा डौल मिरविणारे सरकार आपला हेका सोडीत नाही, अशी जनतेची खात्री पटवून तिचा राज्यविषयक असंतोष पुष्ट व दृढ करण्याचें काम गोखल्यांच्या उद्योगानें घडत होतें. सरकारी गोटांत उभे राहून सरकारी वरिष्ठांना निर्भीड टीकेच्या माऱ्यानें जर्जर करण्याचें काम सिंहाच्या गुहेंत जाऊन सिंहाची आयाळ त्यास वेदना उत्पन्न होण्याइतक्या जोरानें ओढण्याच्या कामासारखे आहे व तें गोखल्यांनीं ज्या कुशलतेनें व ज्ञानाच्या सज्जतेनें केलें, त्याला हिंदी इतिहासांत दुसरी तोड दाखविणें कठिण आहे. जोंवर कायदेमंडळे चालतील तोंवर नामदार पुष्कळांना होतां येईल. असे नामदार गोखल्यांच्या काळांत होते व आजही आहेत. परंतु ‘ नामदार ’ या शब्दाच्या खऱ्या अर्थानें एकटे गोपाळ कृष्ण गोखले हें एकच नामदार होऊन गेले. प्रतिपक्षाविषयीं औदार्य, त्यांच्या मतप्रणालीच्या खंडनास लागणारें धैर्य, देशहिताची कळकळ, देशहितार्थ अविश्रांत उद्योग, विचारांचा प्रामाणिकपणा अशा अनेक गुणांनीं गोखल्यांची नामदारी सजलेली होती. गोखले जिवंत असतांना टिळकांनीं व टिळकपक्षानें त्यांचा उघड उघड गौरव कधीं

केला नाहीं, उलट छळवाद मांडला होता, असेंही म्हणता येईल. टिळकपक्षांत म्हणजे टिळकांचा अभिमान बाळगणारांत आजसुद्धां गोखल्यांबद्दल निराधार प्रवादानें बोलणारे पुष्कळजण आढळतात. आपण गोखल्यांचे शिष्य असें गांधी म्हणवीत असल्यानें गोखल्यासंबंधाचे गैरसमज गांधींनाही महाराष्ट्रांत भोंवले. गोखले जसे लोकांच्या समजुतीनें सरकारचे हस्तक तसेंच गांधी हें स्वराज्यभक्त नसून ब्रिटिश साम्राज्याचे भक्त आहेत, अशीं तर्कटें गांधी हे गोखल्यांचे शिष्य या घटनेकडे बोट दाखवून कित्येकजण महाराष्ट्रांत उघडपणें रचीत होते. गोखल्यांनीं कधीं स्वतःचें समर्थन केलें नाहीं, म्हणून त्यांच्याविरुद्ध नानाप्रकारच्या विपरीत वार्ता सदैव उठत होत्या, यामुळे त्यांचें चरित्र महाराष्ट्रीयांना योग्य प्रकारें माहीत नसल्यास आश्चर्य वाटायला नको.

गोखल्यांचा जन्म १८६६ सालचा. घरची अत्यंत गरीबी. लहानपणींच पितृवियोगाची आपत्ति कोसळली व त्यांच्या थोरल्या बंधूवर संसाराचा भार पडला. बंधूच्या लहानशा कमाईत गोपाळराव आपले विद्यासाधन करीत होते. त्यांचें पहिलें शिक्षण कोल्हापुरांत झालें. त्यांनीं बी. ए. ची पदवी मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजांतून घेतली. मॅट्रिक झाल्यावर त्यांनीं विद्यार्जनाची रजा घ्यावी आणि नोकरींत शिरून संसाराचा भार हलका करावा अशी त्यांच्या बंधूची इच्छा होती. या इच्छेला बंधूच्या पत्नीनें विरोध केला व खर्चाचें द्रव्य उभें करण्यासाठीं आपल्या अंगावरील दागिनें मोडून विकण्याची सिद्धता निदर्शनास आणली. गोपाळाचा होतकरूपणा भावाला अमान्य नव्हता. त्यानें शिकावें, जगांत मोठें व्हावें अशी त्याचीही भावना होती. खर्चाच्या दुस्तर अडचणीला कसें तोंड द्यावयाचें हा प्रश्न पत्नीच्या औदार्यानें सुटण्याचा रंग दिसतांच त्यांनीं बंधूच्या उच्च शिक्षणाला परवानगी दिली. १८८२ मध्यें कॉलेजांत असतांना टिळकआगरकरांवर कोल्हापूर येथील कारभारी बर्वे यांनीं जो बेअब्रूचा खटला केला त्यावेळीं या दोघां देशभक्तांना मदत करण्यासाठीं तेथील विद्यार्थ्यांनीं एका नाटकाचा प्रयोग बसविला, त्यांत गोपाळरावांनीं भाग घेतला होता अशी आख्यायिका आहे. टिळक-आगरकरांविषयींच्या त्यांच्या आदराची ही पहिली खूण आहे.

कृतज्ञता हा गुण गोखल्यांच्या अंगीं अतिशय उत्कृष्टपणें वसत होता. त्यामुळे मागले संबंध लक्षांत ठेवून टिळकांबद्दल त्यांनीं शक्यतों प्रतिकूल टीकेचे

शब्द आपल्या तोंडावाटें बाहेर पडूं दिले नाहींत. त्याच कृतज्ञतेनें त्यांनीं आमच्या भावजयीचें ऋण जन्मभर परोपरीनें फेडलें.

कॉलेजांतलें शिक्षण पुरें झाल्यावर गणित विषय चांगला म्हणून इंजिनियरिंग कॉलेजांत जाण्याचा त्यांचा विचार होता. त्याला द्रव्याची टंचाई आडवी येऊन तो विचार कायमचा रहित झाला. टिळक–आगरकर आपल्या संस्थेकरितां नवीं नवीं तरुण माणसें जोडण्यासाठी टेहेळणी करीत असत. त्यांच्या टेहेळणींत गोखले सांपडले व न्यू इंग्लिश स्कुलांत शिक्षकाचें काय करूं लागलें. भावजयीचें ऋण फेडण्याकरितां त्यांनीं शाळेव्यतिरिक्त शिक्षणाचे वर्ग बाहेर चालविले होते. त्यांच्या उत्पन्नांतून तें ऋण फेडलें व त्या माउलीच्या अंगावर मुळापेक्षां जास्त मोलाचे दागिनें चढवून गोखले एकप्रकारें त्यावेळेपुरते कृतार्थ झाले. पैसे फिटतात, परंतु उपकार फिटत नाहींत अशी गोखल्यांची भावना होती. यामुळे त्या उपकाराप्रीत्यर्थ त्यांनीं पुढें त्या भावजयीच्या मुलीचें द्रव्यदृष्ट्या कल्याण केलें. ही भावजय गोखल्यांचा गौरव पहायला जगली नाहीं. गोखले मोठेपणाच्या मार्गाला लागले तेव्हां तिला दुर्धर व्याधीनें ग्रासलें आणि पुढें थोड्याच काळांत ती मरण पावली. त्यावेळीं तिच्या उघड्या पडलेल्या कन्येची चिंता गोखल्यांना वाटावी, हें त्यांच्या कृतज्ञतेचा विचार केल्यास आश्चर्य नाहीं. भावजयीच्या दुखण्यांत तिला विसावा मिळावा म्हणून गोखले आपलें काम संभाळून त्या मुलीचीं पडतील ती कामें करीत असत, अशी आख्यायिका आहे. भावजयीप्रमाणेंच गोखल्यांच्या मातुःश्रीनेंही आपल्या पुत्राचा गौरव पाहिला नाहीं.

## एक कुत्सित आरोप

१८८६ मध्यें गोखले डे. ए. सोसायटीचे सभासद झाले. यावर्षी ते कोल्हापुरास गेले असतां त्यांनीं हिंदी राजकीय परिस्थितीवर इंग्रजींत व्याख्यान दिलें. अध्यक्षस्थानीं कोल्हापूरचा रेसिडेण्ट होता. हा कडव्या साम्राज्यशाही मताचा हुशार अधिकारी, अशी त्याची प्रसिद्ध होती. परंतु गोखल्यांची व्याख्यान शैली व इंग्रजीवरील प्रभुत्व या दोन्ही गुणांबद्दल अध्यक्ष या नात्यानें त्या अधिकाऱ्याला गोखल्यांची तारीफ करावी लागली. गोखले रानड्यांच्या साहचर्यानें तयार झाले, असा एक प्रवाद आहे. रानड्यांच्या साहचर्यात शेंकडो

माणसें आलीं; परंतु गोखले किती निघाले या प्रश्नानें हा प्रवाद निकालांत काढता येतो. शिष्याच्या अंगी कर्तबगारीचें बीजच नसेल तर गुरूच्या शिकवणीचें खतपाणी त्याला कसें उपयोगी पडणार ? गोखल्यांच्या बुद्धींत तें बीज होतें याचें १८८५ चें व्याख्यान हें एक प्रमाण आहे. रानड्यांच्या शिकवणीनें तें बीज जोरानें फोफावू लागलें व रानड्यांच्या मृत्यूनंतर त्याची विशाल वृक्षावस्था जगाच्या दृष्टीस पडली. परंतु महाराष्ट्रांत हा रानड्यांनीं पढविलेला पोपट आहे, त्याच्यांत स्वयंभू गुण मुळीच नाही असें त्यांच्याविषयी लोक बोलत असत; ठाण्याचा 'हिंदुपंच' हा तर पोपटाच्या कल्पनेचीं व्यंगचित्रें कित्येक वर्षें लोकांना दाखवून गोखल्यांविषयीं लोकांत अनादर वाढवीत होता. अद्यापि त्या कल्पनेच्या पुसट छटा क्वचित् उरलेल्या आढळतात. पण मागें सांगितलेली परिस्थिति ध्यानांत घेतल्यास पोपटपंचीच्या कुत्सित आरोपांत कांहीं तथ्य नसल्याचें गळीं उतरेल.

## गोखले—रानडे भेट

डे. ए. सोसायटींत गोखल्यांचा प्रवेश झाला, त्या सुमारास सोसायटींत मतभेदाची भांडणें रुजलेली होती, नंतर हळूहळू तीं विकोपास गेलीं. वयानें वडील व ज्यांच्याविषयी आदर त्यांची भांडणें पाहून व ऐकून एकदां गोखल्यांच्या मनांत सोसायटी सोडण्याचें आलें. एकदां आगरकरांनाही वाटले कीं, आपण सोसायटीतून बाहेर पडावें. टिळकांनीं आपल्या राजीनाम्याचें पिस्तुल रोखलेलेंच होतें. परंतु या मंडळीत एकटे आपटे मात्र खंबीर होते. त्यांनीं गोखल्यांना कळविलें कीं, तुमच्या भरंवशावर आम्ही कॉलेजचा विस्तार करीत आहों; टिळक जावे अशी आमची इच्छा नाहीं, पण ते गेल्यानें संस्थेचें विशेष नुकसान होणार नाहीं. गोखले हा सोसायटीचा एक बळकट आधार आहे. तो गेल्यास संस्थेचें नुकसान होईल. हें जाणून गोखल्यांचा वैताग आगरकर व रानडे अशाच तऱ्हेनें दूर करीत होते. शेवटीं गोखले सोसायटींत राहिले व टिळक बाहेर पडले. गोखल्यांनीं अवघ्या दोन तीन वर्षांत स्वतःबद्दल इतर सहकाऱ्यांत किती विश्वास उत्पन्न केला होता याचा अंदाज वरील गोष्टीनें करतां येईल. गणित, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र असे अनेक विषय ते सारख्याच तयारीनें व तन्मयतेनें शिकवीत असत.

त्यांच्या वर्तनांत शिस्तीचा अंमल कडक होता. आपटेदेखील शिस्तीचे भक्त. आगरकर, केळकर, गोळे हे त्या मानानें ढिलेच. यामुळें आपटे व गोखले यांचें सख्य व्हायला उशीर लागला नाहीं. परंतु टिळक-आगरकरांकडे गोखल्यांचा ओढा जास्त होता. नंतर आगरकरांविषयीं त्यांचा ओढा वाढत गेला.

आगरकरांनीं या तरुणांतील सार्वजनिक कार्याला अवश्य असणारे गुण ओळखून शिवराम हरि साठे नामक एका रानड्यांच्या विश्वासू स्नेह्यामार्फत गोखल्यांची व रानड्यांची भेट घडवून आणली. रानड्यांना या भेटींत योग्य शिष्य लाभला व गोखल्यांना इष्ट व अनुरूप गुरूची प्राप्ति झाली. नंतर गोखले सार्वजनिक सभेचे चिटणीस होऊन देशकार्याचे पाठ शिकूं लागले. गोखल्यांची रानड्यांनीं अनेकदां कसून परीक्षा घेतली. गोखल्यांनीं लिहून आणलेल्या मजकुरांत सुधारणा सुचवून त्याचें लेखन मनाजोगे होईपर्यंत रानडे पुनः पुनः गोखल्यांना तसें लेखन करावयास लावीत. तें पुनः ठरल्या वेळांत झालें पाहिजे अशी त्यांची अट असे. गोखल्यांनीं अशा लेखनाचा कधीं कंटाळा केला नाहीं किंवा त्याबद्दल कधीं नाखुषी दाखविली नाहीं. सार्वजनिक सभेच्या कामा-शिवाय ते आगकरांच्या 'सुधारक' पत्राच्या इंग्रजी बाजूकडे लेख लिहीत असत. १८८९ मध्यें त्यांनीं क्रॉफर्ड प्रकरणाच्या जाहीर सभेंत टिळकांबरोबर इंग्रजीत जें वक्तृत्व केलें त्यायोगानें त्यांच्या लायकीची लोकांना कल्पना आली. १८८९ मध्यें कॉंग्रेसच्या अधिवेशनांत गोखले प्रथमच बोलले व कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांवर ह्याची छाप बसली. परंतु एकदम साऱ्या हिंदुस्थानांत त्यांची प्रशंसा होण्याचा प्रसंग १८९७ सालीं त्यांनीं इंग्लंडांत जाऊन वेल्बी कमिशन-पुढें दिलेल्या साक्षीचा आहे.

## वेल्बी कमिशनशीं यशस्वी झटापट

यावेळीं त्यांचा सार्वजनिक सभेशीं संबंध राहिला नव्हता. ते नव्यानें निघालेल्या डेक्कन सभेचे चिटणीस या नात्यानें वेल्बी कमिशनसमोर साक्षीला गेले. हें कमिशन हिंदी राज्यकारभाराच्या वाढत्या जमाखर्चाची झडती घेण्या-करितां बसलेलें होतें. दादाभाई नौरोजी हे त्या कमिशनचे एक सभासद होते. गोखल्यांनीं स्वतंत्रपणें आपल्या साक्षीची तयारी केली. रानडे तेव्हां मुंबईस

होते व त्यांचे दुसरे सल्लागार गणेश व्यंकटेश जोशी हे सोलापुरास होते. कॉलेजांतील रोजचें काम संभाळून त्यांच्या गांठीभेटी घेऊन यथेच्छ विचार-विनिमय करायला गोखल्यांना सवड मिळाली नाहीं. त्यांना आपल्या साक्षीचा मसुदाही येथें लिहून काढतां आला नाहीं. आपण तो प्रवासांत बोटीवर लिहूं असें त्यांनीं रानड्यांना सांगितलें. रानड्यांना गोखल्यांबद्दल विश्वास होता, तरी काय होतें, काय नाहीं याची काळजी त्यांना लागलेली होती. विलायतेस पोंचल्यावर आपल्या साक्षीचा खर्डा नौरोजी व सर विल्यम वेडरबर्न यांना दाखवावा व ते सुचवतील त्या दुरुस्त्या बिनहरकत कराव्या, अशी रानड्यांची गोखल्यांना ताकीद होती व तसे त्यांनीं त्या दोघांना लिहून ठेवलें होतें. गोखल्यांनीं आपला मसुदा आगबोटींत लिहून काढला व ह्या दोघां अनुभवी वृद्धांना दाखविला. त्यांना तो इतका पसंत पडला कीं, त्यांनीं त्यामध्यें एका कानामात्राअनुस्वाराचाही फेरफार न तो करतां कमिशनपुढें दाखल होऊं दिला. नंतर त्या खर्ड्यातील प्रमेयांच्या अनुरोधानें गोखल्यांची झडती घेण्याला कमिशनच्या लोकांनीं सुरवात केली. गोखले कमिशनच्या सगळ्या वेड्यावाकड्या प्रश्नांना पुरून उरले. कमिशनमध्यें हिंदी राज्यकारभारांत कसलेले मुरब्बी इंग्रज बसलेले होते. त्यांच्या प्रश्नांच्या माऱ्यांत आधींचे हिंदी साक्षीदार मोडले; हा प्रकार पाहून कमिशनचें सभासदत्व सोडून एकदां त्यांना सांवरण्याकरितां हिंदी राज्यकारभाराच्या जमाखर्चाचे ज्ञाते भीष्माचार्य नौरोजी साक्षीदारांच्या खुर्चीवर जाऊन बसले; परंतु त्यांचीही धडपणें सुटका झाली नाहीं. यामुळें हा तरुण व इतरांच्या मानानें सकृद्दर्शनी कच्चा ठरणारा साक्षीदार कसा पार पडतो, याबद्दल रानडे चिंता करीत होते. पण जेथें मोठाले पुढारी कचरले तेथें गोखल्यांनीं पृच्छकांच्या शंका निवारून त्यांची विजयलालसा जिरवून टाकली. वेल्बीसकट अनेक सभासदांनीं, गोखल्यांची तपासणी फेरतपासणी संपल्यावर, गोखल्यांशीं गुणग्राहकतेनें हस्तांदोलन करून त्यांच्याबद्दल प्रशंसेचे उद्गार काढले. ही सारी माहिती तपशीलवार कळली तेव्हां कुठें धन्यता वाटून रानड्यांचा जीव भांड्यांत पडला. वेल्बी कमिशनशीं गोखल्यांनीं केलेली यशस्वी झटापट पाहाणारांपैकीं पुष्कळांनीं त्याचवेळीं ' हा हिंदी जनतेचा भावी पुढारी ( Coming Man ) ' असें भविष्य वर्तवलें.

गोखल्यांच्या या विजयावर लवकरच संकटाची भीषण छाया पसरून हिंदी जनतेंतील अविचारी पुष्कळांना त्यांची मातब्बरी वाटेनाशी झाली. १८९७ वें वर्ष

महाराणी व्हिक्टोरियाच्या राज्यकारभाराचें ६० वें वर्ष होतें. त्याचा हीरकमहोत्सव साऱ्या ब्रिटिश साम्राज्यांत अतिशय दणक्यानें साजरा करण्यांत आला. पुणें शहर या समारंभाला अपवाद नव्हतें. महोत्सवाच्या रात्रीं पुण्यास रँड व आयर्स्ट अशा दोन लष्करी अधिकाऱ्यांचे खून झाले व त्याचा सरकारला हादरा बसून एकंदर राजकीय वातावरण कडकलें. १८९७ मार्चपासून प्लेगचा कहर पुण्यास वाढला व त्याच्या बंदोबस्ताकरितां सरकारनें गोऱ्या सोजरांच्या तुकड्यांची नेमणूक केलीं. या सोजरांना हिंदु रीतरिवाज माहीत नसल्यामुळें प्लेगच्या घरांची तपासणी करतांना त्यांच्या हातून जीं कृत्यें घडलीं त्यांच्या योगानें पुणेकर स्त्रीपुरुषांना प्लेग पुरवला पण ही सोजरांची व्यवस्था नको असें वाटूं लागलें. रँड हा त्या व्यवस्थे-साठीं नेमलेला लष्करी अंमलदार होता. त्याचा कांटा काढण्याचें चाफेकरबंधूंच्या (हे एका हरदासाचे तरुण मुलगे होते.) मनांत येऊन त्यांनीं महोत्सवाच्या रात्रीं त्याचा बळी घेतला. विलायतेस या खुनाच्या बातमीनें पार्लमेंटांत गडबड उडाली. तेव्हां हिंदुस्थानच्या हितचिंतक इंग्रजांनीं गोखल्यांकडे या संबंधीची कांहीं माहिती असेल या धोरणानें चौकशी केली. गोखल्यांना पुण्यांतील स्नेह्यांनीं प्लेगच्या हकीकतीचीं बरींच पत्रें पाठ-विलेलीं होतीं. त्यांच्या आधारें गोखल्यांनीं सोजरांच्या अनन्वित वर्तनाच्या एक दोन गोष्टी सांगितल्या. त्यांची वाच्यता पार्लमेंटांत होताच क्षणभर खुनाच्या सुडाची भावना थंडावली.

गोखल्यांकडील बातम्या ऐकल्यावर भारतमंत्र्यांनीं गोखल्यांची माहिती खरी कां खोटी असा प्रश्न मुंबईच्या गव्हर्नराला केला. गव्हर्नरानें पुण्यांतल्या सरकारी विश्वासाच्या लोकांपुढे तोच प्रश्न ठेवला. त्यांच्या उत्तराची वाट न पाहतां दुसऱ्या दिवशीं तारेनें विलायतेस कळविलें कीं, गोखल्यांनीं सांगितले ते सारे सपशेल खोटें आहे. त्यासरशीं विलायतेंत गोखल्यांबद्दल प्रतिकूलता पस-रली. गोखल्यांना या प्रकारानें वाईट वाटले. पण मुंबईस येईपर्यंत ते तरी काय करू शकत होते? जुलईच्या अखेरीस गोखले मुंबईस आले. बंदरावर उतरण्या-पूर्वीच पोलीस अधिकाऱ्यानीं त्यांची भेट घेऊन कांही प्रश्नोत्तरें केलीं. गोखल्यां-जवळचे कागद सर दिनशा वाच्छांच्या सामानांत आधीच भरले असल्यामुळे गोखल्यांना पत्रें लिहिणारांचा पत्ता पोलिसाना लागू नये हे सरळच आहे.

या प्रकरणांत शिष्टाचाराला धरून जें करणें असेल तें घडेल असा गोख-

त्यांनीं पोलिसांना जबाब दिला. गोखले मुंबईस रानड्यांना भेटले. नंतर पुण्यास गेले. त्यांनीं पत्रलेखक मित्रांना पुरावा विचारला. पुरावा मिळणें अशक्य असें ठरल्यावर ज्यांची बदनामी केली त्यांची माफी मागणें हा शिष्टाचार उरला. माफी गोखल्यांनीं लिहून काढली. तिच्या प्रस्तावनेंत सरकारला कायदेशीर रीतीनें या प्रकरणांत कांहीं करतां येण्यासारखें नसलें तरी आपणच शिष्टाचारासाठीं माफी मागत आहों अशी बढाई मारली होती. रानड्यांनीं तो मजकूर खरडून टाकला व निर्भेळ माफीचे पत्रक जगासमोर आलें. त्याच वेळीं टिळकांना राजद्रोहाच्या आरोपावरून पकडलें होतें. गोखल्यांची माफी व टिळकांची कैद या विरोधी देखाव्यांतून एकामध्यें भेकडपणाचा दोष व दुसऱ्यांत धैर्यशीलत्वाचा गुण पहाण्याचें कार्य लोकांनीं चालविलें. गोखल्यांविषयीं लोकांतील आदर ओसरला, टिळकांसंबंधी आदर वाढला. वस्तुतः गोखल्यांनीं जें केलें तेंच टिळकानी बर्वे–प्रकरणांत आपल्या बाजूचा पुरावा खोटा व बनावट ठरल्यावर करावें लागलें होतें. परंतु लोकांनीं त्या नंधरा वर्षापूर्वीच्या कथेचें स्मरण कशाला बाळगावें ? नंतर अशी शक्कल बोलली जाऊं लागली कीं, टिळक पुरावा देण्याला तयार असतां गोखल्यांनीं त्या संधीचा उपयोग करून घेतला नाहीं. टिळक पुरावा देणार होते, या कल्पनेला त्यांना पकडलें होतें व ते अटकेंत होते ही परिस्थिती पाठिंबा देणारी नाहीं. शिवाय टिळकांनीं अटक होण्याच्या आधीं गोखल्यांनीं विलायतेस सांगितलेल्या माहितीचा एक भाग निराधार तर दुसरा अत्युक्तीचा असा 'केसरीं'त अभिप्राय व्यक्त केला असतां ते कसला पुरावा देणार होते, असा प्रश्न उद्भवतो. परंतु गोखल्यांच्या अनादराला इतका आगापीच्छा बाळगण्याचें कारण काय ? इतकें मात्र खरें कीं, माफीच्या विपर्यासानें गोखले हें लोकांच्या अनादराचा विषय बनले. त्या वर्षी उमरावतीस भरलेल्या कॉंग्रेसमध्यें कांहीं बेजबाबदार लोकांनीं त्यांचा उघड अवमान केला. हळव्या मनाचें गोखले त्याचवेळीं सार्वजनिक आयुष्यांतून कायमचे उठावयाचे, परंतु त्यांना ताळ्यावर आणायला रानडे होते. त्यांनीं पुनः गोखल्यांना सार्वजनिक कार्यांत ढकलायला प्रारंभ केला. १८९९ मध्यें गोखले मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळांत निवडून आले.

## भारतीय कायदेमंडळांत प्रवेश

माफीनंतर गोखल्यांनीं सुमारें दीड वर्ष अज्ञातवासांत घालविलें ह्याचा अर्थ ते लोकांत जाऊन काम करीत नव्हते असा नाहीं. १८९८ मध्ये त्यांनी प्लेगनिवारणाचें काम झटून केलें. परंतु त्यांच्या चित्तांत देशसेवेचें अनिवार्य वैराग्य संचारलेलें नव्हतें. ते देशसेवकांच्या संस्थेची योजना आपल्या हृदयांत घोळवीत होते. रानडे म्हणत त्याप्रमाणें देशसेवेला वाहून घेणाऱ्या तरुणांची संस्था काढावी, या तरुणांना राजकारण शिकवावें व त्यांची तयारी झाली कीं त्यांना देशसेवेच्या प्रवाहांत त्यांची पुरेशा अन्नवस्त्राची तरतूद करून सोडावें, या संकल्पाचीं चित्रें ते कागदावर रेखाटीत होते. अतिशय जिव्हाळ्याच्या व विश्वासाच्या मित्रांजवळ या संकल्पाची चर्चा करीत होते. कसला तरी व्यापार करून संस्थेसाठीं पैसा उभारावा असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं व्यापार आरंभला, पण शेवटीं त्यांत खोट येऊन कर्ज डोक्यावर चढलें. त्या संकल्पाचा व्यापार चालू असतां त्यांच्या हृदयास जाचणारे लोकापवादाचें शल्यहि बोथटलें. १८९८ च्या प्रारंभी एका टिपणांत त्यांनीं आपली महत्त्वाकांक्षा लिहून काढली होती. प्रथम आपल्या इलाख्याचें व देशाचे कायदे मंडळ, नंतर विलायतचें पार्लमेंट असे त्यांच्या महत्त्वाकांक्षेनें आपल्या उत्कर्षाचे टप्पे ठरविले होते. हिंदुस्थानांतून पार्लमेंटांत सभासद पाठवावयाचे ही कल्पना व पार्लमेंटाचे दादाभाई नौरोजी सभासद झाले ही वस्तुस्थिति लक्षांत घेतल्यास गोखल्यांच्या संकल्पांतलें शेवटचें कलम आश्चर्यकारक अथवा हास्यास्पद वाटायला नको. त्यांपैकीं पहिलें कलम त्यांनीं १८९९ सालीं अमलांत आणलें. मुंबईच्या कायदेमंडळांत तेव्हां हिंदी सभासदांचे पुढारी फेरोजशहा मेथा होते. शेतसाऱ्याच्या कायद्यावरून त्यांच्या इंग्रज राज्यकर्त्यांशीं चकमकी उडाल्या. या चकमकींत गोखल्यांनीं हातभार लावला. १९०२ सालीं फेरोजशहांनीं भारतीय कायदेमंडळ सोडलें व गोखल्यांचा तेथें प्रवेश झाला. रानडे १९०१ सालच्या प्रारंभीं वारल्यानंतर गोखल्यांना आपण पोरके झालों असे वाटत असलें तरी ते राजकारणाच्या आखाड्याला चांगले सरावलेले होते. भारतीय कायदेमंडळांत त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें अद्वितीयत्व संपादन केलें.

## कायदे मंडळातील कामगिरी

मरेपर्यंत गोखले भारतीय कायदेमंडळाचे सभासद होते. १९०२ साली म्हणजे पहिल्याच वर्षी त्यांनी सरकारी जमाखर्चाच्या अंदाजपत्रकावर जें भाषण केलें, त्यायोगाने भारतीय जनतेच्या अंतरंगांत गोखल्यांना आदराचें स्थान निर्माण झालें. गोखल्यांचा विशेष हा की, या स्थानावरून ते कधीच खाली आले नाहीत. त्यांनी आपल्या अंदाजपत्रकावरील वार्षिक भाषणांचा सरकारांत वचक उत्पन्न केला होता. लष्करी खर्चावर त्यांचा फारच कटाक्ष होता. किचनेर हा इंग्लडचा रणशूर सेनापती त्यांच्या भाषणांतील अचूक भडिमाराबद्दल 'तोफखान्यापुढे उभे रहाण्याची भीती वाटत नाही; पण गोखल्यांशीं सामना कसा करावयाचा याबद्दल मन चिंताक्रांत असतें' असें म्हणत असल्याचें प्रसिद्ध आहे. लॉर्ड कर्झन हा व्हाइसरॉय साम्राज्यशाहीचा अर्क होता. त्याला आपल्या हुषारीबद्दल गर्व असे; परंतु गोखले वारल्याचे कळल्यावर त्यानेंही 'गोखल्यांचे तडाखे आपल्याला कधी कधी असह्य होत. गोखले हे कोणत्याही स्वतंत्र देशांत मुख्य प्रधान होण्याच्या लायकीचे पुरुष होते' असें उद्गार काढले. गोखले शेवटच्या दुखण्यांत कायदेमंडळाच्या बैठकीला जाऊ शकले नाहींत. त्यांच्या गैरहजेरीकडे लक्ष जाऊन सर गाय फ्लीटवूड विल्सन नांवाच्या हिंदी सरकारच्या फडणिसानें "आज आपण हॅम्लेट हें नाटक हॅम्लेटवांचून करीत आहो" असें बोलून कायदेमंडळाचा खरा नायक गोखले अशी स्वतःची भावना व्यक्त केली. गोखल्यांच्या व्यवहारातील निर्भेळ सचोटीमुळें लॉर्ड मिंटो, लॉर्ड हार्डिंज, हे व्हाईसरॉय त्यांचे मित्र झाले होते. गोखल्यांबद्दल त्यांना मित्रत्वाचा विश्वास वाटत असे.

ज्या विल्सनचें नांव मागे घेतलें, त्यानें गोखल्यांच्या औदार्याची एक गोष्ट एका ठिकाणी लिहिली आहे. तो विलायतचा नामांकित व उदार विचारांचा अर्थशास्त्रज्ञ होता विलायतेहून इकडे येण्यास निघाला तेव्हां अनेकांनीं त्याला गोखल्यांच्या हल्ल्यांचें भय दाखविलें होतें. त्यानें येथें येऊन अंदाजपत्रक तयार केलें व गोखले कोठून कसा हल्ला करतील याचें चिंतन करीत असतां त्याच्या हातीं अनपेक्षितपणे गोखल्यांचे पत्र पडले, "तुम्ही नवीनच आलेले आहांत व नामांकित आहांत. शिवाय हिंदी राजकीय आकांक्षाबद्दल सहानुभूति बाळगणारे असा तुमचा लौकिक आहे. म्हणून या वर्षी मी नेहमींच्या पद्धतीनें अंदाजपत्रकावर टीका करणार नाही" असा त्या पत्राचा मथितार्थ होता. कोणत्याही

देशांत प्रतिपक्षाबद्दल असें मनाचे औदार्य दाखविले जात नाही. हे पत्र लिहून गोखल्यांनीं आपल्यास जिंकलें असें या माहितीचे तात्पर्य विल्सननें नमूद केलें आहे. कायदे कौन्सिलांतील गोखल्यांच्या कामगिरीचे स्वरूप कसें प्रभावशाली होतें याची कल्पना या कथांवरून करतां येईल. त्या कामगिरीचा तपशील सांगू लागल्यास तो लवकर किंवा थोडक्यात आटपणार नाही.

## टिळक–गोखले संबंध

गोखले बरीच वर्षें कॉंग्रेसचे चिटणीस होते. १९०५ साली ते कॉंग्रेसचे अध्यक्षही झाले. पुढें ते कॉंग्रेसच्या अधिवेशांत भाग घेत होते. १९०५ पासून देशाच्या राजकारणांत सरकारला प्रत्यक्ष प्रतिकार करण्याचें धोरण वंग-भंगाच्या बाबतींतील सरकारी बेदरकारपणामुळे शिरलें व कॉंग्रेसमध्ये जहाल-मवाळ हे पक्षभेद अवतरले. १९०५ नंतरची सारी वर्षें राजकीय दृष्टीनें संकटाची होती. सुरतेच्या कॉंग्रेसनंतर जहाल पक्ष बाहेर पडला. पण टिळकांच्या तुरुंगवासामुळें त्या पक्षाचें अवसानही पुष्कळसे खचलें. मवाळ पक्षानें कॉंग्रेसचीं वार्षिक अधि-वेशनें चालू ठेविलीं होती. १९१६ पर्यंत जहाल–मवाळांचा समेट होऊं शकला नाहीं. १९०८ मध्यें टिळकांना कैदेत जावें लागलें, याचें खापर गोखल्यांच्या माथ्यावर फोडण्याची प्रथा पडली.

टिळक व गोखले यांच्यांतील मतभेदावरून टिळकांच्या प्रेमानें गोखल्या-विरुद्ध खुसपटें काढण्याची तऱ्हा महाराष्ट्रांत बळावली होती तिच्या पोटीं गोखल्यांनीं मोर्लेसाहेबापाशीं टिळकांच्या चुगल्या सांगून टिळकांना कैदेत टाकण्याचा व्यूह रचल्याचा प्रवाद जन्मास आला. हा प्रवाद अगदीं निराधार असून खोडसाळपणाच्या हौसेशिवाय त्याच्यामागें कसले बळ नाहीं हें आतां त्यावेळचे गव्हर्नर लॉर्ड सिडनहॅम यांच्या आत्मचरित्रानें सिद्ध झालें आहे. परंतु ह्या काळांत गोखल्यांना ठार मारण्याचे प्रयत्न महाराष्ट्रांत झाले.

टिळकांवर आपण आपल्या एकट्याच्या जबाबदारीनें राजद्रोहाच्या खटल्याचा पाश टाकला, मोर्लेसाहेबाला ही खबर इतरांप्रमाणें वृत्तपत्रांतून कळली. मोर्लेसाहेबाला आपल्या कृत्याचा उद्वेग वाटला. गोखल्यांनीं त्यास भेटून "टिळकांवर खटला केल्यानें फार मोठी चूक घडली आहे, असें त्यास बजावलें" वगैरे आशयाचा मजकूर त्या आत्मचरित्रांत आहे; त्यावरून

गोखल्यासंबंधांतील साऱ्या कल्पनांचा निरास सहज होणारा आहे; पण गोखल्यांनीं मोर्लेचे कान फुंकले, हा प्रवाद टिकविण्याची खटपट टिळकांच्या प्रसिद्ध चरित्रांत आढळून येते. टिळकांना तुरुंगांत डांबून आपलें राजकीय मनोगत साधण्याचा नीच हेतु गोखल्यांच्या चित्ताला चुकूनसुद्धां स्पर्श करूं शकला नसता, असें त्यांनीं टिळकांच्या सहानुभूतीनें केलेल्या कित्येक गोष्टींवरून कळणारें आहे; टिळक तुमच्यावर नेहमी टीका करीत असतां तुम्ही स्वस्थ कसें रहातां ? अशा प्रश्नानें गोखल्यांना एकदां त्यांच्या मित्रानें डिवचलें. तेव्हां "मला देशसेवेचा मार्ग दाखविणारे टिळक आहेत याची जाणीव माझ्या हृदयांत जिवंत असेतोंवर त्यांच्याबद्दल अनुचित वर्तन कधींच घडणार नाहीं" असें गोखल्यांनीं उत्तर दिलें. हें उत्तर १९०० सालाच्या पूर्वीचें आहे. त्यानंतर ताईमहाराज प्रकरणांतल्या फौजदारी खटल्यांत टिळकांना सरकारनें नाहक छळलें, त्याची भरपाई या खटल्यांत टिळकांनी झालेला खर्च देऊन सरकारमार्फत व्हावी, असा तगादा सरकारामागें गोखल्यांनीं लावला होता. सरकारनें त्याची दाद घेतली नाहीं. टिळकांना १९०८ सालीं शिक्षा झाल्यावर गोखले अतिशय हळहळले. त्यांना निदान तुरुंगांत चांगल्या रीतीनें वागविलें जाईल असा उद्योग सरकारांत करणें हें आपलें कर्तव्य आहे असा हेतु त्यांनीं आपल्या मित्रांना लिहिलेल्या पत्रांतून पहायला सांपडतो. १९१४ सालीं टिळक तुरुंगांतून सुटल्यावर त्यांच्या घराबाहेर जो पोलिसपहाऱ्याचा त्रास होता तो उठविण्याच्या कामांत गोखल्यांनीं लक्ष घातलें. "टिळकांमध्यें कितीहि दोष असले तरी ते एक श्रेष्ठ व सत्त्वसंपन्न पुरुष ( Great and good ) आहेत." असें गोखल्यांचें टिळकांसंबंधीं निश्चित मत होतें व तें त्यांनीं कधीं झांकून ठेवलें नाहीं. असें सांगतात कीं, टिळकांबद्दल जर कोणीं गोखल्यांच्या अभिमानानें यद्वातद्वा वडबडूं लागला तर गोखले त्याला फटकारून तावडतोब गप्प बसवीत. "तोंडास येईल तें बकावें असें टिळक यःकश्चित गृहस्थ आहेत कीं काय ?" अशा प्रश्नानें ते भलतेसलतें वरळूं इच्छिणाराला चापीत असत. टिळकांना अनुलक्षून 'ज्ञानप्रकाशां'त त्यांच्या अमर्यादेचा मजकूर आला व तो त्यांना कलकत्त्यासारख्या दूर शहरीं पहायला मिळाला, तर ते तेथून संपादकाला कधीं तारेनें, तर कधीं पत्रानें कानपिचक्या देत, अशी उदाहरणें आहेत. तथापि गोखल्यांच्या हृदयाची ही बाजू महाराष्ट्रानें कधींही समजावून घेतली नाहीं. तिच्या

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



अनुक्रम ...६३४०६... क्रमांक ...९६६०... नोंद दि. ...२६-२-०१
९५९२८

परिणामीं कित्येक तरुणांना टिळकांच्या या शत्रूचा निःपात केल्याशिवाय टिळकांचे राजकारण सुरळीत चालवयाचे नाहीं असें वाटून त्यांना मारण्याचा यत्न दोनदां झाला. एकदां त्यांच्या घरीं व एकदां रात्रीं त्याचा प्रवास चालू असतांना. हे प्रयत्न फसले. सरकारनेंहि त्यांना जीवाचा धोका असल्याचा इषारा देऊन संरक्षणार्थ पिस्तुलासारखें हत्यार बाळगण्याची सोय केली होती. 'हें हत्यार वेळीं मारेकऱ्यांनाच उपयोगी पडेल' असें गोखले त्याबद्दल विनोदानें म्हणत असत. टिळक गोखल्यांशी पूर्वोक्त उदारपणाने कधीं वागले नाहीत. १८९३ सालापासून टिळक गोखल्यांचे पाय ओढण्याचा प्रयत्न गोखल्यांच्या अंत काळापर्यंत सतत करीत होते. वस्तुतः दोघेही सारख्याच मोलाचें कर्तबगार देशभक्त, पण टिळकांनीं गोखल्यांचा हाडवैऱ्याप्रमाणें पिच्छा पुरवावा हा महाराष्ट्राच्या अर्वाचीन राजकीय इतिहासांतील एक विचित्र योगायोग आहे.

## म. गांधी गोखल्यांचे शिष्य

म. गांधीसारखा जगद्विख्यात शिष्य गोखल्यांना लाभला नसता तर महाराष्ट्राला त्यांच्या योग्यतेची ओळख करून घेण्याची कधींच इच्छा झाली नसती. आजसुद्धां तशी इच्छा उत्कट नाहीं परंतु ती क्वचित् दिसते. गोखले–गांधी भेट प्रथम १८९६ सालांत घडली. गांधींनीं त्या भेटीची माहिती एका लेखांत दिलेली आहे. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी रहिवाशांचें गाऱ्हाणें घेऊन गांधीं हिंदुस्थानांत आले. त्यांनीं आधीं मुंबईच्या व नंतर पुण्याच्या पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. त्यावेळीं गांधी गुरुगवेषणा करीत होते. त्यांनीं आपल्या हृदयांत गुरूकरितां मांडलेलें सिंहासन कोण जिंकतो याची, प्रत्येक पुढाऱ्याची भेट झाल्यानंतर ते पहाणी करीत. गोंखले भेटेपर्यंत तें सिंहासन रिकामेंच होतें. गोखल्यांनीं तें सिंहासन काबीज केल्याचा अनुभव गोखल्यांच्या भेटीनंतर गांधींना आला. गांधी गोखल्यांचे राजकीय शिष्य म्हणवीत असत. त्यांनीं गोखल्यांचें केलेलें वर्णन प्रत्येकानें मुळांतून वाचावें. ह्या वर्णनाचे आतां स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध आहे.

उलट गांधींची थोरवी गोखल्यांनीं ओळखली होती. जेव्हां गांधींचे नांव हिंदी जनतेला नुकतेंच ऐकू येऊ लागले होतें, तेव्हां म्हणजे १९०९

साली एका काँग्रेसच्या अधिवेशनांत गोखल्यांनीं गांधींचा जो गुणानुवाद गायिला तो आतां लोकांच्या परिचयाचा झाला आहे. " गांधींच्या कर्तृत्वांत ठिसूळ मातीतून लोखंडाच्या कठिणपणाचे वीर उदयास आणण्याची किमया आहे. " " गांधींनीं हिंदी मानवतेची पराकाष्ठा गांठली आहे " अशा अर्थाचे शब्द त्या वर्णनांत आहेत. गांधींनीं हिंदुस्थानांत यावें असा गोखल्यांचा आग्रह होता. त्याप्रमाणें ते १९१४ सालीं इकडे आले. १९१५ मध्यें गोखले वारल्यानंतर भारत सेवक समाजाचा नाद सोडून गांधींनीं साबरमतीच्या कांठीं आपल्या सत्याग्रही संप्रदायाचें वीर तयार करण्याचा आखाडा उघडला. गोखल्यांच्या सांगण्यावरून त्यांनीं येथें येतांच प्रथम देशभर प्रवास केला. गोखल्यांचा Spiritualisation of Politics हा मंत्र ते सारखा या प्रवासांत उच्चारीत होते. गोखल्यांसंबंधीं गांधींची आदरयुक्त भावना त्यांच्या आत्मचरित्रांत व द. आफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या इतिहासांत वारंवार प्रगटलेली आहे. अगदीं अलीकडचें उदाहरण १९३३ सालचें असून तें महादेवभाईच्या रोजनिशीच्या तिसऱ्या खंडांत आहे. गोखल्यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाषण करण्यासाठीं त्यांना बोलावणें आले. त्याचें उत्तर लिहितांना गांधीजींनीं म्हटलें आहे कीं, ' गोखल्यांची देशभक्ति ओळखण्याची पात्रता देशांत नसल्यानें मी त्यांची महती स्वस्त करू इच्छित नाहीं. उठल्यासुटल्या गोखल्यांविषयीं व्याख्यानें देणें म्हणजे त्यांचा उपमर्द करण्यासारखें आहे. ' सदर उत्तरांतलें गांधींचें हें मनोगत झाकण्यासारखे नाहीं.

## द. आफ्रिकेंतील कामगिरी

गांधींच्या सत्याग्रहाला आफ्रिकेंत गोखल्यांनीं पैशाची मदत पुरविली. लॉर्ड हार्डिंज व्हाइसरॉय असतांना गांधींनीं सत्याग्रह पुकारला तेव्हां हार्डिंजसाहेबांच्या मनांत तेथील हिंदी रहिवाश्यांचा कैवार घ्यावा आणि इंग्लंडांतील सरकाराचें दक्षिण आफ्रिकेच्या सरकारावर दडपण आणून हिंदी रहिवाश्यांचें गाऱ्हाणें शक्य तेवढें मिटवावें, असें आलें. त्यानें गांधींना सत्याग्रह थांबविण्याबद्दल तार केली. ' आतां जागे झाला आजवर झोपीं गेला होता का ?' अशा मतलबाचें उत्तर पाठवून गांधींनीं व्हाइसरॉयला तडकावलें. शेवटीं व्हाइसरायनें गोखल्यांना मध्यस्थी करण्यास विनविलें. याप्रसंगीं झालेल्या

तारा–पत्रांची माहिती मनोरंजक आहे. गांधींचा निश्चय मोडण्याचें आपल्याला साधेलच असा गोखल्यांना भरंवसा वाटत नव्हता तरी त्यांनीं गांधींना तार पाठविली व गांधींनीं उलट व्हाईसरॉयच्या शब्दावर विश्वास ठेवल्याबद्दल गोखल्यांना दोष देऊन तुमच्या शब्दासाठीं सत्याग्रह थांबवितों असें कळविलें. व्हाईसरायानें दरम्यानच्या काळांत आपलें आश्वासन सार्थकी लावून सत्याग्रह चालू ठेवण्याची पाळी गांधींजींवर येऊं दिली नाहीं. नंतर याच प्रकरणांतून गोखले हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी या नात्यानें आफ्रिकेंत गेले. तेथें त्यांचा जो सत्कार झाला तो अपूर्व होता. गांधींनीं आपले गुरु म्हणून गोखल्यांशीं केलेली वागणूक प्राचीन गुरुशिष्यपरंपरेला शोभणारी होती. त्या वागणुकीची हकीकत आतां गांधींच्या स्मृतिसंग्रहातून वाचायला सांपडते. दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या इतिहासांतही त्या वागणुकीच्या छटा आहेत. तेथें असतांना गोखल्यांची जाज्ज्वल्य कर्तव्यनिष्ठा कसास लावणारी एक गोष्ट घडली व ती गांधींनींच सांगितली आहे. एका रात्रीस अतिश्रमानें गोखल्यांचा काळजाचा विकार जोरावला. छातीवर सूज दिसू लागली. अवस्था कठिण होती. दुसऱ्या दिवशीं आफ्रिकन सरकारबरोबर तडजोडीच्या वाटाघाटी व्हावयाच्या होत्या. त्या वाटाघाटी पुढें ढकलाव्या असे गांधीं गोखल्यांना आग्रहपूर्वक सांगूं लागले. गोखल्यांनीं त्यास नकार देऊन म्हटलें कीं भरतभूमि ही पुण्यभूमि आहे. एखादा गोखले मेला तर अनेक गोखले जन्मास घालण्याची तिला शक्ति आहे. पण अशी वाटाघाटीची वेळ पुनः येण्याची खात्री नाहीं. यासाठीं काय वाटेल तें झालें तरी वाटाघाट टाळावयाची नाहीं. कर्तव्य बजावतांना येणाऱ्या मरणाइतकें दुसरें भाग्य तें काय आहे ?' गोखल्यांनीं आपला हट्ट पुरा केला. सुदैवानें त्यांची प्रकृति सुधारली व ते हिंदुस्थानास परत आले. द. आफ्रिकेंत त्यांचा सत्कार लोकांकडून बादशाही थाटानें चालला होता.

## नामदार गोखल्यांची भारतीय लोकप्रियता

गोखले महाराष्ट्राबाहेर किती लोकप्रिय होते याचा पडताळा १९०७ सालीं आला. कॉंग्रेसमध्यें दुफळी झाल्यावर कॉंग्रेसची भूमिका जनतेला समजावून देण्याकरितां गोखल्यांनीं कलकत्ता ते लाहोर येथवर उत्तर भारतांत दौरा काढला. मार्गावरील सर्व मोठाल्या शहरांतून त्यांच्या मिरवणुकी निघाल्या.

व्याख्यानें झालीं. या दौऱ्यांत त्यांच्याबद्दल लोकांनीं जी सद्भावना दाखविली तीसुद्धां तोंपर्यंतच्या अर्वाचीन हिंदी राजकीय इतिहासांत विलक्षण होती. गांधी आपल्या गुरूच्या जयजयकाराच्या हकीकती सानंद कौतुकानें वाचीत होते. मात्र त्यांना गुरूच्या मिरवणुकी पसंत पडल्या नाहींत. एकदा गोखल्यांची गाडी घोड्याऐवजीं लोकांनीं ओढल्याचें वृत्त वाचतांच गांधींनीं गुरुजींना कळविलें कीं, 'हा माणसांना जनावरें बनविणारा मिरवणुकीचा प्रकार अत्यंत निंद्य आहे.' गोखल्यांना देखील हा प्रकार मनापासून आवडत नव्हता. पण लोकांच्या उत्साहापुढें त्यांचें कांहीं चालत नव्हतें. गांधींच्या निषेधांत 'जो स्वराज्य संपादन करील त्याला मिरवण्याचा हक्क आहे' असा ध्वनि होता. पुढें आफ्रिकेंत गांधींना देखील गोखल्यांच्या मिरवणुकीसंबंधांत लोकांचा उत्साह आवरतां आला नाहीं. परंतु गांधींनीं मात्र स्वतःच्या बाबतींत मिरवणुकीचा विधि फारसा अंमलांत येऊं दिला नाहीं, याचें स्मरण सर्वांना होण्यासारखें आहे.

## भारत–सेवकसमाज

गोखल्यांच्या भारत–सेवकसमाजाची कल्पना प्रथम केव्हां निघाली हें पूर्वी सांगितलें आहे. त्या कल्पनेला मूर्त स्वरूप १९०५ सालीं आलें. परंतु त्या संस्थेकरितां होतकरू सेवाबुद्धीचे स्वार्थत्यागी तरुण जोडण्याचें काम गोखले १९०२–१९०३ सालापासून करीत होते. त्याप्रमाणें कांहीं जणांच्या सहकार्याची खात्री झाल्यावर गोखल्यांनीं आपल्या संस्थेचीं पद्धतशीर घोषणा व स्थापना केली. फर्ग्युसन कॉलेजाच्या शेजारीं या संस्थेच्या इमारती उठल्या. त्या इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या मागल्या बाजूस एक लहानशी गच्ची आहे. तेथून समोर पर्वती आणि उजव्या बाजूला सिंहगड ही दोन ठिकाणें दृष्टीस पडतात. इमारतीच्या समोरील टेकडीमागें फर्ग्युसन कॉलेजाच्या इमारती आहेत. फर्ग्युसन कॉलेज ही त्यांची पहिली कर्मभूमि. पर्वती व सिंहगड हीं स्थानें महाराष्ट्रीयांना ऐतिहासिक पराक्रमाच्या वैभवाचीं स्मारकें केव्हांही स्फूर्तिदायक वाटणारीं आहेत. त्यांच्या साक्षींत आपली संस्था उभी आहे या भावनेची धन्यता हृदयांत संचरून गोखलेही त्या गच्चीवर कधीं बसल्यास अतिशय समाधानाचे उद्गार काढीत असत. भारत सेवक समाजाच्या इमार-

तीचा निधि गाजावाजाशिवाय त्यांच्या उदार धनिक मित्रांनीं सहज गोळा करून दिला. त्या मित्रांत माजी स्पेसी बँकेचे साहसी संस्थापक चुनीलाल सुरैय्या यांचें नांव मुद्दाम घेण्याजोगें आहे.

फंडाच्या बाबतींत गोखले अत्यंत भाग्यशाली होते. त्यांच्यावर गुजराथी, पारशी, मुसलमान अशा सर्व जातींतील लोकांचें अकृत्रिम प्रेम होतें. टाटा बंधु, सर होर्मसजी वाडिया, सेठना, आगाखान असे अनेक धनाढ्य त्यांच्या अडचणींच्या वेळीं मदतीला येत असत. गोखल्यांना अडचणीच्या वेळीं आपल्याकडे धांव घेण्याची पाळी येऊं नये म्हणून कांहीं हजारपर्यंतच्या रकमेचीं चेक–बुकें यापैकीं कित्येकांनीं त्यावर सह्या घालून गोखल्यांपाशीं वारंवार दिल्याच्याही गोष्टी आहेत. गोखल्यांनीं आपल्या जीवाचे हाल करून घेऊं नयेत म्हणून व्यक्तिशः त्यांच्या स्वतःच्या खर्चाकरितां ते प्रवासाला निघाले कीं मोठाल्या रोकड रकमा त्यांच्या हवाली करणारेही कांहीं धनिक होते. गोखल्यांच्या हातून अनाठायी किंवा उधळपट्टीचा कारभार व्हायचा नाहीं, उलट ते पैशाच्या अभावीं स्वतःची कुचंबणा करून घेतील, असा विश्वास या मदतीमागें असल्याचें निराळें सांगायला नको. गोखल्यांनीं या साह्यकर्त्यांचा कधीं गैरवाजवी फायदा घेतला नाहीं. किंबहुना त्यांच्याकडील चेकबुकें मुदत संपली कीं जशीच्या तशीं म्हणजे त्यांचा उपयोग केल्यावाचून त्या त्या दातृत्वशील मित्रांकडे परत जात असाच प्रकार घडत असे. गोखल्यांनीं लाखो रुपये देशकार्यार्थ जमविले. पण त्यांचा कधीं जमवितांना किंवा जमल्यानंतर कसलाच बोभाटा ऐकूं आला नाहीं.

## गुण व जबाबदारीची जाणीव

गोखले स्वभावानें फार हळवे होते. त्यांना अन्यायाची टीका झोंबत असे व स्वतः दुसऱ्याच्या संबंधांत अन्याय होऊं नये म्हणून ते अतिशय जपत असत. राष्ट्रीय दृष्टीनें हिंदी जनता युरोपियनांहून वरचढ न झाल्यास निदान बरोबरीची व्हावी, असा कटाक्ष बाळगून गोखले वागत. एकदां बोटीच्या प्रवासांत एका युरोपियन खेळांत युरोपियन प्रतिपक्ष्यानें त्यांच्यावर डाव केला तेव्हां त्यांनीं त्या खेळाच्या युक्त्या आत्मसात होण्यासाठी त्याचा रात्रंदिवस पिच्छा पुरविला व त्या युरोपियन प्रतिपक्ष्याला लागोपाठ तीन चार डावांत जिंकल्यावर त्यांना समाधान वाटलें. त्यांच्या या वर्तनाबद्दल खुलासा

विचारला तेव्हां त्यांनीं वरील अर्थाचें उत्तर दिलें. ते इंग्रजांचा बिलियर्ड हा खेळ खेळत असत. त्या खेळाचा त्यांनीं निदिध्यास चालविला होता. उघड्या जागेंत बसून आकाशांतील ग्रहगोल हे जणू काय त्या खेळांतील चेंडू आहेत व त्यांना कोठून कसे ढकलले म्हणजे आपलें काम फत्ते होईल, याचें गोखले आकाशाची शोभा पहातांना चिंतन करीत. या खेळांतही त्यांनीं चांगलें नैपुण्य संपादन केलें होतें. इंग्रजी भाषेचें प्रभुत्व त्यांनीं 'टाइम्स'चे अग्रलेख व इतर ग्रंथ पाठ करून कमावल्याची कथा प्रसिद्धच आहे. त्यांची पाठांतरशक्ति विलक्षण होती. आपल्या भाषणांचा मजकूर त्यांना जसाच्या तसा कालान्तरानें सांगतां येत असे. सार्वजनिक रीतीनें बोलायचे झाल्यास प्रत्येक शब्द विचारपूर्वक उच्चारावयाचा अशी त्यांना संवयच जडलेली होती. आपल्या शब्दामुळें लोकांचा गैरसमज होऊं नये, आपल्या हेतूचा विपर्यास करतां येईल अशी संदिग्ध किंवा शिथिल शब्दरचना आपल्या तोंडून बाहेर पडूं नये, याबद्दल ते अतिशय काळजी बाळगीत. महत्त्वाचें व्याख्यान असेल तर त्याच्या विचारांत पुष्कळसा काळ खर्चीत असत. आणि व्याख्यानाची मनाजोगी तयारी न झाल्यास व्याख्यानाचा दिवस पुढें ढकलीत किंवा तसें जुळण्याजोगें नसल्यास व्याख्यान अजिबात देतही नसत. पुढाऱ्याला आपण काय बोलतो, त्याचें परिणाम काय होतील इकडे लक्ष देऊन जबाबदारीच्या जाणिवेनें बोलायला पाहिजे, हा नियम त्यांनी सदैव पाळला. Sense sf Responsibility, Sense of Duty हे सद्‌गुणवाचक शब्द सार्वजनिक जीवनांत नेहमीं ऐकायला सांपडतात. पण त्याप्रमाणें आचरण करणारे फारसे आढळत नाहींत. गोखल्यांच्या स्वभावांत असलेल्या या गुणांचा विकास त्यांनीं जन्मभर चालविला होता.

### गोखल्यांचे उदार मन

एकदां त्यांचें पहिल्या वर्गाच्या डब्यांतील सामान काढून टाकून एक गोरा लष्करी अंमलदार त्यांचा उपमर्द करण्याच्या तयारींत असतां आपण ज्याचें सामान काढलें ती प्रसिद्ध वजनदार व्यक्ति असल्याचें कळतांच त्या अंमलदारानें आपली चूक दुरुस्त केली व गोखल्यांची माफी मागितली. पुढें ही बातमी वृत्तपत्रांत आल्यावर लार्ड कर्झन यांनीं गोखल्यांजवळ त्या बातमीची चौकशी केली व त्या अंमलदाराचें नांव गांव कळल्यास आपण

त्याला जबर शिक्षा ठोठावूं असें मनोगत व्यक्त केलें. हा गुन्हा त्या अंमलदारानें व्यक्तिश: केला नसून तुमच्या राज्यकारभारामध्यें काळा—गोरा या पंक्तिप्रपंचाचा दोष असेपर्यंत असे प्रकार थांबणार नाहींत म्हणून राज्यकारभाराचें धोरण बदलणें हाच असल्या बाबतींत योग्य उपाय असल्याचा आपला अभिप्राय गोखल्यांनीं कर्झनसाहेबांच्या कानी घातला व त्याचें नावगांव सांगण्याचें साफ नाकारलें. शिवाय त्यानें आपली चूक कबूल करून माफी मागितल्यावर आपल्यापुरतें हें प्रकरण संपलें आहे असेंहि त्यांनीं आणखी सांगितलें. रानड्यांवर असाच प्रसंग आला असतां उपमर्दकर्त्याच्या वर्तनावरून आपण आपले सामाजिक वर्तन सुधारावें, अधिकाराच्या किंवा जातवारीच्या श्रेष्ठ–कनिष्ठ भावानें आपण जर आपसांत नीट वागत नाहीं तर एखाद्या इंग्रजाच्या उर्मटपणाचा विषाद बाळगण्यांत हशील काय ? अशा अर्थाचें त्या प्रसंगाच्या अनुरोधानें पुण्यास रानड्यांनीं त्यावेळीं व्याख्यान दिल्याचें प्रसिद्ध आहे.

गोखल्यांनीं रानड्यांचें वळण आपल्या वागणुकीस लावलें होतें, परंतु या वागणुकींत दिसून येणाऱ्या बौद्धिक उंचीचें आकलन सामान्यपणें करतां येत नाहीं व करतां आल्यास पचत नाहीं. ‘ अरे तर कारे ’, ‘ जशास तसें ’ ही भूमिका नित्याच्या परिचयाची व तीच मर्दुमकीच्या नीतीची कसोटी अशा ग्रहामुळे रानडे व गोखले या दोघांवर असल्या गोष्टींच्या अनुषंगानें दुबळेपणाचा आरोप केला जात असतो. असल्या आरोपाची लोकप्रियतेच्या लोभानें गोखल्यांनीं कधीं पर्वा केली नाहीं. तरीसुद्धां त्यांच्या मृत्यूनंतर निघालेल्या प्रचंड शवयात्रेनें त्यांची लोकप्रियता केवढी मोठी होती हें निदर्शनास आलें.

### परलोकीं प्रयाण

गोखल्यांनीं मृत्यूचें स्वागत उघड्या डोळ्यांनीं एखाद्या योग्याप्रमाणें केलें. शेवटीं ते पब्लिक सर्व्हिसकमिशनच्या कामांत निमग्न होते. त्या कामानिमित्त मरणापूर्वीच्या कांहीं महिन्यांत ते इंग्लंडांत असतां डॉक्टरांनीं त्यांना मृत्यु तेथेंच गांठील असें निश्चित भविष्य वर्तविलें होतें. ‘ मी परदेशांत मरणार नाहीं, मी माझ्या जन्मभूमींत गेल्यावरच मरेन ’ असें या भविष्याला गोखले ठासून उत्तर देत असत. त्याप्रमाणें ते स्वदेशीं आले. ज्या दिवशीं त्यांना मृत्यूनें गांठलें

त्या दिवशीं त्यांना आपली स्थिती लक्षांत येऊन त्यांनीं उरली सुरली निरवानिरव आरंभिली. त्यांची अवस्था कठिण असल्याचें ओळखून मंडळी भेटीस येऊं लागली. त्यांच्यापाशीं एक डॉक्टर मित्र होते, त्यांनीं मुंबईहून नामांकित डॉक्टर बोलवावे अशी कळकळीची सूचना केली. हे डॉक्टर येऊन काय करणार? डॉक्टरांना मरण टाळतां येत नाहीं, त्यांना बोलविल्यानें निष्कारण दुखण्याचा बोभाटा मात्र होईल. म्हणून त्यांना बोलावूं नये असें गोखल्यांनीं त्या मित्रास बजावलें. अशा स्थितींत संध्याकाळ लोटली. 'गोखले हें आता फार वेळाचे सोबती नाहींत' असें ध्यानांत येऊन एका लहानपणापासूनच्या मित्राला रडे आवरेना. त्याला रडतांना पाहून गोखल्यांनीं त्याला दम भरला व आपल्यापासून दूर जायला सांगितलें. आतां आपण जास्त काळ काढूं शकणार नाहीं, अशी खात्री होतांच गोखले अंथरुणावरून उठले. त्यांनीं धोतराचा काचा मारला, अंगावरील कपडे नीटनेटके केले, मरणोत्तर कसलाहि अव्यवस्थितपणा दिसूं नये यासाठीं त्या अखेरच्या क्षीण स्थितींतहि गोखले आपल्या अंगावरील वस्त्रप्रवरणाची व्यवस्था करीत असल्याचें जवळच्यांनीं ओळखलें. जो कोणी भेटेल, त्याला ते अतिप्रेमाच्या शब्दांनीं निरोप देत होते. ज्यांनीं गोखल्यांकरितां मनोभावानें श्रम केलें होते त्यांच्याजवळ त्यांनीं कृतज्ञता बोलून दाखविली. एका सहकाऱ्याला ते पुष्कळदां टाकून बोलत असत. तो दृष्टीस पडतांच त्याला खुणेनें जवळ बोलावून 'इहलोकीच्या कारभारांत प्रसंगपरत्वें तुमच्या बाबतींत रागाचें कडक शब्द वापरलें तें सर्व विसरून मला क्षमा करा,' असें गोखल्यांनीं म्हटलें. त्या सहकाऱ्याचा गळा दाटून आला होता. त्याला शब्द उच्चारवेना पण गोखल्यांनीं 'मागचें सर्व विसरलों, माफी केली.' असें त्याला बोलायला लावलेंच. आतां त्यांचा श्वास जड झाला होता. म्हणून मोकळ्या हवेंत जाण्याची इच्छा त्यांनीं दर्शविली. ती इच्छा जवळची मंडळी पार पाडीत असतां त्यांची व्याकुळता वाढली. त्याच सुमारास त्यांच्यासमोर आणखी दोन मित्र आले. 'आजवर इहलोकची मौज पाहिली. आतां परलोकीं जात आहों!' अशा अर्थाचे इंग्रजी वाक्य त्यांनीं नमस्कारपूर्वक त्यांच्याकडे पाहून उच्चारलें. नंतरच्या क्षणा दोन क्षणांत गोखल्यांच्या जीविताचा दिवा मालवल्याचें दृश्य जमलेल्या सर्वांच्या अनुभवास आलें. तो दिवस १९ फेब्रुवारी १९१५ हा होय.

ग्रंथ संग्रह ... स्थळ
अनुक्रम..............

# जीवनपट

## रा. ब. गोपाळराव हरि देशमुख ( लोकहितवादी )

[ १८२३–१८९२ ]

● जीवनांतील महत्त्वपूर्ण घटना

| | |
|---|---|
| १८२३ | १८ फेब्रुवारी रोजीं पुणें येथें जन्म. |
| १८३० | विवाह. पुणें येथील इनामदार गोळे यांच्या कन्येशीं (गोपिकाबाई). |
| १८३६ | वडिलांचा मृत्यु. इंग्रज सरकारनें चालत आलेली दहा हजाराची देशमुखी तैनात काढून घेतली. |
| १८४१–४४ | इंग्रजी शिक्षणाची साधना. |
| १८४४ | पुणें येथील सरदारांच्या एजंटाच्या कचेरींत ट्रान्स्लेटर म्हणून नेमणूक. |
| १८४६ | सरकारी मुन्सफीची परीक्षा उत्तीर्ण. |
| १८४८ | ' प्रभाकर ' पत्रांतून ' लोकहितवादी ' या टोपणनांवानें पत्रें लिहिण्याच्या निमित्तानें लेखनास प्रारंभ. |
| १८५२ | वाई येथें मुन्सफ म्हणून नेमणूक. |
| १८५६ | सब–असिस्टंट इनाम कमिशनर म्हणून नेमणूक. |
| १८६१ | मुंबई हायकोर्टांत हिंदु व मुसलमानांच्या धर्मशास्त्राच्या व्यवहाराचा गोषवारा काढण्यासाठीं १ मे रोजीं नेमणूक. |
| १८६२ | ६ सप्टेंबर रोजीं असिस्टंट जज् म्हणून अहमदाबादेस नेमणूक |
| १८६३ | सनदी नोकरांसाठीं असलेल्या डिपार्टमेंटल परीक्षेंत उत्तीर्ण. |
| १८६९ | पुनर्विवाह प्रकरण. |
| १८७६ | दिल्ली दरबारचें आमंत्रण. रावबहादुर ही पदवी. |
| १८७७ | नाशिक येथें जॉइंट जज् म्हणून नेमणूक. जे. पी. ' जातिभेद ' हा ग्रंथ. |

१८७८ मुंबई विद्यापीठाचे फेलो.
१८७९ सरकारी नोकरींतून सेवानिवृत्त.
१८८० मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद. 'स्वाध्याय' हा ग्रंथ.
१८८१ फर्स्ट क्लास सरदारांत गणना.
१८८४ रतलाम संस्थानचे दिवाण. 'आगम प्रकाश' हा ग्रंथ.
१८८५ पत्नीचा मृत्यु.
१८९२ ९ ऑक्टोबर रोजीं मृत्यु.

### • प्रमुख निवडक मराठी चरित्रें

लोकहितवादी–ले. ग. ह. केळकर (१९२३)
लोकहितवादी–ले. कृ. ना. आठल्ये (१९२६)

• • •

## म. जोतीराव गोविंदराव फुले

[१८२७–१८९०]

### • जीवनांतील महत्त्वपूर्ण घटना

१८२७ जन्म.
१८३४–३८ पंतोजीच्या शाळेंत मराठी शिक्षण.
१८४० कावडी येथील झगडे-पाटील यांच्या कन्येशी विवाह.
१८४१–४७ मिशनरी शाळेतील माध्यमिक अभ्यासक्रम.
१८४७ लहुजी बुवाकडे तालीम आणि राज्यक्रांतीचे विचार.
१८४७ पेनच्या 'राइटस् ऑफ मॅन्' या पुस्तकाचें वाचन.
१८४८ उच्चवर्णीय लग्नाच्या मिरवणुकीत झालेला अपमान.
१८४८ शूद्रातिशूद्रांच्या मुलींसाठी शाळा.
१८४९ शिक्षण-कार्यास वाहून घेण्यासाठी सौ. सह गृहत्याग.
१८४९ मराठी पुस्तकांना सरकारनें अनुदान द्यावे यासाठी भरलेल्या विश्रामबाग वाड्यांतील सभेला दिलेलें संरक्षण.

१८५१ चिपळूणकरांच्या वाड्यांतील तसेंच रास्तापेठेतील मुलींच्या शाळांची स्थापना.

१८ कँडी यांच्या अध्यक्षतेखाली सरकारी विद्याखात्याकडून सत्कार.

१८ ॉटिश मिशनऱ्याच्या शाळेत अर्धवेळ शिक्षकाची नोकरी.

१८५ ाणांचा दंभस्फोट करणाऱ्या ‘ तृतीयरत्न ’ या नांवाच्या नाट- चे लेखन.

१८५ त्रीच्या शाळेची स्थापना.

१८५ रेकऱ्यांकडून हत्येचा प्रयत्न.

१८५ ाळांच्या व्यवस्थापक मंडळांतून निवृत्ति.

१८६० [redacted]धवा पुनर्विवाहास साहाय्य.

१८६३ लहत्या-प्रतिबंधक-गृहाची स्थापना.

१८६५ ाराम तात्या पडवळकृत ‘ जातिभेद विवेकसार ’ या ग्रंथाच्या सऱ्या आवृत्तीचें स्वतःच्या नांवावर केलेलें प्रकाशन.

१८६८ रचा हौद अस्पृश्यांना पाणी भरण्यासाठी खुला केला.

१८६९ शिवाजीचा पोवाडा ’ ‘ ब्राह्मणांचे कसब ’ ही ग्रंथरचना.

१८७३ गुलामगिरी ’ ही ग्रंथरचना.

१८७३ त्यशोधक समाजाची स्थापना.

१८७५ यानंद सरस्वतींची मिरवणूक.

१८७६ [redacted]णे नगरपालिकेचें सदस्यत्व.

१८८० ारूची दुकाने काढण्यास नवे परवाने देण्यास विरोध.

१८८२ [redacted]टर कमिशनकडे पाठविलेलें दलितवर्गाच्या शिक्षणासंबंधीचे निवेदन.

१८८२ तुरुंगातून सुटून आल्यावर टिळक-आगरकरांचा सन्मान.

१८८३ शेतकऱ्याची स्थिती वर्णिणारे ‘ शेतकऱ्याचा असूड ’ हे व्हाइस- [redacted]ायला पाठविलेले विवेदन.

१८८५ [redacted]सत्यशोधक-समाजाची झेंडा-मिरवणूक.

१८८५ [redacted] इशारा ’ या पुस्तकाची रचना.

१८८८ ड्यूक ऑफ कनॉटची सत्कारसभा आणि फुल्यांनी केलेला दंभस्फोट.

१८८८ जनतेने केलेला सत्कार आणि दिलेली ‘ महात्मा ’ ही पदवी

१८७८ मुंबई विद्यापीठाचे फेलो.
१८७९ सरकारी नोकरींतून सेवानिवृत्त.
१८८० मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद. ‘ स्वाध्याय ’ हा ग्रंथ.
१८८१ फर्स्ट क्लास सरदारांत गणना.
१८८४ रतलाम संस्थानचे दिवाण. ‘ आगम प्रकाश ’ हा ग्रंथ.
१८८५ पत्नीचा मृत्यु.
१८९२ ९ ऑक्टोबर रोजीं मृत्यु.

### ● प्रमुख निवडक मराठी चरित्रें

लोकहितवादी–ले. ग. ह. केळकर ( १९२३ )
लोकहितवादी–ले. कृ. ना. आठल्ये ( १९२६ )

● ● ●

## म. जोतीराव गोविंदराव फुले

[ १८२७–१८९० ]

### ● जीवनांतील महत्त्वपूर्ण घटना

१८२७ जन्म.
१८३४–३८ पंतोजीच्या शाळेंत मराठी शिक्षण.
१८४० कावडी येथील झगडे-पाटील यांच्या कन्येशी विवाह.
१८४१–४७ मिशनरी शाळेतील माध्यमिक अभ्यासक्रम.
१८४७ लहुजी बुवाकडे तालीम आणि राज्यक्रांतीचे विचार.
१८४७ पेनच्या ‘ राइटस् ऑफ मॅन् ’ या पुस्तकाचें वाचन.
१८४८ उच्चवर्णीय लग्नाच्या मिरवणुकीत झालेला अपमान.
१८४८ शूद्रातिशूद्रांच्या मुलींसाठी शाळा.
१८४९ शिक्षण-कार्यास वाहून घेण्यासाठी सौ. सह गृहत्याग.
१८४९ मराठी पुस्तकांना सरकारनें अनुदान द्यावे यासाठी भरलेल्या विश्रामबाग वाड्यांतील सभेला दिलेलें संरक्षण.

१८५१ चिपळूणकरांच्या वाड्यांतील तसेंच रास्तापेठेतील मुलींच्या शाळांची स्थापना.

१८५२ मे. कँडी यांच्या अध्यक्षतेखाली सरकारी विद्याखात्याकडून सत्कार.

१८५४ स्कॉटिश मिशनऱ्याच्या शाळेत अर्धवेळ शिक्षकाची नोकरी.

१८५५ पुराणांचा दंभस्फोट करणाऱ्या 'तृतीयरत्न' या नांवाच्या नाटकाचे लेखन.

१८५५ ात्रीच्या शाळेची स्थापना.

१८५६ ारेकऱ्यांकडून हत्येचा प्रयत्न.

१८५८ ाळांच्या व्यवस्थापक मंडळांतून निवृत्ति.

१८६० वेधवा पुनर्विवाहास साहाय्य.

१८६३ ालहत्या-प्रतिबंधक-गृहाची स्थापना.

१८६५ ुकाराम तात्या पडवळकृत 'जातिभेद विवेकसार' या ग्रंथाच्या ुसऱ्या आवृत्तीचें स्वतःच्या नांवावर केलेलें प्रकाशन.

१८६८ रचा हौद अस्पृश्यांना पाणी भरण्यासाठी खुला केला.

१८६९ शिवाजीचा पोवाडा' 'ब्राह्मणांचे कसब' ही ग्रंथरचना.

१८७३ गुलामगिरी' ही ग्रंथरचना.

१८७३ त्यशोधक समाजाची स्थापना.

१८७५ यानंद सरस्वतींची मिरवणूक.

१८७६ णे नगरपालिकेचें सदस्यत्व.

१८८० रूची दुकाने काढण्यास नवे परवाने देण्यास विरोध.

१८८२ टर कमिशनकडे पाठविलेलें दलितवर्गाच्या शिक्षणासंबंधीचे निवेदन.

१८८२ ुंगातून सुटून आल्यावर टिळक-आगरकरांचा सन्मान.

१८८३ तकऱ्याची स्थिती वर्णिणारे 'शेतकऱ्याचा असूड' हे व्हाइस-यला पाठविलेले विवेदन.

८८५ यशोधक-समाजाची झेंडा-मिरवणूक.

८८५ इशारा' या पुस्तकाची रचना.

८८ ूक ऑफ कनॉटची सत्कारसभा आणि फुल्यांनी केलेला दंभस्फोट.

८८ तेने केलेला सत्कार आणि दिलेली 'महात्मा' ही पदवी

१८८९ 'सार्वजनिक सत्यधर्म' या मरणोत्तर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाची रचना.

१८९० मृत्यु

### • प्रमुख निवडक मराठी चरित्रें

महात्मा ज्योतिराव फुले यांचे चरित्र–ले. पंढरीनाथ सीताराम पाटील (१९२७)

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या चरित्रावर त्रोटक निबंध–ले. दलपतसिंह चव्हाण (१९२७)

महाराष्ट्राचा मार्टिन ल्यूथर महात्मा जोतिराव फुले यांचें त्रोटक चरित्र–ले. अनंत एकनाथ गवंडी (१९१८)

ज्योतिराव फुले–ले. गं. बा. सरदार (१९४४)

महात्मा ज्योतिराव फुले–ले. वसंत देसाई (१९६५)

महात्मा ज्योतिबा फुले–ले. ग. द. माळी (१९६७)

ज्योति निबंधः जोतिराव फुले–ले. लक्ष्मणशास्त्री जोशी (१९४७)

●●●

## डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर

[१८३७–१९२५]

### • जीवनांतील महत्त्वपूर्ण घटना

१८३७ ७ जुलै रोजीं रत्नागिरी जिल्ह्यांत मालवण येथें जन्म.

१८५८ एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमधील शिक्षणक्रम संपविला.

१८५९ एल्फिन्स्टन कॉलेजांत फेलो (पहिले दक्षिणा फेलो).

१८६० पूना कॉलेजांत (पुढें डेक्कन कॉलेज) बदली.

१८६२ मुंबई विद्यापीठाचे बी. ए.

१८६३ मुंबई विद्यापीठाचे एम. ए.

१८६४ फेलीशिपचा राजीनामा. पहिलें संस्कृत पुस्तक. हैद्राबाद (सिंध)च्या हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून नेमणूक.

१८६५ रत्नागिरी हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून नेमणूक. स्टुडंट्स लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटीचे चिटणीस.

१८६६ दुसरें संस्कृत पुस्तक. मुंबई विद्यापीठांतील संस्कृतच्या परीक्षांचे परीक्षक.

१८६९ एल्फिन्स्टन कॉलेजांत संस्कृतचे ॲक्टिंग प्रोफेसर ( पुढें असिस्टंट प्रोफेसर ) प्रार्थना समाजचे सभासद.

१८७४ लंडन येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय प्राच्य विद्यापरीषदेंत डॉ. भांडारकर यांचा 'नाशिक येथील शिलालेखां' संबंधींचा निबंध वाचण्यात आला.

१८८२ पुण्यास डेक्कन कॉलेजांत संस्कृतचे प्रोफेसर. ( संस्कृतचे पहिले भारतीय प्रोफेसर )

१८८४ हंटर एज्युकेशन कमिशनपुढें साक्ष.

१८८५ जर्मनींतील गटिंजन विद्यापीठानें पी एच. डी. पदवी अर्पण केली.

१८८६ मुंबई सरकारनें काठेवाडांतील संस्थानिकांच्या तर्फे व्हीएन्ना येथील Congress of Orientalist मध्यें प्रतिनिधी म्हणून पाठविलें

१८९१ सी. आय्. ई. ही पदवी.

१८९३ डेक्कन कॉलेजांतून सेवानिवृत्त. मुंबई विद्यापीठाचे व्हा. चॅन्सेलर.

१९०४ मुंबई विद्यापीठानें एल्. एल्. डी. ही पदवी अर्पण केली.

१९०८ कलकत्ता विद्यापीठानें पीएच्. डी. ही पदवी अर्पण केली.

१९११ एडिंबरो विद्यापीठाने पीएच्. डी. पदवी अर्पण केली.

१९११ दिल्ली दरबारच्यावेळीं के. सी. आय. ई. ही पदवी अर्पण करण्यांत आली.

१९१६ भारतवर्षीय महिला विद्यापीठाचे चॅन्सेलर

१९१७ डॉ. भांडारकरांचे शिष्य, मित्र व चहाते यांनीं डॉक्टरांचें कायमचें स्मारक असावें म्हणून 'भांडारकर प्राच्यसंशोधन मंदिर, या संस्थेची स्थापना केली.

१९१९ भारतांतील पहिली प्राच्यभाषा परिषद 'मंदिरा' तर्फे भरविण्यात आली. डॉ. भांडारकर यांनीं तिचें अध्यक्षस्थान भूषविलें.

१९२५ २४ ऑगस्ट रोजीं देहावसान.

### • प्रमुख निवडक मराठी चरित्रें

डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांचें अल्प चरित्र–ले. द्वारकानाथ गोविंद वैद्य ( १९१३ )

गुरुवर्य डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांचें चरित्र–ले. श्रीनिवास नारायण कर्नाटकी ( १९२७ ).

●●●

## न्या. महादेव गोविंद रानडे

[ १८४२–१९०१ ]

### • जीवनांतील महत्त्वपूर्ण घटना

| | |
|---|---|
| १८४२ | १८ जानेवारी रोजीं नाशिक जिल्ह्यांतील निफाड या गांवीं जन्म. |
| १८५१–५६ | कोल्हापुरास इंग्रजी शिक्षण. |
| १८५४ | पहिला विवाह–वाईचे दांडेकर यांची कन्या सखुताई यांजबरोबर. |
| १८५६ | मुंबईच्या एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें प्रवेश. |
| १८५९ | मुंबई विद्यापीठाची पहिली मॅट्रिक्युलेशन परीक्षा–त्यांत उत्तीर्ण. |
| १८६२ | बी. ए. ( ऑनर्स )–पहिला वर्ग. |
| १८६२–६६ | मुंबईस ' इंदुप्रकाश ' चे इंग्रजी विभागाचे संपादक. |
| १८६४ | एम्. ए.–पहिला वर्ग–सुवर्णपदक. |
| १८६६ | एल्. एल्. बी. ( ऑनर्स ) पुण्यास शाळाखात्यांत ॲक्टिंग मराठी ट्रान्स्लेटर. अक्कलकोट येथें कारभारी. कोल्हापूर येथें न्यायधीश. |
| १८६८–७२ | मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजांत इंग्रजी भाषेचे असि. प्रोफेसर. |
| १८६९ | मुंबई हायकोर्टांत असि. रिपोर्टर. |
| १८७१ | ॲडव्होकेटची परीक्षा उत्तीर्ण. विद्यापीठाच्या आर्टस् व कायद्याच्या सर्व परीक्षा देऊन पहिले आल्यामुळें त्यांना ' पदवीधर मुकुटमणि ' ( Prince of Gradutes ) म्हणण्यांत येऊं लागलें. मुंबईस तिसरे मॅजिस्ट्रेट. पुढें मुंबई स्मॉल कॉज कोर्टाचे चौथे जज् व पुण्याचे ॲक्टिंग फर्स्ट क्लास फर्स्ट ग्रेड सबजज्. |

१८७३ प्रथम पत्नीचा मृत्यु. द्वितीय विवाह—देवराष्ट्रें येथील कुर्लेकर यांची कन्या यमुनाताई ( सौ. रमाबाई रानडे ) यांजबरोबर.

१८७७ वडिलांचें कोल्हापुरास निधन.

१८७८ नाशिकला सदर अमीन.

१८७९ पुण्यांतील विश्रामबाग व बुधवारवाडा जळल्यामुळें आणि वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडामुळें माधवरावांवर सरकाराची इतराजी. धुळ्यास बदली.

१८८१ मुंबईस प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट. पुढें पुण्यास सदरअमीन. पुणें व सातारा जिल्ह्यांत शेतकऱ्यांच्या कायद्याप्रमाणें मुन्सफ कोर्टाचे तपासणीदार.

१८८४ पुणें स्मॉल कॉज कोर्टाचे जज्.

१८८५ लॉर्ड रे यांनीं ( मुंबईचे गव्हर्नर ) आपले कौन्सिलर नेमले.

१८८७ शेतकऱ्यांच्या कायद्याप्रमाणें स्पेशल जज्. मध्यंतरी वर्ष दीड वर्ष ( १८८६–८७ ) फिनान्स कमिटीवर एक कमिशनर. सी. आय्. ई. ही पदवी.

१८९० लॉर्ड रे यांचे पुनः कौन्सिलर.

१८९१ पंचहौद मिशन ग्रामण्य प्रकरण.

१८९३ लॉर्ड हॅरिस यांनीं आपले कौन्सिलर नेमलें. हायकोर्ट जज्.

१९०१ १६ जानेवारी रोजीं मुंबई येथें मृत्यु.

## • प्रमुख निवडक मराठी चरित्रें

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचें चरित्र—ले. न. र. फाटक ( १९२४; नवी आवृत्ति १९६६ )

महादेव गोविंद रानडे यांच्या चरित्राचे खरे स्वरूप—ले. द्वारकानाथ गोविंद वैद्य ( १९१५ )

आमच्या आयुष्यांतील कांही आठवणी—ले. रमाबाई रानडे ( १९१०;१९३५;१९५३ )

स्वतंत्र भारताचे द्रष्टे न्यायमूर्ति रानडे—ले. गो. म. कुलकर्णी ( १९४२ )

कैलासवासी नामदार न्यायमूर्ति माधवराव गोविंद रानडे यांचे चरित्र ( सन १८४२–१९०१ )–ले. वासुदेव वामन ठाकूर ( १९४२ )
न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे–ले. दा. पां. रानडे (१९४२;४८)
न्या. रानडे अंक : शालापत्रक : जानेवारी १९४२
रानडे विशेषांक : सह्याद्रि : जानेवारी १९४२

●●●

## लो. बाळ गंगाधर टिळक

[ १८५६–१९२० ]

● जीवनांतील महत्त्वपूर्ण घटना

१८५६ २३ जुलै रोजीं (आषाढ वद्य ६ शके १७७८) रत्नागिरी येथें जन्म.
१८७१ विवाह, पत्नी सौ. सत्यभामाबाई.
१८७२ मॅट्रिक उत्तीर्ण. वडिलांचा मृत्यु.
१८७६ बी. ए. –पहिल्या वर्गांत.
१८७९ एल्. एल्. बी.
१८८० न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना.
१८८१ केसरी–मराठा वृत्तपत्रें सुरू.
१८८२ कोल्हापूर बर्वे प्रकरणीं १०१ दिवसाची साध्या कैदेची शिक्षा ( डोंगरी ).
१८८४ डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना.
१८८५ २ जानेवारी रोजीं फर्ग्युसन कॉलेजची स्थापना.
१८८७ केसरीची व्यवस्था स्वतःकडे घेतली ( संपादक : २२ ऑक्टोबर पासून ).
१८८९ क्रॉफर्ड –मामलेदारांची तरफदारी.
१८९० १५ डिसेंबर रोजीं डे. ए. सोसायटीचा राजीनामा. ( १८९१ ते १९०० पर्यंत लॉ क्लास चालविला ).

१८९१ संमतिबिलाचा वाद. ३ सप्टेंबरपासून 'मराठा'चे संपादक.

१८९२ 'ओरायन' ग्रंथ लंडन येथील प्राच्य विद्वत्परिषदेकडे पाठविला.

१८९४ सार्वजनिक गणेशोत्सव सुरू.

१८९५ मुंबई विधिमंडळाचे सदस्य. पुणें कॉंग्रेसचे चिटणीस. शिवाजी उत्सवास आरंभ.

१८९७ राजद्रोहाच्या आरोपावरून १८ महिने सक्तमजुरीची शिक्षा (येरवडा).

१८९९ सीलोन–ब्रह्मदेशचा प्रवास. विलायतचे ग्लोब पत्रावर फिर्याद.

१९०३ थोरल्या चिरंजीवाचा मृत्यु. 'आर्टिक होम इन दी वेदाज' हा ग्रंथ.

१९०४ ताईमहाराज प्रकरणीं शिक्षा. पण हायकोर्टानें पुढें निर्दोष ठरविलें. पंचांग कमिटीची स्थापना.

१९०५ वंगभंगाविरुद्ध झालेली चळवळ. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण,यांचा पुरस्कार

१९०७ सुरत येथें कॉंग्रेस दुभंगली. नेमस्त आणि राष्ट्रीय पक्ष यांत फूट.

१९०८ राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ. दि. २४ जून रोजीं मुंबईस अटक व दि. २३ जुलै रोजीं खटला सुरू. 'देशाचें दुर्दैव' 'दुहेरी इषारा' वगैरे लेखांबद्दल ६ वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा.

१९०८–१४ मंडाले येथें बंदिवास.

१९१० 'गीतारहस्य' ग्रंथलेखनास आरंभ

१९११ ३० मार्च रोजी 'गीतारहस्या' चें लेखन पुरें झालें.

१९१२ ६ जून रोजी पत्नीचा पुणें येथें मृत्यु.

१९१४ मंडालेहून सुटका

१९१५ ताई महाराज प्रकरणाचा प्रिव्ही कौन्सिलांतील निकाल (मार्च). होमरूल लीगची स्थापना (मे).

१९१६ एकसष्टाव्या वाढदिवशी जनतेकडून एक लाखाची भेट. त्याच दिवशी नगर–बेळगांवच्या भाषणाबद्दल सरकारनें चाळीस हजारांचे दोन जामीन मागितले. पण ८ नोव्हेंबरला हायकोर्टानें 'स्वराज्याची चळवळ' कायदेशीर ठरवून जामीन रद्द केले. लखनौ कॉंग्रेस व हिंदु–मुसलमानांची एकी.

१९१८ वऱ्हाडांतील स्वराज्याची मोहीम. मुंबई गव्हर्नराच्या युद्ध-परिषदेंत सभा-त्याग. दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड. इंग्लंडला प्रयाण-स्वराज्याच्या शिष्टाईसाठीं व चिरोलवर खटला भरण्यासाठीं तेथें तेरा महिने मुक्काम.

१९१९ चिरोल केस हरले ( फेब्रुवारी ). १७ नोव्हेंबर रोजीं विलायतेहून परत. अमृतसर काँग्रेसमध्यें गौरव.

१९२० ताई महाराज प्रकरणीं कोल्हापूरकरांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नाचा निकाल. जनतेकडून तीन लाखांची थैली.

१९२० : ३१ जुलै रोजीं रात्रीं १२ वाजून ४० मिनिटांनीं मुंबई येथें सरदारगृहांत अंत. ( १ ऑगस्ट रोजी चौपाटीवर दहन )

## ● प्रमुख निवडक मराठी चरित्रें


लो. टिळक यांचे चरित्र, खण्ड १, २ व ३-ले. न. चिं. केळकर ( १९२३-१९२८ ) लोकमान्य टिळक-ले. दा. ग. पाध्ये ( १९२१ )

टिळकांचा जयजयकार-संपा. शं. ग. पुरोहित ( १९०८ )

लोकमान्य टिळक यांचीं गेलीं आठ वर्षें-ले. अप्पाजी विष्णू कुलकर्णी ( १९०९ )

लो. बाळ गंगाधर टिळक यांचें ५० वर्षांचें चरित्र : भाग १ ला-ले. कृष्णाजी आबाजी गुरुजी ( १९०६ )

टिळक चरित्र- ले. सीताराम केशव दामले ( १९०८ )

लोकमान्य टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका; खंड १, २ व ३- संग्रा. सदाशिव विनायक बापट ( १९२४, १९२५, १९२८ )

किंकर्तव्यमूढ जनतेला अचूक मार्ग दाखविणारे कर्मवीर आणि राष्ट्रसूत्रधार लोकमान्य टिळक- ले. अ. वा. मराठे (१९३३)

ना. बाळ गंगाधर टिळक यांच्यावरील खटल्याची हकीगत आणि परिशिष्टें- संपा. खंडेराव भिकाजी वेलसरे ( १८९८ )

टिळक चरित्र– ले. गं. कृ. लेले व वा. त्र्यं. आपटे ( १९२१ )
ना. बाळ गंगाधर टिळक ह्यांचें संक्षिप्त चरित्र– ले. के. बा. सहस्रबुद्धे ( १८९७ )
टिळकांचें अल्प चरित्र आणि संस्मरणीय उक्ति– ले. ल. रा. पांगारकर ( १९०८ )
टिळक–भारत– ले. शि. ल. करंदीकर ( १९४४ )
लोकमान्य टिळक– ले. ना. सि. फडके ( १९५० )
राष्ट्रजनक टिळक– ले. दा. न. शिखरे (१९४१; दु. आ. १९४९)
लो. टिळक दर्शन– ले. द. वि. ताम्हनकर ( अनु. भा. द. खेर ) ( १९५६ )
लोकमान्य टिळक विशेषांक : सह्याद्रि : ऑगस्ट १९५६
खास लोकमान्य अंक : ज्योतिर्माला : ऑक्टो. नोव्हेंबर १९२१
लो. टिळक अंक : पुरुषार्थ : ऑगस्ट १९५६
लो. टिळक विशेषांक : केसरी : ३० जुलै १९५७
,, ,, : प्रतिष्ठान : ऑगस्ट १९५६
लो. टिळक–आगरकर विशेषांक : नवभारत : ऑगस्ट १९५६
लो. टिळक जन्मशताब्दी विशेषांक : केसरी मराठा : २२ जुलै १९५६

• • •

## ना. गोपाळ कृष्ण गोखले

[ १८६६–१९१५ ]

### • जीवनांतील महत्त्वपूर्ण घटना

१८६६ १ मे रोजीं जन्म ( रत्नागिरी जिल्ह्यांत कोतलुक येथें ).
१८८० विवाह.
१८८१ मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण.

१८८४ बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण. डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना.

१८८५ फर्ग्युसन कॉलेजची स्थापना. न्यू इंग्लिश हायस्कूलमध्यें अध्यापन.

१८८६ डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद.

१८८७ दुसरा विवाह. रानड्यांशी पहिली भेट.

१८८८ 'सुधारक' पत्राच्या इंग्रजी आवृत्तीचें संपादन. सार्वजनिक सभेच्या सन्मान्य चिटणीसपदीं निवड. सभेच्या त्रैमासिक मुखपत्राचें संपादन.

१८८९ मुंबई येथें भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या बैठकींत भाग.

१८९१ डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे चिटणीस म्हणून नियुक्ती.

१८९५ अखिल भारतीय कॉंग्रेसचे संयुक्त चिटणीस, मुंबई विद्यापीठाचे फेलो. 'राष्ट्रसभा समाचार' पत्रिकेचें संपादन.

१८९६ सार्वजनिक सभेच्या चिटणीसपदाच्या तसेंच तिच्या त्रैमासिक मुखपत्राच्या संपादकत्वाचा राजीनामा. डेक्कन सभेची संस्थापना. गांधीजींशी पहिली भेट.

१८९७ इंग्लंडची पहिली वारी. वेल्बी कमिशनपुढें साक्ष. प्लेगनिवारण समितीविषयीं इंग्लंडमध्यें तक्रार. जॉन मोर्लेशीं पहिली मुलाखत. इंग्लंडहून परत. माफी प्रकरण.

१८९८ प्लेगनिवारण कार्यांत महत्त्वाचा भाग.

१८९९ मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद म्हणून निवड. सरकारच्या प्लेगनिवारणविषयक कार्यावर टीका.

१९०१ लॅंड रेव्हिन्यू बिलाला विरोध. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमधून 'वॉक् आऊट.' डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल बिलांतील जातीय तत्त्वांच्या पुरस्काराला विरोध.

१९०२ फर्ग्युसन कॉलेजमधून निवृत्त. इंपेरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर निवड. बजेटवर पहिलें भाषण केलें.

१९०३ कलकत्त्यांत गांधीजींचें गोखल्यांबरोबर एक महिना वास्तव्य.

१९०४ सी. आय्. इ. पदवी बहाल.

१९०५ १२ जून रोजीं सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना.

१९०५ इंग्लंडची दुसरी वारी. बनारस येथें भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष. पुणें शहर नगरपालिकेचे अध्यक्ष

१९०६ इंग्लंडची तिसरी वारी.

१९०७ (लाला लजपतराय यांना हद्दपारीची शिक्षा.) उत्तर हिंदुस्थानचा प्रचार दौरा. सुरतेचें कॉंग्रेस अधिवेशन आणि फाटाफूट.

१९०८ विकेंद्रीकरण कमिशनपुढें साक्ष. इंग्लंडची चौथी वारी. मोर्ले मिंटो सुधारणा अंमलांत आल्या. (टिळकांना अटक व शिक्षा). 'हिंदू पंच' विरुद्ध बेअदबीची फिर्याद. 'रानडे इकॉनॉमिक इन्स्टिटयूट'ची स्थापना.

१९१० प्रेस बिलावर टीका.

१९११ प्राथमिक शिक्षण बिल मांडलें.

१९१२ प्राथमिक शिक्षण बिल नामंजूर. इंग्लंडची पांचवी वारी. दक्षिण आफ्रिकेस भेट. गांधीजींशीं मुलाखत. 'पब्लिक सर्व्हिस कमिशन' वर नेमणूक.

१९१३ इंग्लंडची सहावी वारी (पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या निमित्तानें). दक्षिण आफ्रिकेंतील लढ्यासाठीं निधी उभारला.

१९१४ इंग्लंडची सातवी वारी (पुन्हां पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या निमित्तानें). के. सी. आय्. इ. पदवीस नकार. गांधी–स्मट्स करार. गांधीजींशीं लंडन येथें भेट. कॉंग्रेसमधील समझोत्याचा प्रयत्न फसला.

१९१५ कॉंग्रेस समझोता वादंग. गांधीजींची भेट. राजकीय मृत्युपत्र.

१९१५ ९ फेब्रुवारी रोजीं पुणें येथें मृत्यु

## ● प्रमुख निवडक मराठी चरित्रें

गोपाळ कृष्ण गोखले : ले. गणेश रघुनाथ अभ्यंकर (१९१५)

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचें चरित्र : ले. श्री. रा. पारसनीस (१९३३)

नामदार गोपाळ कृष्ण गोखले : ले. दत्तात्रय गणेश येरवडेकर (१९२६)

भारत सेवक गोपाळ कृष्ण गोखले : ले. अभिराग ( १९५६ )
गोपाळ कृष्ण गोखले–व्यक्ति आणि कार्य : ले. हृदयनाथ कुंझरू : ( १९६६ )
निःस्वार्थी भारत सेवक नामदार गो. कृ. गोखले : ले. कृष्णाजी लक्ष्मण ( १९६६ )
गो. कृ. गोखले यांचे चरित्र : ले. पु. पां. गोखले ( १९६६ )
नामदार गो. कृ. गोखले : ले. अरविंद ताटके ( १९६६ )
महान् मुत्सद्दी नामदार गोखले : ले. दा. न. शिखरे ( १९५३ )
नामदार गोखले चरित्र : ले. साने गुरुजी ( १९६६ ) [दु. आ.]
आदर्श भारत सेवक : ले. न. र. फाटक ( १९६७ )
गोखले जन्मशताब्दी विशेषांक झुंझार : मे १९६६
गोपालकृष्ण गोखले विशेषांक : लोकराज्य : मे १९६६

• • •

REFBK-0015924

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५८२४